म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय का.वा
ग्रं. क्र. ९६४३९

IRBK-0116431
IRBK-0116431

९६४३७
बा।५७।७
२०/३-८६
बा.वा

# आरसेनगरीत जाई

'नवलकहाणी'तल्या जाईची
नवी मजेदार यात्रा

ग. गो. मं. ठाणे, वाचनालय शाखा
९६४३७
बा.वा

भा. रा. भागवत

IRBK-0116431
IRBK-0116431

मूल्य सात रुपये

नितीन प्रकाशन, पुणे-३०

प्रकाशिका :
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ
पुणे - ३०

© लेखकाकडे

दुसरी आवृत्ती :
दीपावली १९७४

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार पेठ
पुणे - ३०



ही आरशातली जाई
मिनूला

१५४३७
८११ ८८

# जाईचा थोडासा इतिहास

**जाईची नवलकहाणी** ज्याचे रूपांतर आहे, ते मूळ पुस्तक 'ॲलिस इन वंडरलँड' ल्युइस कॅरोलने शंभर वर्षांपूर्वी लिहिले. या पुस्तकाने लगेच एवढी विलक्षण लोकप्रियता मिळवली, की 'ॲलिस' वरून नाटक झाले; जगातल्या बहुतेक प्रमुख भाषांतून 'ॲलिस'चे अनुवाद झाले; आणि पुढे तर 'ॲलिस इन् वंडरलँड' कथानकाचा चित्रपट झाला!



ल्युइस कॅरोल

ल्युइस कॅरोलचे खरे नाव चार्ल्स डॉजसन असे होते. ऑक्स्फर्डच्या सुप्रसिद्ध कॉलेजात तो गणित व तर्कशास्त्र या विषयांचा प्राध्यापक होता. गणितातली आकडेमोड करणारा मनुष्य कल्पनाशून्य असतो आणि कविता कशाशी खातात हे त्याला माहीत नसते, असे म्हणतात. पण या गृहस्थाचे सगळेच विलक्षण! तो कविता करायचा, मजेदार गोष्टी जुळवायचा; इतकेच नाही, तर मुलांचा घोळका जमवून त्यांना त्या सांगायचा. कधी कधी मुलांना काही खेळ करून दाखवायचा.

जॉन टेनियल या सुप्रसिद्ध चित्रकाराला कॅरोलचे हस्तलिखित आतिशय आवडले आणि त्याने स्वतः 'ॲलिस'साठी बहारदार चित्रे काढून दिली. पुढे १८६५ साली मॅकमिलन कंपनीने हे सचित्र पुस्तक प्रसिद्ध केले. दोन हजार प्रतींची आवृत्ती होती. पण चित्रांचे ब्लॉक चांगले उठले नाहीत आणि पुस्तकाची नासाडी झाली. प्रकाशकांनी लगेच ग्राहकांकडून त्यांच्या प्रती परत मागवल्या; आणि नवी आवृत्ती छापून त्यांना नव्या प्रती त्याच पैशांत दिल्या.

१५८४३७

# जाईचा थोडासा इतिहास

**जाईची नवलकहाणी** ज्याचे रूपांतर आहे, ते मूळ पुस्तक 'ॲलिस इन वंडरलँड' ल्युइस कॅरोलने शंभर वर्षांपूर्वी लिहिले. या पुस्तकाने लगेच एवढी विलक्षण लोकप्रियता मिळवली, की 'ॲलिस' वरून नाटक झाले; जगातल्या बहुतेक प्रमुख भाषांतून 'ॲलिस' चे अनुवाद झाले; आणि पुढे तर 'ॲलिस इन् वंडरलँड' कथानकाचा चित्रपट झाला !



ल्युइस कॅरोल

ल्युइस कॅरोलचे खरे नाव चार्ल्स डॉजसन असे होते. ऑक्स्फर्डच्या सुप्रसिद्ध कॉलेजात तो गणित व तर्कशास्त्र या विषयांचा प्राध्यापक होता. गणितातली आकडेमोड करणारा मनुष्य कल्पनाशून्य असतो आणि कविता कशाशी खातात हे त्याला माहीत नसते, असे म्हणतात. पण या गृहस्थाचे सगळेच विलक्षण ! तो कविता करायचा, मजेदार गोष्टी जुळवायचा; इतकेच नाही, तर मुलांचा घोळका जमवून त्यांना त्या सांगायचा. कधी कधी मुलांना काही खेळ करून दाखवायचा.

जॉन टेनियल या सुप्रसिद्ध चित्रकाराला कॅरोलचे हस्तलिखित अतिशय आवडले आणि त्याने स्वतः 'ॲलिस'साठी बहारदार चित्रे काढून दिली. पुढे १८६५ साली मॅकमिलन कंपनीने हे सचित्र पुस्तक प्रसिद्ध केले. दोन हजार प्रतींची आवृत्ती होती. पण चित्रांचे ब्लॉक चांगले उठले नाहीत आणि पुस्तकाची नासाडी झाली. प्रकाशकांनी लगेच ग्राहकांकडून त्यांच्या प्रती परत मागवल्या; आणि नवी आवृत्ती छापून त्यांना नव्या प्रती त्याच पैशांत दिल्या.

'ॲलिस इन् वंडरलँड' तात्काळ इतके लोकप्रिय झाले, की त्याच्या मग आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या. ल्युइस कॅरोलला पुस्तकाबद्दल पुष्कळ पैसे मिळाले.

यामुळे उमेद वाटून ल्युइस कॅरोलने ॲलिसच्या आणखी काही मजेदार गोष्टी लिहिल्या आणि या पुस्तकाला नाव दिले : 'थ्रू दि लुकिंग ग्लास'; कारण या खेपेस ॲलिस आरशात उतरली होती !

या दोन्ही पुस्तकांपासून स्फूर्ती घेऊन मराठी मुलांपुढे एक संपूर्ण महाराष्ट्रीय जाई उभी करण्याचा निर्धार मी केला. त्याचे फळ म्हणजे ही जोडगोळी— **जाईची नवलकहाणी** आणि **आरसेनगरीत जाई**.

यांपैकी 'नवलकहाणी' पुष्कळच आधी लिहून झाली. आमच्या **बालमित्र** मासिकातून माझे मित्र श्री. द. ग. गोडसे यांच्या सुंदर रेखाचित्रांसह ती प्रसिद्ध झाली आणि पुढे 'रामकृष्ण बुक डेपो'ने ती पुस्तकरूपाने काढली. आता या **आरसेनगरीत जाईच्या** जोडीने 'नितीन प्रकाशन' ती संपूर्ण नव्या सजावटीत प्रसिद्ध करीत आहे.

'नवलकहाणी' कै. आचार्य अत्रे यांना आवडली; आणि माझ्या विनंती-वरून त्यांनी पहिल्या आवृत्तीसाठी प्रस्तावनाही लिहिली होती. "ॲलिसची ही अमर स्वप्नकथा मराठी भाषेत सचित्र पुस्तकरूपात आणून श्री. भागवत यांनी बालवाङ्मयाची फार मोठी सेवा केली आहे" हे त्यांचे शिफारसपत्र मी शिरोधार्य मानतो. ते म्हणतात :

"मूळ गोष्टीत ठिकठिकाणी ज्या अनेक विनोदी कविता कॅरोलने घातलेल्या आहेत, त्यांचे तसेच्या तसे रूपांतर करणे शक्यही नाही आणि इष्टही नाही. म्हणून मराठी रूपांतरात समानार्थी कविता घालणेच योग्य आहे. या दृष्टीने श्री. भागवतांनी तयार केलेल्या कवितांपैकी दोन कविता तरी विशेष उल्लेखनीय आहेत. दहाव्या प्रकरणातली कच्छूची दोन्ही गाणी, 'झिंग्या म्हणतो गोगलगाई, चल चल बाई झपा झपा' आणि 'एक बाटली द्या मज आणुनि' ही रचनेच्या नि वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने सरस आहेत, यात काही शंका नाही."

How doth the little Crocodile
Improve her shining tail

या मुळातल्या कवितेची गंमत मात्र आचार्यांच्या मते

रानडुक्करा, रोज सकाळी येशी गावामधे
घाण खाउनी तोंड मळविशी इ.

या रूपांतरात यत्किंचितही उतरलेली नाही. " उंदीर ॲलिसला म्हणतो, ' माझी गोष्ट ( Tale ) फारच लांबलचक अन् दुःखदायक आहे. ' तेव्हा ॲलिस त्याच्या शेपटीकडे पाहून विचारते, ' तुझी Tail ( शेपटी ) लांबलचक आहे खरी, पण ती दुःखदायक कशी ? ' यात ' टेल ' या इंग्रजी शब्दावर कोटी केली आहे. ती मराठीत आणता येणार नाही. एवढेच नव्हे, तर उंदराची गोष्ट मूळ पुस्तकात शेपटाच्या आकाराप्रमाणे टोकाला निमुळत्या होत गेलेल्या टायपामध्ये छापलेली आहे. ही मौज मराठीमध्ये आणणे अवघड आहे."* वेड्या टोपीवाल्याने ' Twinkle, Twinkle, Little Star ' ह्या सुप्रसिद्ध कवितेचे फारच बहारदार विडंबन केले आहे. आचार्यांच्या मते त्यातला विनोद रूपांतरामध्ये

उंद्रोबा, उंद्रोबा भागलास का
चहाच्या किटलीत लपलास का

तितक्या प्रमाणात उतरलेला नाही.

आचार्य अत्रे पुढे म्हणतात,

" बदामच्या राणीने काही ' वड्या ' ( Tarts ) केल्या होत्या. त्या बदामच्या गुलाम्याने चोरल्या, त्यावर जो खटला झाला, त्यात राजसत्ताक पद्धतीतील न्यायदानाचे फारच मार्मिक विडंबन केलेले आहे. काही झाले की ' त्याचे डोके उडवा ' असे राणी ओरडते. ' आधी शिक्षा द्या ' ही त्यांच्या न्यायाची पद्धती होती. आक्षेपार्ह कवितेत राणीला ' फिट ' आल्याचा उल्लेख होता. राजा राणीला म्हणतो, " तुला ' फिट ' येत नाही ना ?" राणी रागावून ओरडली, " छे, मुळीच नाही ! " तेव्हा राजा म्हणाला, " मग हे शब्द तुला लागू पडत नाहीत ( ' फिट ' होत नाहीत ) ! " हा भाग भागवतांनी अजिबात गाळून टाकलेला आहे. मूळ गोष्टीमधली सर्वच्या सर्व गंमत या रूपांतरात उतरलेली नाही, हे कबूल करायलाच पाहिजे. त्याचे मुख्य कारण म्हणजे मराठीमधील लोकप्रिय साहित्याचा विडंबनासाठी भागवतांनी जेवढा उपयोग करून घ्यावयाला पाहिजे होता, तेवढा त्यांनी केलेला नाही. हे सर्व दोष जमेस धरूनही भागवतांचे रूपांतर पुष्कळच मनोरंजक

---

* या नव्या आवृत्तीत तो प्रयत्न केलेला आहे.

आणि खुमासदार झालेले आहे, यात शंका नाही. ”

आचार्य अत्रे यांनी केलेले मार्मिक परीक्षण मला आवडले. मी मूळ इंग्रजी कविता न घेता आपल्याकडच्या कविता घेतल्या होत्या, त्यामुळे इंग्रजी काव्यातली रसनिष्पत्ती इकडे तंतोतंत करायला हवी होती, असे मला वाटत नाही. पण ‘ फिट ’वरची अत्र्यांनी सुचवलेली कोटी इतकी बहारीची आहे, की ती आपल्याला सुचू नये, याची मला खंत वाटली !

आचार्य अत्रे यांची एक सूचना मात्र मला पटली नाही. ‘ ॲलिस ’चा “ मराठी तर्जुमा करण्यासाठी वस्तुतः मराठी भाषेतील काही नामांकित कवींची नि लेखकांची एखादी समितीच नेमायला हवी होती ” असे ते म्हणतात. काव्य-परीक्षणाप्रमाणे काव्यनिर्मितीसाठीही समित्या बसायला लागल्या, तर अनर्थच ओढवायचा, अशी माझी आपली नम्र भावना आहे ! पण नामवंत कवींचा सल्ला घेणे आणि मराठीतील लोकसाहित्याचा अधिक उपयोग करणे या बहुमोल सूचना मात्र मला पटल्या; आणि ‘ आरसेनगरीत जाई ’ च्या वेळी मी त्या यथाशक्ती अमलात आणल्या. ‘ आरसेनगरीत ’ कितीतरी पारंपारिक गाण्यांचा उपयोग केलेला आहे, हे सांगणे नकोच. तसेच माझे मित्र कविवर्य सोपानदेव चौधरी यांची आवडती ‘ उलटपक्षी ’ कोटी मी यात वापरली आहे आणि त्यांच्या मातोश्री बहिणाबाई चौधरी यांची एक हृदयंगम ओवी उद्धृत केली आहे.

या दोन्ही पुस्तकांची सजावट माझे दुसरे चित्रकार मित्र प्रभाकर गोरे यांनी एका आगळ्या पद्धतीने केलेली दिसेल.

या सर्व मंडळींचा मी ऋणी आहे. सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळात या दोन चित्रमय पुस्तकांचे प्रकाशन जिद्दीने पार पाडल्याबद्दल **नितीन प्रकाशन**-च्या गोगटे पतिपत्नींचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. अखेरीस प्रार्थना ही, की हा सर्व खटाटोप माझ्या बाल मित्रमैत्रिणींना आवडो आणि नवल कहाणी-वाली आरसेनगरीतली जाई त्यांच्या हृदयाच्या कपाटात पण उतरो !

**भा. रा. भागवत**

१

एक गोष्ट निश्चित. पांढऱ्या मांजराचा त्यात बिलकूल संबंध नव्हता. चूक काळ्या मांजराची होती.

त्याचे असे झाले—म्हातारी ठिकरी आपल्या सफेत पिल्लाचे तोंड धूत होती. आणि थोडाथोडका वेळ नाही, चांगली पंधरा मिनिटे पिलोबा तो अत्याचार सहन करीत होते. त्याला बिचाऱ्याला कुठून वेळ सापडणार दुसऱ्याच्या भानगडीत तोंड घालायला?

ठिकरी आपल्या पिल्लांना धुवायची कशी, माहीत आहे? पहिल्याने एका पंज्याने ती त्या बापड्याचा कान धरायची आणि मग दुसऱ्या पंज्याने त्याचा चेहरा खरखरावून चोळायची—उलटीकडून, वरं का? म्हणजे नाकापासून सुरुवात करून मग वर जायची. आत्तादेखील तिचा हाच कार्यक्रम सुरू होता. सफेत मांजरू गपचीप पडून होते. गुरगुरायला पाहात होते; पण ठिकरीचा खरारा आपला चालूच होता. अर्थात तिची माया होती ही.—तिला वाटत होते, की आपण हे बाळाच्या भल्यासाठी करतो आहोत!

काळ्या पिल्लाचे मुखमार्जन दुपारीच आटपले होते. त्यामुळे आता तो

खुषीत येऊन खेळत होता. एका गलेलठ्ठ उंच खुर्चीत जाई आंग मोडून बसली होती आणि लोकरीचा गुंडा उचकटला होता तो गुंडाळीत होती. तर काळ्या, जमिनीवर लोळणाऱ्या गुंड्याचा चेंडू करून खेळत होता. त्यामुळे गुंडाळलेली सर्व लोकर फिरून उलगडत होती. एव्हाना चटईवर लोकरच लोकर पसरली होती. तिचा एवढा गुंता झाला होता आणि त्यात इतक्या गाठी बसल्या होत्या, की बोलायची सोय नाही. आणि त्या गुंतावळ्यात भर



म्हणून काळ्याने आपले शेपूट मिसळून दिले होते. इतकेच नाही तर ते शेपूट पकडण्यासाठी तो गरगरा गरगरा फिरत होता.

"दुष्टा—चांडाळा !" जाई किंचाळली आणि त्याच्यावर आपण रागावलो आहो हे दाखवण्यासाठी त्याला उचलून तिने त्याचा सडकून पापा घेतला. "खरंच– या ठिकरीनं तुला काही म्हणता काही रीतभात शिकवली नाही. अगदीच ठोंब्या आहेस !– ठिकरे–" असे म्हणत तिने आपल्या रागाचा मोर्चा आता पिल्लांच्या आईकडे वळवला. आपला आवाजही तिने आता

शक्य तितका चढवला. " ठिकरे ! " ती खेकसली, " तुला एवढंसुद्धा कसं ग कळत नाही ? "

आणि मग पुन्हा, एका हातात काळ्याला नि दुसऱ्या हातात तो लोकरीचा गुंडा घेऊन ती पुन्हा खुर्चीत चढून बसली आणि पुन्हा लोकर गुंडाळण्याचे काम सुरू झाले. पण काम झरझर उरकेना; कारण ती सारखी बोलत होती— मध्येच मांजराशी, तर मध्येच स्वतःशी. मांजरू आपले निमूटपणे तिच्या मांडीवर बसले होते आणि गुंडाळण्याची क्रिया पाहात होते. मधूनच ते आपला एक पंजा पुढे करी आणि लोकरीला हळूच स्पर्श करून पाही. जणू काही त्याला म्हणायचे होते, " मी करू का मदत ? "

" उद्या दिवस कोणता, माहीत आहे का काळ्या तुला ? " जाई म्हणत होती. " मघाशी माझ्याबरोबर खिडकीत बसला असतास, तर लक्षात आलं असतं तुझ्या ! पण आईसाहेब तुझा नट्टापट्टा करीत होत्या ना, मग लक्ष द्यायला तुला वेळ होणार कुठं ? मी मात्र खिडकीशी बसून पाहात होते– मुलं होळीसाठी लाकूडफाटा गोळा करीत होती. थोडी का लागतात लाकडं होळीला ? इकडनं तिकडनं फळकुटं जमा करताना बिचारे थकून गेले. त्यात आणखी पाऊस सुरू झाला. विचार कर काळ्या– या शिमग्याच्या दिवसांत पाऊस ! कुणी ऐकलं होतं का कधी ? शेवटी बिचाऱ्यांना घरात पळावं लागलं !– ते काही असो म्हणा ! उद्या होळी पाहायला जायचं आपण– बरं का काळ्या ? " हे बोलता बोलता जाईने लोकरीचे दोनतीन वेढे काळ्याच्या मानेभोवती दिले– कसे दिसते ते पाहावे म्हणून,– पण तेवढ्यात काळ्याने इतकी दंगामस्ती केली, की गुंडा परत खाली पडला आणि जमिनीवर लोळ-पटला. मग लोकर सुटायची थोडीच राहते ? पुन्हा आपली शेकडो वार लोकर उलगडली.

ती सगळी परत गुंडाळून खुर्चीत बसेपर्यंत जाईचा किती तरी वेळ मोडला. शेवटी बसली एकदाची, आणि म्हणाली, " काळ्या ! आत्ता मला तुझा इतका संताप आला होता म्हणून सांगू–एकदा तर मी जवळजवळ ठरवलं, की खिडकी उघडावी अन् तुला बाहेरच्या पावसात फेकून द्यावं ! तुझ्यासारख्या वाभरट पोराला साजेशीच शिक्षा झाली असती ती !—काय रे ? आता का दातखीळ बसली ?– पण थांब ! एवढ्यात नको बोलूस

काही ! तुझ्या दुष्कृत्यांचा पाढाच वाचणार आहे मी. मध्ये अडथळा न आणता तो ऐकून घे ! " आणि जाईने आपली डाव्या हाताची करंगळी उजव्या हाताच्या बोटाने दाबली. " गुन्हा नंबर एक : सकाळी ठिकरी तुझं तोंड धूत होती, तेव्हा दोन वेळा तू ' म्यांव ' म्हणून किंचाळलास. कबूल न करून चालणारच नाही तुला. मी माझ्या कानांनी ऐकलंय !—काय म्हणालास ? ( जणू काही मांजर काही तरी बोलते आहे अशी कल्पना करून ) तिचा पंजा तुझ्या डोळ्यात गेला ? मग त्यात तिचा काय दोष ? तू डोळे उघडे ठेवलेस ही तुझी चूक आहे ! घट्ट मिटून ठेवले असतेस तर असं झालं नसतं. आता आणखी सबबी सांगत बसू नकोस. मी काय सांगते ते कान देऊन ऐक—अपराध नंबर दोन : हिमीच्या पुढं मी दुधाची वशी ठेवली, तेव्हा तू तिची शेपूट धरून तिला ओढलंस !—काय म्हणतोस ? तुला तहान लागली होती ? आणि तिला कशावरून नव्हती लागली ? अपराध नंबर तीन : माझं लक्ष नाही असं पाहून लोकरीचा सबंध गुंडा तू उचकटून ठेवलास !

" तीन गुन्हे झाले तुझे, आणि त्यांतल्या एकाही गुन्ह्याबद्दल तुला शिक्षा झाली नाही !—का ? माहीत आहे ? कारण तुझ्या सगळ्या शिक्षा मी राखून ठेवते आहे—बुधवारसाठी ! बुधवारी सगळ्याचा वचपा काढायचा !—खरंच... " आणि आता जाई मांजराशी बोलण्याऐवजी स्वतःशीच बोलू लागली—" माझ्या शिक्षा पण या लोकांनी अशाच साचवून ठेवल्या असत्या तर ? वर्षाच्या अखेरीस काय झालं असतं ? मला वाटतं, तुरुंगात तर नक्कीच घातलं असतं मला त्यांनी.—किंवा समजा, शिक्षा निराळ्या प्रकारची असती तर ? म्हणजे प्रत्येक गुन्ह्याबद्दल एक जेवण कटाप ! आणि सर्व शिक्षा एकाच वेळी भोगायच्या ! वर्षाच्या अखेरीस एकदम पन्नास जेवणं कटाप झाली असती की !—अर्थात त्याचं एवढं वाटलं नसतं म्हणा—कारण इतकी जेवणं एकदम खाण्यापेक्षा ती न मिळालेलीच बरी !

" खिडकीच्या काचांवर पाऊस कसा वाजतोय, पाहिलंस ? कसा मऊ मऊ तुकूतुकू आवाज येतोय ! जसा काही खिडकीचा पापाच घेतोय कुणी तरी ! का रे काळ्या, तुला काय वाटतं ? पाऊस असा मुरूमुरू खिडकीचे पापे घेतो त्याचं कारण काय असेल ? त्याला खिडकी आवडते म्हणून, खरं

की नाही? आणि नुसता पापे घेऊन थांबत नाही तो. धुक्याचं मऊ मऊ मजेदार पांघरूण घालतो या खिडकीला, घराला, शेताला! म्हणतो कसा— 'गाई गाई! बाळांनो! गाई करा हं!' उठायची वेळ झाली, की सूर्यदादा उठवील तुम्हांला.— आणि खरंच, सूर्य उगवला, उन्हं पडली, की सगळीजणं कशी अंग झटकीत जागी होतात. नाचायला लागतात वाऱ्यावर!— आऽहा! किती सुंदर दिसतो तो देखावा!" असे बोलत बोलत टाळी वाजवण्यासाठी जाईने हातातला गुंडा खाली टाकला.

"आणि खरंच—" ती म्हणाली, "हे अगदी खरं असणार असं वाटतं मला! थंडीत झाडं झोपा काढतात, पावसाळ्यात चरतात, अन् उन्हाळ्यात नाचतात, बागडतात!

"तुला बुद्धिबळं येतात का रे काळ्या?— हसू नकोस वेंधळ्यासारखा! मी चेष्टा करीत नाही, खरं विचारते आहे!— कारण मधाशी जेव्हा आम्ही खेळत होतो, तेव्हा तू टकाटका पाहात होतास. म्हणून विचारलं. जसं काही आपल्याला कळतंय असा बघत होतास तू! आणि मी जेव्हा 'शह' म्हणून ओरडले तेव्हा तू कसं 'गुर्र' केलंस. होताच मुळी मस्त शह! आणि काळ्या, मी जिंकलेसुद्धा असते. पण तेवढ्यात मेला तो घोडा आला ना अडमडत! त्यानं सगळा माझा डाव उधळून लावलान्! कसचा शह नि कसचं काय?— ए काळ्या, आपण असं करायचं का?——"

आणि झालं! जाईच्या कल्पना सुरू झाल्या. कालच या बाबतीत तिचा नि तिच्या ताईचा वाद झाला होता. जाईची ताई म्हणजे मोठी हिशेबी मुलगी. 'आपण असं करायचं का—' अशी सुरुवात करून जाई कल्पनेचे मनोरे रचायला लागली, की तिला भारी राग यायचा. काल काय बरं म्हणाली होती जाई?— हो, 'आपण राजे-राण्या होऊ या का?' आणि तिच्या ताईनं लगेच ते खोडून काढलं. बरोब्बर उत्तर दिलंन् तिनं. ती म्हणाली, 'ते शक्य नाही. आपण दोघंच तर आहोत. मग **राजे नि राण्या** एकदम कशा होणार आपण?' खरं होतं ते. जाईला ते मानावंच लागलं. आणि शेवटी म्हणावं लागलं, की 'बरं तर! तू त्यांतलं एक कुणी तरी हो. बाकीची मी होते,' आणि एकदा तर असंच काही तरी कल्पनेतलं बोलून आपल्या म्हाताऱ्या मोलकरणीला तिनं घाबरवलं होतं. तिच्या मुळी कानातच

ओरडली ही– ‘रखमा ! आपण अशी कल्पना करू, की मी आहे जसं काही भुकेलेला तरस, आणि तू आहेस जशी काही हाडूक !’

पण जाऊ द्या ! हे विषयान्तर झालं. म्हणजे आपला विषय होता ‘जाईचं मांजराशी भाषण.’ आणि म्हणता म्हणता आपण स्वतःच भाषणं करायला लागलो की !

तर– जाई मांजराला म्हणत होती– “काळ्या ! आपण असं करू या का ?– समजा, तू आहेस बुद्धिबळांतला वजीर. किंवा– हल्ली इंग्रजी डाव खेळतात, त्यात वजीर नसतो, क्वीन असते !– मग काळ्या, तू **राणी** होशील का रे ?– अरे, लाजतोस काय एवढा ? छान राणी शोभशील की तू ! पोरीसारखा नाजूक तर आहेस ! जरा नीट उठून बैस, पोक्त बन, हातांची घडी घाल. म्हणजे हुबेहूब राणी वाटशील !– ए, करच गडे प्रयत्न. पाहू तुला जमतं का ते ?” आणि जाईने चौरंगावरची काळी राणी उचलली अन् मांजराच्या पुढ्यात ठेवली, पण– अरेरे ! एवढे तिने केले तरी काही उपयोग झाला नाही त्याचा ! काळ्या नीट बसला नाही, की त्याने हातांची घडी घातली नाही. काहीसुद्धा नाही ! आता आली की नाही शिक्षा करण्याची पाळी ? तशी जाईने त्याला उचलले अन् आरशापुढे धरले. “कसं हट्टी नि तिरसट थोबाड केलं आहेस, बघ— !” जाई म्हणाली. “आणि आता जर तू शहाण्यासारखा वागला नाहीस ना काळ्या– तर मी सरळ तुला या आरशाच्या घरात कोंबीन. आरशाचं घर म्हणजे आरसेमहाल ! आवडेल का तुला तिथं जायला ?

“हो– खरंच गडे काळ्या ! तू जर कान देऊन ऐकशील ना, तर आरसे-नगरीबद्दल तुला खूप खूप सांगेन मी !– म्हणजे माझ्या कल्पना, बरं का ? पहिली गोष्ट म्हणजे ती खोली. तुला आरशात दिसते ना– ती खोली. आपल्या या बैठकीच्या खोलीसारखीच आहे. फक्त सगळं उलटं ! मी खुर्चीवर उभी राहिले, की मला सगळं दिसतं आतलं.

“फक्त सैपाकघराचा भाग आपल्याला थोडासा दिसतो ना, तोच तेवढा आरशात दिसत नाही. तोही दिसला असता तर बरं झालं असतं, असं नाही वाटत तुला ?– म्हणजे कळलं असतं रे, त्यांच्याकडे चूल आहे की नाही– ती ते पेटवतात की नाही, कधी पेटवतात, वगैरे वगैरे. पण त्यांचंही

सैंपाकघर आहे म्हणे. सैंपाकघरात चूल आहे. आपण चूल पेटवली, की धूर निघतो ना, त्याच वेळी त्यांच्याही चुलीतून धूर निघतो म्हणे !– कदाचित तो खरा धूर नसेल म्हणा. आपल्याला बनवीत असतील ते. तुमच्यासारखी आमच्याकडे पण चूल आहे असं नुसतं भासवायचं !– आणि, वरं का काळ्या– त्यांच्याकडे आपल्यासारखी पुस्तकं पण आहेत. फक्त त्यांतले शब्द सगळे उलटे असतात. थापा नाही मारीत मी, काळ्या. अगदी खरं आहे हें. आरशापुढं पुस्तक धरून बघितलंय मी आणि त्याच वेळी त्यांनी पण तसलंच पुस्तक धरलं. आणि मी पाहते तो, प्रत्येक अक्षर उलटं !

"तुला कसं वाटेल काळ्या, आरसेनगरीत राहायला ? तिथं तुला दूध देतील का पण ? कदाचित आरसेनगरीतलं दूध आपल्या दुधाइतकं चांगलं नसेल– म्हणजे पिण्यायोग्य नसेल.– ए काळ्या ! इकडे बघ, हा बोळ— खोलीच्या बाहेरची ती बोळकंडी दिसते तुला जरा जरा ? असा इकडनं बघ !– हं, दार उघडं आहे म्हणून दिसतं, खरं की नाही ? अरे वा, बोळ पण आपल्या बोळासारखाच आहे की ! पण कुणास ठाऊक– त्याचं दुसरं टोक आपल्याला दिसत नाही. तो भाग कदाचित निराळा असेल.– ए काळ्या, खरंच आपल्याला जर आरशात उतरता आलं, तर कित्ती मज्जा येईल, नाही ? माझी खात्री आहे, की हा आरसेमहाल खूप खूप छान असेल. छान छान वस्तू असतील तिथं. ए आपण गडे कल्पना करू या– की, कसं तरी करून आपण त्या आरसेमहालात शिरलो: ही कठीण काच म्हणजे मच्छरदाणीसारखी मऊ आहे असं समजू आपण– अय्या ! खरंच मऊ लागते की. आणि आता तर आणखी आणखी मऊ होत चालली ! विरळ–विरळ– धुकंच जसं काही !– या धुक्यातून सहज जाता येईल की– अय्या—"

आणि बोलता बोलता आपण आरशाच्या टेबलावर कधी चढून बसलो तेही जाईला कळले नाही. आणि तसे म्हणाल, तर आरसा तरी होता कुठे जागेवर ? विरघळत चालला होता तो. पांढरं धुकं कसं विरतं तसा.......

आणखी एकदोन क्षणांत जाई आरशातून आत शिरली. अगदी हलकेच, तुपुकदिशी तिने आरसेमहालात उडी मारली.

आणि आत शिरल्याबरोबर तिने पहिली गोष्ट कोणती केली, माहीत आहे ? सैंपाकघरात चूल आहे का ते पाहिले.

होती की हो ! तिथे पण चूल होती. चांगली धडधडून पेटलेली होती. अगदी जाईच्या सैपाकघरात होती तशी. जाईला तो जाळ पाहून फार बरे वाटले. 'नाही तरी होळीचे दिवस आहेत हे' ती आपल्याशी म्हणाली, 'जाळ पाहिला की बरं वाटतं !'—आणि ओहो ! आता घरातली मंडळी जेव्हा आरशातून आत बघतील ना, तेव्हा त्यांना कित्ती गंमत वाटेल ! ते म्हणतील, अय्या !-किंवा अरेच्या ! जाई कशी गेली आरशाच्या आत ! पण मला हात लावायला जातील, तेव्हा चांगली फजिती होईल त्यांची ! आता थोडीच मी त्यांच्या हाताला लागते !

आणि मग जाई आपल्या अवती भवती पाहू लागली. आणि तिला असे आढळले, की त्या जुन्या खोलीतून आरशात ज्या ज्या वस्तू दिसत असत त्या काय, नेहमीच्याच. साध्यासुध्या, फुसक्या. पण इथं प्रत्यक्ष पाय ठेवल्यावर काही निराळंच दिसतंय, बरं का ! उदाहरणार्थ : भिंतीवर टांगलेली ती चित्रं बेटी जिवंतच वाटतात. आणि कपाटावरचं ते घड्याळ. आरशाच्या बाहेरून पाहिलं, की त्याची फक्त कडेची बाजू दिसायची, इथे त्याचा संपूर्ण चेहरा पाहता येतोय. छोट्या चिंगुल्या म्हाताऱ्याचा चेहरा वाटतोय तो. आणि बघतोय पाहा कसा दात विचकून आपल्याकडे !

'इथं आमच्या खोलीतल्यासारखी टापटीप मात्र दिसत नाही !' जाई स्वतःशी म्हणाली. तिचे लक्ष भुईवर अस्ताव्यस्त पसरलेल्या बुद्धिबळांतल्या सोंगट्यांकडे गेले होते. त्यांतली काही मोहरी तर सैंपाकघरात चुलीपुढच्या राखेत पडली होती. पण तेवढ्यात पुन्हा जाईला आश्चर्याचा धक्का बसला आणि ती उद्गारली, "अय्या !" दुसऱ्याच क्षणी खाली वाकून तिने गुडघे टेकले अन् ती त्या सोंगट्यांकडे लक्षपूर्वक पाहू लागली. मोहरी इकडे तिकडे हिंडत होती— हातांत हात घालून जोडीजोडीने !

"हे आले काळे राजेसाहेब अन् काळ्या राणीसाहेब !" जाई पुटपुटली. (कारण आपण मोठ्याने बोल्लो, तर ती बिचारी भितील असे तिला वाटले.) "आणि ते पाहा, गोरे राजेसाहेब अन् त्यांची राणी त्या उलथन्यावर चढून बसलेत ! आणि हे दोन हत्ती कुठं निघालेत एकमेकांचा हात धरून ?—इश्श, कसले ग बाई गोटोळे हात ते. धरता तरी कसे येतात ?— माझं बोलणं यांना ऐकू तर येत नसेल !"—जाई पुटपुटली, "बाकी नसेलच येत

म्हणा. आणि–( अगदी खाली भुईला डोके लावून ) त्यांना दिसतसुद्धा नसेन मी. पक्की खात्री आहे माझी! कसं काय कुणास ठाऊक, पण मला आपलं असं वाटतंय की, आपण अदृश्य होतोय की काय?—"



इतक्यात जाईच्या पाठीमागे जो चौरंग होता, त्याच्यावरून कोणी तरी 'किच् किच्' असा आवाज केला. ते ऐकून जाई पटकन् मागे वळली आणि तिला एक पांढरे प्यादे खाली कोसळलेले दिसले. पडल्या पडल्या त्याने जेव्हा लाथा घालायला सुरवात केली, तेव्हा जाई मोठ्या उत्सुकतेने आता

पुढे काय होते म्हणून पाहू लागली.

"माझ्याच पोराचा आवाज आहे तो !" राणीसाहेब ओरडल्या आणि राजेसाहेबांना धक्का देऊन इतक्या जोरात धावल्या, की त्यामुळे बिचारा राजा राखेत पडला.

"माझा बाळ तो !—राजबिंडा पोर !" चुलीच्या ओटीवर चढताना राणीने आक्रोश सुरू केला.

"राजबिंडा म्हणे !" राजा आपले दुखावलेले नाक चोळीत म्हणतो, "तुझा रे पोर कसला राजबिंडा !" आणि मग सगळ्या अंगाला राख लागली होती म्हणून त्याने अंग झटकले.

जाईला वाटले, आपण यांना काही तरी मदत केली पाहिजे. म्हणून तिने पटकन् राणीला उचलले आणि तिचे पोरटे रडत होते त्याच्याजवळ बसवले.

राणी बसली ती धापा टाकीतच. कारण एवढ्या सपाट्याने तिने हवेतून प्रवास केला होता, की त्यामुळे तिची अगदी दमछाक झाली होती. दोन मिनिटे ती आपल्या बाळाला कवटाळून नुसतीच बसली होती. हालणे नाही की बोलणे नाही.

मग एकदम तिने राखेत पडलेल्या राजाकडे पाहिले, आणि म्हणते कशी—"सावध राहा—सावध राहा !—ज्वालामुखी !"

"कुठचा ज्वालामुखी ?" राजाने विचारले, आणि एकदम चुलीकडे पाहिले. जणू ज्वालामुखी असलाच तर तो चुलीत असणार अशी त्याची खात्री होती.

"मला—वर उडवलंन्—त्यानं !" राणी पुन्हा धापा टाकीत म्हणते, "तु—तु—तुम्ही आपले—सरळ या, बरं का ? असे उडू नका—माझ्यासारखे !"

जाईने पाहिले, तो राजेसाहेब उठून जमिनीवर आले होते आणि चौरंगाचा पाय पकडून मोठ्या कष्टाने वर चढत होते. "काय हे वेड्या ?" जाई म्हणाली. "तुला कित्ती तरी तास लागतील असं चढायला ? मी करू का तुला मदत ?" पण राजाने तिच्याकडे पाहिलेसुद्धा नाही. त्यावरून त्याला ती खरोखरच दिसत नसावी. (की तिने त्याला अरे-तुरे म्हटलेले आवडले नाही ?)

तेव्हा मग जाईने आपण होऊनच त्याला उचलले. अगदी हळूच, अलगद. त्याचा दम कोंडू नये अशा बेताने. पण मग चौरंगावर ठेवण्यापूर्वी त्याचे अंग साफ करावे म्हणून तिने त्याला वर अधांतरी धरले अन् फुंकरा मारल्या.

बिचाऱ्या राजाची फारच चमत्कारिक स्थिती झाली. जाईचा हात तर त्याला दिसतच नव्हता. आपण असे अधांतरी कसे लटकू लागलो, त्याला काहीच कळेना. आश्चर्याने नि भीतीने त्याने डोळे फाडले अन् जिवणी वासली. ती इतकी की, जाईला ते दृश्य पाहून हसू आवरेना. ती पोट धरधरून हसत सुटली आणि तिचा हातही त्यामुळे इतका हालला की, राजेसाहेब अगदी पडायच्या बेतात होते. तिने कसेबसे त्यांना सावरले.

"अशी वेडीवाकडी तोंडं करू नका हो!" जाई ओरडली. त्याला आपले बोलणे ऐकूच जात नाही हे ती विसरली होती. "इतकं हसवलंस तू मला– की मी तुला पाडणार होते आत्ता!–आणि हे बघ–असा आ वासून बघू नकोस एकसारखा. नाही तर सगळी राख तोंडात जाईल!– हं! आता पुष्कळ स्वच्छ झालास." आणि असे म्हणून तिने त्याच्या केसांवरून हात फिरवला अन् त्याला चौरंगावर राणीच्या शेजारी ठेवले.

राजा ताबडतोब पाठीवर उताणा पडला अन् गप्प झाला. हालणे नाही, चालणे नाही,– चिडीचूप. मग मात्र जाईला भीती वाटली आणि ती खोलीत इकडे तिकडे फिरून कुठे पाणी मिळते का म्हणून पाहू लागली. पण तिला फक्त एक शाईची बाटली सापडली. तेव्हा ती बाटलीच घेऊन जाई पुन्हा चौरंगाकडे आली. पाहते तो राजेसाहेब तेवढ्यात उठून बसले होते आणि राणीशी त्यांची काही तरी बातचीत चालली होती. मात्र इतक्या हलक्या आवाजात, की जाईला त्यातले अक्षरही ऐकू गेले नाही.

राजा म्हणत होता, "राणीसाहेब, काय सांगू तुम्हांला! मी इतका घाबरलो, की माझी दाढी पांढरी झाली!"

"महाराज, तुम्हांला दाढी आहेच कुठं?" राणीसाहेब म्हणाल्या.

"किती भयंकर तो क्षण! यावज्जन्मात मी तो विसरणार नाही."

"विसराल, महाराज" राणीसाहेब म्हणाल्या. "डायरीत टिपून ठेवा ते बरं."

जाई कुतूहलाने पाहू लागली, तो राजेसाहेब आपल्या आंगरख्याच्या


खिशात हात घालून एक लठ्ठ डायरी काढीत होते. लगेच डायरी उघडून तीत त्यांनी काही तरी नोंद करायला सुरुवात केली. पण पेन्सिल इतकी मोठी होती, की तिचे मागचे टोक त्यांच्या खांद्यावरून मागे आले होते. जाईला वाटले, आपण याला हातभार लावू या. आणि तिने दोन बोटांत ते टोक धरले अन् पेन्सिल हालवायला राजाला ती मदत करू लागली.

राजेसाहेब बुचकळ्यात पडले. काही वेळ त्यांनी पेन्सिल नुसतीच हालवली. ते काही बोलले नाहीत. पण जाईची ताकद खूप. त्यामुळे राजेसाहेबांची पंचाईत झाली. ते धापा टाकीत म्हणाले, “ हा–हा ! छे बाबा ! एवढी जाड पेन्सिल झेपत नाही आपल्याला. एक बारीक पेन्सिल आणली पाहिजे. ही जाडी बया काही तरीच खरडतेय–मला नको नको ते—”

“ नको नको ते म्हणजे कसं ? ” असे म्हणून राणी उठली अन् डायरीवर ओणवून वाचू लागली—( जाईनेच लिहिले होते ते. )

“ पांढरा घोडा पळीच्या दांड्यावरून घसरतो आहे. त्याला तोल संभाळता येत नाही.–छट् ! हे काही तुमच्या मनातलं दिसत नाही; महाराज, ही भलतीच नोंद केलीत तुम्ही ! ”

जाईच्या शेजारी टेबलावर एक पुस्तक पडले होते. गोऱ्या राजाकडे ती टक लावून पाहात होती; (कारण तिला सारखे भय वाटत होते, की हा पुन्हा बेशुद्ध पडतो की काय ? तिने शाईची बाटली हातात तयार पण ठेवली होती ) त्याच वेळी एकीकडे ती पुस्तकाची पाने उलटीत होती. पुस्तकातले काही वाचता येते का म्हणून मध्येच ती पाही, पण तसे काही म्हणता काही आढळेना. “ हे सगळं– ” ती म्हणाली, “ भलत्याच कुठल्या तरी भाषेत आहे. मला नाही कळत ही भाषा ! ”



काही वेळ जाई अगदीच बुचकळ्यात पडली होती. मग तिच्या डोक्यात एकदम एक कल्पना तडकली.

"बरोबर!" ती म्हणाली, "हे आरशातलं पुस्तक आहे. त्यातला एकूण एक अक्षरं उलटी आहेत. पण आरशापुढं धरलं, की येईल वाचता ते!"

आणि तिने आरशापुढे पुस्तक धरले अन् आरशात दिसणारा मजकूर वाचला. तो असा होता—

**डपेटले ती डडून तेथे**
**ढईत उळती लवे सुरेख**
**अतिचळवळती अतिचडमडती**
**ळंडुर वाजवि ळगोड ळंदर**

**—कान्त**

"छान आहे." कविता संपूर्ण वाचून झाल्यावर जाई म्हणाली, "पण समजायला अमळ कठीणच. ('अमळ' कसले? जाईला अजिबात त्यातले काही कळले नव्हते. पण तसे कबूल करील तर ती जाई कुठली?) हे वाचून कित्ती कित्ती कल्पना डोक्यात धुडगूस घालताहेत! पण मेल्या त्या काय काय कल्पना आहेत तेच नीट कळत नाही! पण असो— एवढं तर नक्कीच, की खूप चळवळ झाली, भांडण झालं, आणि—"

"अरे, पण मी अशी काय बसले आहे बडबड करीत!" जाई एकदम म्हणाली आणि ताडदिशी उठून उभी राहिली. "मी जर घाई केली नाही, तर हा आरसेमहाल सबंध पाहून होणार कसा? आणि मग उशीर झाला, की तसंच आरशातून परत आमच्या घरी जावं लागेल!—ते काही उपयोगाचं नाही!—चला, आधी या घराची बाग पाहू या." असे म्हणून ती खोलीच्या बाहेर पडली आणि दडदडा धावत जिना उतरून खाली गेली. किंवा— खरे म्हणजे ते धावणे नव्हतेच. मुळीच त्रास न पडता चटकन् खालचा मजला गाठण्याची एक नवीनच पद्धत तिने शोधून काढली होती. काय केले तिने, माहीत आहे? हाताची बोटे जिन्याच्या कठड्याला जेमतेम टेकली. आणि झाले! पायऱ्यांना पायसुद्धा न टेकता ती सुळकन् खाली

आली— तरंगत घसरत. मग अशीच तरळत ती बाहेरच्या खोलीत गेली अन् तिथून वरांड्यात जाऊन हां हां म्हणता बाहेरसुद्धा पडली असती. पण तेवढ्यात वाटेतला खांब तिने पकडला अन् ब्रेक लावल्यासारखी ती उभी राहिली. हवेतून सारखे तरळत आल्यामुळे तिला गरगरल्यासारखे झाले होते. त्यामुळे आता नेहमीसारखे चालायला मिळताच तिला खूप खूप बरे वाटले.

## २

"त्या टेकडीवर चढून पाहिलं तर कदाचित बाग चांगली दिसेल" जाई आपल्याशी म्हणाली. "आणि ही पाहा—एक वाट जातेच आहे की तिकडे !— अं हं ! ही वाट तर— (थोडीशीच पावले चालली होती जाई, आणि तरी तेवढ्यात तिने कित्ती वळणे घेतली होती)— खरोखर जाते ही वाट तिकडे, की नाही ? पण मला वाटतं, कितीही वेडीवाकडी वळली तरी शेवटी जाईलच.— अग बाई ! हे काय ? शेवटी मी आपली घराकडेच आले की !— मग ? आता हा दुसरा रस्ता पाहू या..."

आणि मग जाई दुसऱ्या रस्त्याने जाऊन आली. तरी पुन्हा तोच प्रकार ! वळणांमागून वळणे घेऊन पुन्हा आपली घरापाशी हजर ! आता काय करावे ? एकदा तर, शेवटचे वळण तिने जरा झपाट्याने घेतले आणि त्याचा परिणाम काय झाला; घर पण इतक्या सपाट्याने पुढ्यात आले, की जाई त्याच्यावर आपटलीच म्हणा ना !

"छे छे ! ती गोष्टच काढू नकोस !" जाई डोळे वटारून घराकडे पाहात म्हणाली. जसे काही घरच तिच्याशी वाद घालीत होते ! "मी

एवढ्या लवकर मुळीच घरात येणार नाही. कारण—मला माहीत आहे—एकदा घरात शिरलं, की मला आरशातून परत तिकडे जावं लागेल—जुन्या घरात. मग कुठचा हा आरसेमहाल अन् कुठची ही मजा-मजा!”

आणि असे म्हणून जाईने खंबीरपणे घराकडे पाठ फिरवली अन् पुन्हा समोरच्या वाटेने निघाली ती. तिने आता पक्का निश्चय केला होता, की असेच सरळ नाकासमोर जात राहायचे. ती टेकडी येईपर्यंत थांबायचेच नाही.

चालली जाई. झपाझप झपाझप. बराच वेळपर्यंत काही घडले नाही. ठीक नाकासमोर चालली होती ती; अन् स्वतःशी म्हणत होती, “आता मात्र मी नक्कीच—” पण ते वाक्य पुरे होण्याच्या आधीच रस्त्याने एकदम सपाट्याचे वळण घेतले आणि असा झडझडून हाल्ला तो—(रस्ता बरं का? निदान जाईने पुढे ही आठवण सांगितली ती अशाच शब्दांत) की एकदम घर तिच्या पुढ्यात येऊन आपटले! जाईने पाहिले तो आपण चक्क उंबरठ्यावर उभ्या आहो!

“छी छी! हे नाही उपयोगाचं!” जाई म्हणाली. “कसलं बाई घर हे? जिथं जावं, तिथं आडवं येणारं असलं निर्लज्ज घर साऱ्या जगात नसेल दुसरं! इथंही आहेच उभं!” आणि मग तिला वाटले, हा काय घोटाळा केला आपण? एकदा म्हणतो, घर आडवं आहे—एकदा म्हणतो, ते उभं आहे!

पण ते काही असो. टेकडी अजून होती तिथे होतीच की. तेव्हा जाईने ठरवले, जेहेत्ते फिरून यत्न करून पाहा.

आणि पुन्हा निघाल्या जाईसाहेब. या खेपेस तिला एक खूप फुलझाडांचा वाफा लागला. त्या वाफ्याच्या काठाकाठानं डेझीची झाडे लावलेली होती आणि मध्यभागी होती एक खूप उंच कण्हेर. जाई त्या फुलझाडांकडे पाहात चालली होती, इतक्यात वाऱ्यावर डुलणारी एक लिली तिच्या अगदी जवळ वाकली अन् हलकेच जाईच्या अंगाला तिने स्पर्श केला.

तेव्हा जाई एकदम बोलून गेली, “कित्ती ग गोड आहेस तू, लिले! तुला माझ्याशी बोलता येतं, तर कित्ती छान झालं असतं!”

आणि मजा अशी, की—

"येतं की आम्हांला बोलता!" लिली एकदम म्हणाली. "कुणी बोलण्याजोगं भेटलं, की बोलतो आम्ही."



जाईला इतका चमत्कार वाटला, की एक मिनिटभर ती नुसती आ करून पाहात राहिली. तिला श्वाससुद्धा घेता येईना. मग जेव्हा लिली परत वाऱ्यावर

डुलायला लागली, तेव्हा जाई पुटपुटली, “सगळी फुलं बोलतात?”

“सगळी!” लिलीने उत्तर दिले. “तू जितकं बोलतेस, तितकंच आम्हीही बोलतो. आणि तुझ्याहून मोठ्यांदा!”

“पण म्हटलं, रीतीभातीसुद्धा कळतात आम्हांला!” गुलाबाने मध्येच तोंड घातले, “तू मुळीच तोंड उघडीनास, मग आम्ही कसं आधी बोलावं?— मी तर स्वतःशी म्हटलंसुद्धा— ‘चेहऱ्यावरून ही अगदीच काही बिनडोक वाटत नाही. पण फारशी हुशार असेल, असंही दिसत नाही.’ पण तुझा रंग बरा आहे. बरा म्हणजे काय— उत्तमच! म्हणजे नुसत्या रंगावर मारून नेशील तू!”

“गोरी नि शंभर फुलं चोरी!” एक झेंडू बोलला.

“त्या रंगाबिंगावर माझा विश्वास नाही म्हणा!” लिलीने आपले मत दिले. “पण हिच्या पाकळ्या फार फताड्या आहेत. जरा मिटलेल्या असत्या, तर मी हिला पास केलं असतं.”

ही त्यांची टीका जाईला मुळीच आवडली नाही. म्हणून विषय बदलण्यासाठी तिनेच प्रश्न विचारायला सुरुवात केली—

“तुम्हांला कधी कधी भीती वाटत नाही का रे, फुलांनो? इथं असं तुम्हांला रोवून ठेवलेलं— तुमच्याकडे लक्ष द्यायला पण कुणी नाही—”

“आहे की! ते मध्यभागी मोठं झाड दिसतं ते-” गुलाब म्हणाला. “ते असं संत्र्यासारखं उभं आहे, ते कशाला मग?”

संत्र्यासारखं? जाईने पाहिले तर एक वृक्ष होता खरा मध्यभागी उभा. पण तो संत्र्यासारखा मुळीच नव्हता. ते काही मोसंब्याचे झाड नव्हते; किंवा पपनसाचे नव्हते, किंवा लिंबाचे नव्हते; किंवा इडनिंबाचे पण नव्हते. मग संत्र्यासारखं म्हणजे काय?

‘हं! बरोबर!’ जाई आपल्याशी म्हणाली, ‘आता आलं लक्षात. मला हा शब्द गेलेला आहे. संत्री म्हणजे पहारेकरी, नाही का? गुलाबाला असं सांगायचंय की, हे झाड पहारेकऱ्यासारखं उभं आहे. पण— पण—’

“पण मग—” ती मोठ्याने म्हणाली, “हे पहारा कसा करणार? त्याला तर जागचं हालता येत नाही.”

“पण भुंकता येतं की!” गुलाब म्हणाला.

“भॉक्– भॉक् करतं ते.” मधाच्या झेंडूने सांगितले, “म्हणून त्याला भोकराचं झाड म्हणतात.”

“एवढंसुद्धा माहीत नव्हतं तुला?” दुसऱ्या एका झेंडूने तिला छेडले. “ए हे रे!” आणि लगेच सर्वांनी एकदमच तिची हुर्यो करायला सुरुवात केली. त्यामुळे एवढा कलकलाट अन् किचकिचाट झाला की, बोलायची सोय नाही.

“खामोष!” लिली ओरडली. तिला इतका संताप आला होता की, तिचे अंग कापत होते अन् एकदा इकडे नि एकदा तिकडे असे वाकत होते. “गप्प बसा सगळीजणं! हा काय मासळीबाजार आहे?” आणि मग ती आपल्याशीच म्हणते, “यांना माहीत आहे, की माझा काही त्यांच्यापर्यंत हात पोचू शकत नाही. म्हणून अशी बेफाम वागतात.” जाईकडे वळून लिली म्हणाली, “एरवी त्यांची छाती झाली नसती.”

“जाऊ द्या हो, लिलूबाई!” जाई तिची समजूत घालीत म्हणाली. आणि मग खाली वाकून ती झेंडूंना दटावून हळूच म्हणाली, “तुम्ही जर गप्प बसला नाहीत, तर एकेकाला तोडीन बरं का मी!”

लगेच सगळीकडे सामसूम झाली. झेंडूच्या किती तरी फुलांचा रंग फिका पडत पडत शेवटी पांढराफटक बनला.

“हे ठीक झालं.” शेवंती म्हणाली.

“ही झेंडूबाळं सगळ्यांत वाईट! मेला एक बोलायला लागला, की सगळे कलकल करतात. त्यांचा तो गोंगाट ऐकून आमच्यासारख्या जागच्या जागी सुकायच्या एखाद वेळेस!”

“इतकं कसं हो तुम्ही छान बोलता?” जाई म्हणाली. खरे म्हणजे ती तिला हरभऱ्याच्या झाडावर चढवीत होती. “मी आतापर्यंत कित्ती तरी बागांतून हिंडले आहे. पण बोलणारी फुलं मी कधी पाहिली नव्हती.”

“तू आपला हात जमिनीला लावून बघ, म्हणजे कळेल.” लिली म्हणाली.

“पाहिला लावून.” जाई तसे करून म्हणाली, “जमीन खूप टणक आहे. पण त्याचा काय इथं संबंध?”

“बाकीच्या बागांतून–” लिलीने खुलासा केला, “जमीन फार मऊ करतात–खतं घालून, खुरपून. त्यामुळे फुलांना सारख्या झोपा लागतात. तुला

ते सुभाषित माहीत आहे ना?—मऊ मऊ बिछान्यावर गाई येतं छान!"

हे कारण तसे पटण्यासारखे होते. जाईचे ते ऐकून समाधान झाले. "मला नव्हतं हे सुचलं कधी!" ती म्हणाली.

"माझं मत विचारशील," गुलाब कठोर स्वरात म्हणाला, "तर तुला कधीच काही सुचत नाही!"

"हिच्याइतका वावळट प्राणी मी कधी पाहिलेला नाही!" एक चिमुकला आवाज एकाएकी म्हणाला. जाईने चपापून त्याच्या दिशेने पाहिले. एक फिक्कट गुलाबी रंगाचे धायरीचे फूल गवतातून वर डोके काढून बोलत होते. इतका वेळ ते गवतात लपले होते वाटते.

"तू गप्प बस ग, धायरे!" लिली ओरडली. "जसं काही तुला कुणी दिसलंच आहे! आतापर्यंत सारखी गवतात नि पानात लपून तर बसली होतीस– डाराडूर घोरत! एखादी मिटलेली कळी अन् तू यांच्यांत फरक तरी काय ग?"

"माझ्याखेरीज आणखी कुणी लोकं आहेत का या बागेत?" जाईने विचारले. मघाशी गुलाबाने तिचा जो अपमान केला, तो तिने मुकाट्याने गिळला होता.

"बागेत आणखी एक फूल आहे, ते असंच तुझ्यासारखं हिंडतं फिरतं." गुलाब म्हणाला, "कसं काय तुम्हां लोकांना हे जमतं, तेच मला कळत नाही– ("कळतंय काय तुला?" लिली म्हणाली.) एवढंच, की ते फूल जास्ती काटेरी आहे!"

"काटेरी?"

"हो. काटे– किंवा लव म्हणा– जास्त आहे त्याच्या अंगावर."

"माझ्याचसारखं आहे का?" जाईने उत्सुकतेने विचारले. मनातून तिला सारखे वाटत होते, 'आपल्याच सारखी एखादी मुलगी तर नसेल इथं आलेली?'

"हं–" गुलाब विचार करीत म्हणाला, "आकार म्हणशील, तर तुझ्याचसारखा विचित्र. पण रंग मात्र काळा. पाकळ्या– मला वाटतं, लहान असतील तुझ्यापेक्षा. किंवा तिनं गुंडाळून घेतलेल्या असतील.

"त्या परदेशी डेलियाच्या असतात ना, तशा जवळजवळ चिकटलेल्या

पाकळ्या. तुझ्यासारख्या नाहीत– गुधडलेल्या !"

"अर्थात तो दोष तुझा नाही." गुलाबाने तिच्यावर दया दाखवीत म्हटले, "तू आता कोमेजायला लागली आहेस, खरं की नाही ? अशा वेळी पाकळ्या विस्कटायच्याच."

जाईला ती कल्पना मुळीच आवडली नाही. तेव्हा स्वतःचा विषय बदलून ती म्हणाली, "ती– दुसरी कोण म्हणता ती– इकडे या बाजूला येते का कधी ?"

"हो, येते की ! ती बघ आत्ताच येते आहे—" गुलाब म्हणाला.

जाईने पाहिले, तर ती एक काळी कुळकुळीत बाई होती. ती जास्त जवळ आली, तेव्हा जाईने तिला ओळखले. 'ती' बुद्धिबळातली काळी राणी होती !

"अरे, ही राणी आहे, बरं का ?" जाई सर्व फुलांना उद्देशून हलक्या आवाजात म्हणाली. अन् मग म्हणते, "बरीच वाढली आहे की !"

खरोखरच वाढली होती राणी. मागच्या खेपेस जाईने तिला पाहिले, तेव्हा ती चुलीपुढच्या राखेत लोळत होती. त्या वेळी तिची उंची फार तर तीन इंच असेल. आणि आता पाहावे, तर जाईपेक्षाही डोईभर उंच झाली होती !

"या मोकळ्या हवेचा परिणाम असणार." गुलाब म्हणाला, "इथली हवा फारच सुंदर !"

"मी बोलते जाऊन तिच्याशी–" जाई म्हणाली. कारण फुले कितीही छान असली, तरी राणी म्हणजे बडी असामी; साऱ्या राज्याची सत्ताधारीण ती ! तिला भेटावे, तिच्याशी बोलावे असे कुणाला वाटणार नाही ?

"छे छे ! त्या भानगडीत पडू नकोस तू." गुलाब म्हणाला, "तू आपली तिच्या विरुद्ध दिशेला जा !"

"का म्हणून ?" जाई म्हणाली. तिला हा सल्ला काहीतरीच वाटला. ती बेधडक राणीला भेटायला निघाली. पण आश्चर्य हे, की तेवढ्यात राणीसाहेब कुठे तरी गुप्त झाल्या, आणि जाई बघते, तर आपण आपली पुन्हा घराच्या दाराशी हजर !

आता मात्र ती चिडली. मागे झाली. तिने एकदा अवती भवती नजर फिरवून पाहिले. काळी राणी कुठेही दिसेना. शेवटी दिसली एकदाची. पण

किती–खूप खूप दूर दिसत होती ती. तिला गाठायला मधाच्या वाटेने जावे तर पुन्हा घोटाळा व्हायचा. त्यापेक्षा—

जाईने ठरवले, की या खेपेस आपण खरोखरीच विरुद्ध दिशेने जाऊ या. पाहू तर खरं हा प्रयोग करून.

आणि त्याप्रमाणे ती विरुद्ध दिशेने चालू लागली. आणि गंमत अशी की, एक मिनिटाच्या आत ती तिथे जाऊन पोचली.

काळी राणी तिच्या पुढ्यात उभी होती. आणि जी टेकडी गाठण्यासाठी तिने जंग जंग पछाडले होते, ती टेकडी पण तिथेच होती. राणीसाहेब तिच्या पायथ्याशी उभ्या होत्या.

"कुठुन आलीस ग बये तू?" राणीने विचारले. "आणि चाललीस कुठं? वर बघून नीट उत्तरं दे. बोट काय कुरकरतेस?"

जाईने तिच्या सर्व सूचना ऐकल्या; त्याप्रमाणे केले, आणि मग तिने आपली सर्व हकीगत सांगितली. ती म्हणाली, "अशी गंमत झाली अन् मी माझी वाट चुकले!"

"तुझी वाट?" राणीसाहेब खेकसल्या. "इथल्या सगळ्या वाटा सरकारच्या आहेत. म्हणजे आमच्या.तुला कुणी ही वाट आंदण दिली काय?–आधी तू आलीसच कशाला इकडे?– आणि हे बघ–" त्या एकदम मृदु आवाजात म्हणतात, "विचार करीत उभी राहतेस ना, तेव्हा मान अदबीनं खाली लववावी. म्हणजे पुढं घ्यायचा निरोप आधीच घेतल्यासारखा होईल. तेवढाच वेळ वांचला!"

"काहीतरीच." जाई पुन्हा नवल करीत स्वतःशी म्हणाली. पण एवढ्या मोठ्या राणीला तसे कसे सांगायचे? पण तिने आपल्याशीच ठरवून टाकले, की घरी गेल्यावर याची तालीम केली पाहिजे. मुजरा कसा करायचा –सलाम कसा करायचा– निरोप कसा घ्यायचा– आणि तो आधीच कसा घ्यायचा, वगैरे.

"उत्तर दे की!" राणीसाहेब पोलक्याच्या खिशातून घड्याळ काढीत म्हणाल्या, "उत्तर द्यायची वेळ झाली. आणि हे बघ–उत्तर देताना तोंड यापेक्षा जास्ती उघड. आणि सुरुवातीला असं म्हण– श्रीमंत सरकार वज्रचुडेमंडिता राजराजेश्वरी महाराज्ञीसाहेब—"

"ठीक आहे." जाई म्हणाली, "श्रीमंत सरकार वर्ज्यजोडेमंडिता काहीतरी विहीतरी साहेब !– मी एवढ्यासाठी आले, की मला फक्त आपली बाग बघायची होती."



"ठीक आहे." राणीसाहेब तिचे डोके थोपटीत म्हणाल्या. (जाईला

मुळीच आवडले नाही ते धोपटणे !) " पण बागेविषयीच बोलायचं, तर मी खरोखर इतक्या छान छान बागा बघितल्या आहेत, की त्यांच्याशी तुलना करता ही बाग म्हणजे रान वाटतं."

या मुद्द्यावर जाईने वाद घातला नाही. ती पुढे म्हणाली, " बाग पाहावी अन् शक्य तर त्या टेकडीवर चढावं, असा माझा बेत होता."

" ते ठीक आहे. " राणीसाहेब म्हणाल्या, " पण टेकडीविषयीच बोलायचं झालं, तर याच्यापेक्षा छान छान टेकड्या मी बघितलेल्या आहेत. त्यांच्याशी तुलना करता हा उंचवटा म्हणजे खड्डा वाटतो !"

" काही तरीच !" जाई म्हणाली. या खेपेस मात्र वाद घातल्याशिवाय तिला राहवेना. " उंचवटा कसा खड्डा होईल? हे काहीच्याबाहीच बोलणं झालं ! अर्थशून्य !"

" अर्थशून्य म्हण वाटलं तर," राणीसाहेब म्हणाल्या, " पण खरोखर मी इतकी अर्थशून्य बोलणी ऐकलेली आहेत, की त्यांच्याशी तुलना करता हे आत्ताचं माझं बोलणं म्हणजे अर्थशास्त्र वाटतं !"

जाईने पुन्हा लवून सलाम केला. कारण राणीच्या स्वरावरून तिला अशी भीती वाटली, की या बाईसाहेब पुन्हा रागावल्या आहेत. फार नाहीत; थोड्याशा.

यानंतर दोघी गप्प गप्प चालल्या होत्या. आणि मग जाई पाहते, तो आपण टेकडीच्या माथ्यावर येऊन पोचलो आहो.

काही वेळ जाई गप्प उभी राहिली. सभोवार सर्व दिशांना तिने दृष्टी फिरवली. ओहोहो ! काय चमत्कारिक प्रदेश होता तो ! उभ्या आडव्या चौकोनांसारखे किती तरी चौकोन त्यात होते. आणि चौकोनांच्या रेघा म्हणजे ओढे, बरं का ! ताठ सरळ वाहताहेत आपले ! आलटून पालटून एकेक चौकोनात हिरवळ उगवलेली दिसत होती.

" वा ! बुद्धिबळाचा पट वाटतो हा !" जाई म्हणाली, " म्हणजे मोहरी पण असणारच कुठं ना कुठं तरी.– अय्या ! आहेतच की ! " जाईला इतका आनंद झाला, की छातीतले ठोके तिचे तिला ऐकू येऊ लागले. " खूप खूप प्रचंड पट आहे हा– साऱ्या जगभर पसरलेला पट ! ओहोहो ! म्हणजे कित्ती मजा असेल या खेळात, नाही ? मला जर एखादं मोहरं होता आलं–

साधं प्यादं जरी होता आलं– तरी कित्ती कित्ती आवडेल मला! अर्थात राणी होता आलं, तर जास्तीच आवडेल."

हे बोलताना तिने जरा लाजत अन् भीतच खऱ्या राणीकडे पाहिले, पण राणीसाहेब मुळीच रागावल्या नाहीत. उलट त्या प्रसन्नपणे हसल्या आणि म्हणाल्या, "त्यात कठीण काहीच नाही. तू वाटलं तर गोऱ्या राणीचं प्यादं हो. कारण ही लिली नाही तरी लहान आहे. तिला खेळणं तितकं जमत नाही. तिच्या जागी या दुसऱ्या घरात तू उभी राहा, अन् कर सुरुवात; आठव्या घरात पोचलीस, की तुझी राणी होईल—"

हे तिचे बोलणे पुरे होते न होते तो एकाएकी काय झाले, कुणास ठाऊक पण अकस्मात सर्वजणे धावत सुटली..........

पुढे पुष्कळ दिवसांनी जाई जेव्हा तो प्रसंग आठवू लागली, तेव्हा तिला त्या गोंधळाचा उलगडाच होईना. पळापळीला सुरुवात कशी झाली, आधी कोण धावले, मग कोण– वगैरे वगैरे काहीच तिला आठवेना. एवढेच तिला आठवते की, सर्वजण हातांत हात घालून धावत होती. आणि राणी तर इतक्या जोरात धावत होती की, तिच्याबरोबर धावणे तिला भारी कठीण गेले. तिकडे राणी आपली सारखी ओरडत होती– "आणखी जोरात– आणखी जोरात!" पण जाईला वाटले, आपल्याला याहून आणखी जोरात धावणे सर्वस्वी अशक्य आहे. पण हे ती बोलून दाखवणार कशी? तिचा श्वास ठिकाणावर असेल तर ना!

सर्वांत चमत्कारिक गोष्ट ही की, त्यांच्या दुतर्फाच्या झाडे-वेली नि इतर वस्तू जागा बदलीत नव्हत्या. ही मंडळी कितीही जोरात धावली, तरी कशाच्याही पुढे जात नव्हती, कोणतीही वस्तू मागे पडत नव्हती, 'म्हणजे हे आहे तरी काय?' जाई स्वतःशी म्हणाली, 'हे सगळे पदार्थ आमच्याच बरोबर धावताहेत की काय तरी?'

जाई इतकी गोंधळली होती, की राणीच्याही ते लक्षात आले. ती ओरडली,

" आणखी जोरात– आणखी जोरात ! बडबड करू नकोस ! "

अर्थात जाईची तरी कुठे तयारी होती बडबड करण्याची? तिचा श्वास इतका हरपला होता की, आपल्याला पुन्हा कधी तरी बोलता येईल की नाही याचीच तिला शंका वाटत होती. तिकडे राणीचा पट्टा आपला चालूच होता– " आणखी जोरात– आणखी जोरात ! " जाईला ती जवळजवळ फरपटत नेत होती.



" पोचलो की नाही अजून आपण ? " जाईच्या तोंडातून शेवटी कसेबसे एवढे शब्द उमटले.

" जवळजवळ पोचलो ! " राणी म्हणाली. " म्हणजे तसं म्हटलं, तर दहा मिनिटांपूर्वीच आपण ते ठिकाण मागं टाकलं ! आणखी जोरात– आणखी जोरात ! " आणि पुन्हा दोघीही धाव धाव धावल्या– मुकाट्याने, शब्दही न बोलता. तिकडे वारा जोरात वाहात होता. जाईच्या कानांत तो शीळ घालीत होता. आणि तिच्या डोक्यावरचे केस उडवीत होता. नुसते उडवीत

नाही– तिला तर वाटत होते, की वारा आपले केस उपटून नेतो आहे.

"काय हे– काय हे?" राणीसाहेब ओरडल्या, "आणखी जोरात-- आणखी जोरात!" आणि खरोखरीच दोघी आता इतक्या जोरात धावू लागल्या, की हवेतून आपण जणू सूर मारतो आहो, असेच जाईला वाटले. जमिनीला जवळ जवळ पायच लागत नव्हता. या सपाटेबंद धावण्याने जाई शेवटी इतकी दमून गेली, की काय सांगू नि कसे सांगू? पण बरे झाले, तेवढ्यात ती तुफान मेल एकदम थांबली.

जाई मटकन् खाली बसली. धाप धाप धापा टाकीत. डोके असे गरगरत होते, की बोलायची सोय नाही.

राणीने तिला उठती केली; एका झाडाला टेकून बसवली आणि ती प्रेमळ स्वरात म्हणाली, "आता विश्रांती घे जरा."

जाईने आपल्या सभोवती दृष्टी फिरवली. ती नवल दाखवीत म्हणाली, "हे काय? मघापासून आपण याच झाडाखाली तर आहो. मघाशी होतं, तसंच सगळं दिसतंय."

"अर्थात!" राणी म्हणाली, "मग तुला काही निराळं हवं होतं वाटतं?"

"**आमच्या** देशात–" जाई श्वास घेत म्हणाली, "असं खूप वेळ अन् जोरात धावलं, की माणसं दुसरीकडे पोचतात जाऊन."

"हं:!" राणीसाहेब तुच्छतेने म्हणाल्या, "अगदीच मंद दिसतो तुमचा देश! आमच्या इथं कसं असतं, माहीत आहे? आपल्याला पहिल्याच ठिकाणी राहायचं असेल, तर खूप खूप–अगदी चिक्कार धावावंच लागतं. आणि दुसऱ्या ठिकाणी जायचं असेल, तर—"

"तर काय?" जाईने कसेबसे भीतभीत विचारले.

"तर याच्या दुप्पट वेगानं धावावं लागतं!"

"नको ग बाई ते दुसरीकडे जाणं!" जाई एकदम म्हणाली, "मला आपलं इथंच बरं वाटतं.–फक्त– फक्त उकडहंडी झाली आहे अंगाची. भारी तहान लागलीय मला!"

"असं!" राणीसाहेब मायेच्या सुरात म्हणाल्या; आणि त्यांनी खिशातून एक डबा काढला. "मग हे घे तुला बिस्किट!" असे म्हणून त्यांनी डबा·

उघडला.

आता तिला नाही कसे म्हणणार? बिचारीने घेतले ते सुके कोरडे बिस्किट, आणि कसेबसे खाल्ले. ते खाताना तिचा घसा जवळ जवळ सुकला नि कोंडला. कसला म्हणून ओलावा नव्हता त्याला.

"तुझा हा उपाहार चालू आहे ना–" राणी म्हणाली, "तोवर मी मापं घेते." आणि असे म्हणून तिने खिशातून एक लांबलचक रिबन काढली. त्या रिबनीवर इंच छापलेले होते. तिने ती जमीन मोजायला लागली. थोडी मोजून झाली, की ती थांबायची अन् जमिनीत खुंटी ठोकायची.

"दोन गज अंतर झालं, की मी तुला पुढच्या सूचना देईन." मध्येच राणीसाहेबांनी जाईकडे वळून सांगितले. "आणखी बिस्किट हवं?"

"नको–नको! माफ करा," जाई म्हणाली, "एक बस्स झालं."

"तहान भागली ना?" स्वर प्रेमळ.

जाईने काही उत्तर दिले नाही. पण सुदैवाने राणीही ऐकायला थांबली नाही. ती आपली पट्टी घेऊन मोजीत चालली. "तीन गज झाले, की मी पुन्हा सगळं सांगेन तुला!" ती म्हणाली. "तू विसरू नयेस म्हणून,– चार गज झाले, की मी टाटा करीन. पाच गज झाले, की मी जाईन."

एव्हाना तिच्या एकूण एक खुंट्या ठोकून झाल्या होत्या. जाईला ते पाहून फार गंमत वाटली. राणी परत आपल्या झाडाकडे गेली आणि खुंट्यांच्या त्या रांगेजवळून एकेक पाऊल टाकीत पुन्हा चालू लागली.

दोन गजांच्या खुंटीजवळ ती थांबली अन् मागे वळून म्हणाली, "पहिल्या खेळीला प्यादं दोन घरं जातं, नाही का? म्हणजे तिसऱ्या घरातून तुला सपाट्यानं जाता येईल,– कशी जाशील ग– आगगाडीनं जा! तेच बरं. म्हणजे हां हां म्हणता तू चौथ्या घरात पोचशील. ते घर आहे अडघम– पडघम बंधूंचं. पाचवं घर म्हणजे नुसतं पाणी आहे. सहाव्या घरात अंडोजी गुंडोजी राहतो.– पण काय ग? तू काहीच बोलत नाहीस?"

"मी काही बोललंच पाहिजे का? मला नव्हतं माहीत!" जाई अडखळत म्हणाली.

राणीसाहेब जरा रुष्ट सुरात म्हणाल्या, "तू म्हणायचं होतंस– की– की– 'हे सगळं तुम्ही सांगितलंत– कित्ती उपकार झाले तुमचे!' पण

जाऊ दे. तू म्हणाली नाहीस तरी आपण असं धरून चालू, की तू म्हणालीस. सातवं घर म्हणजे नुसतं जंगल आहे, बरं का? पण तुला वाट दाखवायला एक घोडेस्वार देऊ म्हणा.—आणि आठव्या घरात पोचलीस, की तू नि मी मिळून दोन-दोन राण्या! मस्त मजा येईल! जेवणखाण, गाणं बजावणं—"

हे ऐकून जाई उठली; तिने लवून लवून सलाम केला अन् पुन्हा खाली बसली.

पुढल्या खुंटीच्या वेळी पुन्हा राणीसाहेब थांबल्या अन् मागे वळून म्हणाल्या, "तुला मराठी येत नसेल, तेव्हा हिंदीत बोलत जा की!—चालताना नीट पावलं टाकून चाल. आणि आपण कोण आहो, हे नेहमी ध्यानात ठेव, बरं का?"

या खेपेस जाई सलाम करते की नाही हे पाहायला बाई थांबली नाही. सरळ पुढल्या खुंटीपर्यंत गेली. तिथे निरोप घेण्यासाठी थांबून तिने मागे पाहिले, 'टा—टा' केले आणि ती पुढल्या शेवटच्या खुंटीकडे गेली. तिथे एकदम स्वारी अदृश्य झाली.

कसा काय झाला हा प्रकार, हे जाईला आजतागायत कळलेले नाही. फुस्कन् हवेत विरली, की पटकन् जंगलात पळाली, (नाही तरी पळायची किती जोरात ती!) काही म्हणता काही तर्क चालेना जाईचा. आणि मग एकदम तिच्या लक्षात आले, की आपण पटावरचे प्यादे आहो. आपल्याला-देखील लवकरच हालले पाहिजे.

# ३

आता अर्थात पहिली गोष्ट करायची ती ही, की ज्या प्रदेशातून आपण प्रवास करणार त्याची माहिती मिळवायची !

'हे म्हणजे भूगोल शिकण्यासारखंच आहे' जाई आपल्याशी म्हणाली. खूप दूरदूरचा भाग दिसावा म्हणून बिचारी चवड्यावर उभी राहून पाहात होती. "मुख्य नद्या कोणत्या? फुस् ! एकही नाही. मुख्य पर्वत कोणते? हा–मी ज्याच्यावर उभी आहे, तोच. पण ही टेकडी आहे. पर्वत म्हणता येणार नाही याला. आणि याला नाव तर कुणीच दिलेलं नसावं ! मुख्य शहरं... पण हे काय? ते कोण प्राणी दिसतात, तिथं दूर मध गोळा करताहेत ते? मधमाश्या तर नक्कीच नाहीत. एक मैलावरच्या मधमाश्या कधी कुणी पाहिल्या आहेत? दुर्बिणीतून दिसतील कदाचित. नुसत्या डोळ्यांनी शक्यच नाही ! काय की बाई तरी—"

आणि एकदम गप्प होऊन जाई पाहात राहिली. तिचे सारे लक्ष त्यांतल्या एका प्राण्याकडे लागले होते. कोण होता तो प्राणी ? सारखा फुलांमधून घिरट्या घालीत होता आणि आपले नाक की तोंड की सोंड, काय ते फुलात खुपशीत होता. "आव तर आणतोय खऱ्या मधमाशीचा !" जाई पुटपुटली, "पण मेल्याला मधमाशी कोण म्हणेल ?"

मधमाशी नव्हतीच ती मुळी. तो कोणता प्राणी होता, ते लवकरच जाईच्या लक्षात आले. पण जेव्हा लक्षात आले, तेव्हा तिच्या तोंडचे पाणी पळाले, म्हणा ना !

कारण तो होता हत्ती !

'हत्ती बनला मधमाशी ! म्हणजे फूल केवढं प्रचंड असणार ! बंगल्याचं छप्पर काढून घेतलं, वर चार पाकळ्या जोडल्या अन् खाली एक देठ लावून दिलं, की जसं फूल तयार होईल, तशी प्रचंड फुलं असणार ही ! आणि बाप रे ! त्या फुलात मध किती असेल?–मला पाहिलंच पाहिजे खाली जाऊन !– –पण नको–' टेकडीवरून खाली धावत निघालेली जाई एकदम थबकली; ब्रेक लावावा तशी. आणि मग आपण असे एकदम का थांबलो– त्याला काही तरी सबब शोधली पाहिजे, असे वाटले तिला. आणि ती म्हणाली, 'हातात

एखादी डहाळी घेतल्याशिवाय त्याच्या तिकडे जाणं बरं नाही. जरा गडबड केलीन् की झाडून टाकायचं!—आणि मग घरी पोचल्यावर जेव्हा लोक विचारतील, कशी काय झाली जाई तुझी सहल? की मी उत्तर देईन—ठीक झाली म्हणा. पण अमळ उकडत होतं अन् धूळही फार होती वाटेत. आणि हत्तींनी तर भारीच सतावलं!'

'तसं नको. मी आपली त्या दुसऱ्या वाटेने जाते कशी!' जाई जरा वेळाने म्हणाली. 'हत्तींना भेटू नंतर सावकाश. शिवाय मला तिसऱ्या घरात जायचंय ना लवकर!'

आणि ही एवढी सबब पुरेशी होती. म्हणून जाई लगेच टेकडीवरून धावत खालपर्यंत गेली अन् मग वाटेतला तो पहिला ओढा तिने टुणकन् उडी मारून ओलांडला.

"टिकेट्स प्लीज!" तिकिटे तपासणारा चेकर चालत्या गाडीच्या खिडकीतून डोके घालून म्हणाला. लगेच प्रत्येकाचा हात खिशात गेला. सर्वांनी आपली तिकिटे बाहेर काढली आणि चेकरपुढे धरली. प्रत्येक तिकीट त्याच्या मालकाएवढे मोठे होते. म्हणजे जेवढा उतारू, तेवढे तिकीट. त्या उतारूंच्या खिशात तिकिटे कशी मावली अन् उतारू नि तिकिटे डब्यात कशी मावली हे कोडेच होते एक.

"ए पोरी! तुझं तिकीट कुठाय?" चेकरने विचारले आणि तो रागा-रागाने जाईकडे पाहू लागला. लगेच किती तरी आवाज एकदमच निघाले. (ते वृंद-गायन किंवा कोरस असतो ना, तसे!) "ए मुली! त्याला तिष्ठत ठेवू नकोस.—त्याचा वेळ मोलाचा आहे—प्रत्येक मिनिटाचे हजार रुपये घेतो तो!"


"अगबाई! आता काय करू?" जाई घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली. "माझ्याजवळ नाही बाई तिकीट! मी जिथून आले, तिथं तिकीट ऑफिसच नव्हतं!"

लगेच त्या आवाजांनी गिल्ला सुरू केला (वृंद-गायन!). "असणार कसं तिथं तिकीट ऑफिस? तिकीट ऑफिसला तिथं जागाच नाही मुळी!—तर? जागा भारी महाग आहे तिथली—एका इंचाला एक हजार रुपये!"

"काही तरी सबबी सांगू नकोस" चेकर म्हणाला, "तिकीट ऑफिस

नव्हतं, तर एंजिनवाल्याकडून घ्यायचं होतंस!" आणि लगेच गलका सुरू झाला, "म्हणजे एंजिन चालवणाऱ्या बुवाकडून! त्याचा धूर भारी महाग आहे. प्रत्येक भपकाऱ्याचे एक हजार रुपये!"

जाई आपल्याशी म्हणाली, 'असं असेल तर बोलण्यातच अर्थ नाही!' या खेपेस आवाजांचा कोरस काही बोलला नाही; कारण ती उघड बोललीच नव्हती. तिच्या मनातले विचार होते ते; आणि तरी त्यांच्या सर्वांच्या मनात एकच विचार चाललेला असावा: (म्हणजे 'विचारांचा कोरस की काय?'



वृंदविचार म्हणायचं का याला?—काय की बाई!')

"काहीच बोलू नकोस हे चांगलं, भाषा महाग असते. प्रत्येक शब्दाचे

एक हजार रुपये!"

'आज रात्री सगळी हजार रुपयांची स्वप्नं पडणार!' जाई आपल्याशी म्हणाली.

हे सर्व चालू असता तो चेकर जाईकडे लक्षपूर्वक पाहात होता—पहिल्याने दुर्बिणीतून आणि मग सूक्ष्मदर्शक यंत्रातून. शेवटी त्याने बायनॉक्युलर काढून डोळ्यांना लावले. आणि मग तेही खिशात ठेवून त्याने नुसता काळा चष्मा चढवला. थोड्या वेळाने त्याची घडी करून त्याने बिनभिंगाचा चष्मा लावला.

"इतकी ल्हान मुलगी ही—" जाईच्या समोर बसलेला गृहस्थ (कागदाचे कपडे होते त्याचे) उद्गारला, "हिला कळायला हवं आपण कुठं जाणार ते. एक वेळ स्वतःचं नाव माहीत नसलं तरी चालेल!"

त्या कागदी बुवाजवळ एक बोकड बसला होता. त्याने आपले डोळे मिटले आणि तो म्हणाला, "तिकीट ऑफिस कुठं असतं, ते हिला माहीत पाहिजे—एक वेळ मुळाक्षरं माहीत नसली तरी चालेल!"

त्या बोकडाच्या पलीकडे एक भुंगेरा बसला होता. (फार चमत्कारिक डबा होता तो—तऱ्हेतऱ्हेचे उतारू त्यात भरलेले होते) आणि अनुक्रमाने प्रत्येकाने बोलायचे असा नियम होता, की काय कुणास ठाऊक! पण तो भुंगेरा म्हणतो कसा: "आता इथून पुढचा...."

"घोड्यासारखा वाटला मला तो!" जाई म्हणाली. आणि खरोखर तो घोडाच होता. खिडकीपाशी बसलेला होता.

"याच्यावर विनोद का नाही करीत तू?" जाईच्या अगदी शेजारून एक फार फार बारीक सूक्ष्म आवाज आला, "घोडा—बसण्याचा की कपडे टांगण्याचा, की बंदुकीचा, की बुद्धिबळांतला!"

"हे कोण तडतडलं?" जाई म्हणाली. "लाह्या की फुटाणे?"

आणि लगेच तो बारीक आवाज म्हणाला, "याच्यावर पण विनोद करता येईल—फुटाणे—फुटणे—"

इतक्यात दूर अंतरावरून एक मृदु स्वर जाईच्या कानांवर पडला—

"लगेजमध्ये घालताना हिच्यावर लेबल मारलं पाहिजे: फुटण्यासारखी वस्तू."

आणि यावर दुसरेही कित्येक आवाज गलका करू लागले (आहेत तरी किती लोक या गाडीत!): "हिला पोस्टानं धाडलं पाहिजे. पोस्टाच्या तिकिटांवर मोठ्या लोकांची डोकी असतात, तसं डोकं लावलंय हिला!– त्यापेक्षा संदेश म्हणून हिला तारेनं धाडलं पाहिजे– ते काही नाही. एंजिन काढून हिलाच जुंपलं पाहिजे गाडीला–ओढ म्हणावं, ओढ चांगली जीव फाटेस्तो––" आणि वगैरे वगैरे.

पण तो कागदातला गृहस्थ मात्र पुढे वाकला अन् जाईच्या कानात म्हणाला, "त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस बाळ तू. तू एवढंच कर– जिथं जिथं गाडी उभी राहील, तिथं तिथं खाली उतरून तू एक रिटर्न तिकीट काढ. परतीचं तिकीट!"

"शहाणे आहात फार! मी नाही काढणार!" जाई उतावीळपणे बोलली. "मला या गाडीतनं प्रवास करायचा नव्हताच मुळी! मी एका रानात होते मघाशी. तिथे मला जर परतायला मिळालं––"

तिला मध्येच थांबवून तो बारीक आवाज तिच्या कानात म्हणाला, "याच्यावर विनोद करता येईल– परतायला तू काय भाकरी आहेस तव्यावरची?"

"तू गप्प बैस! नाही तर तुलाच भाजीन मी तव्यावर!" जाई ओरडली. पण तिने खूप खूप बारीक नजरेने पाहिले तरी तो बारीक आवाज कोणाचा हे काही तिच्या लक्षात आले नाही. ती पुढे म्हणाली, "एवढी विनोद करायची हौस आहे तुला, तर तूच का नाही विनोद करीत?"

यावर त्या बारीक आवाजाने एक उसासा सोडला! फार फार दुःखी जीव असावा तो. आणि खरे म्हणजे जाईला त्याची ताबडतोब कीव आली. इतर चार लोकांसारखा तो उसासा असता, तर जाईने नक्कीच त्याचे काही तरी बोलून समाधान केले असते. पण हा उसासा इतका बारीक, हळुवार नि सूक्ष्म होता, की जाईच्या अगदी कानात तो उमटला म्हणूनच तिला ऐकू गेला. पण याचा परिणाम असा झाला, की तिच्या कानात फार ठुसठुसले. त्यामुळे त्या बापड्या बारीक प्राण्याच्या दुःखाऐवजी ती स्वतःच्या कानाचाच विचार करू लागली.

इकडे तो आवाज बोलायला लागला, "तू चांगली आहेस, मला माहीत

आहे. चांगली नि प्रेमळ. मी जातीनं कीड असले तरी तू मला त्रास देणार नाहीस !”

“ कीड ?– कीटक ?” जाईने जरा सचिंत सुरात विचारले, “ कोणता किडा आहेस बाबा तू ?” म्हणजे तिला खरी भीती पडली होती ती ही, की हा एखादा चावरा दंश करणारा किडा नसेल ना ? घोणबीण नसेल ना ? घोणी म्हणे कानात शिरतात ! पण तसे स्पष्ट कसे विचारणार ? ते बरे दिसले नसते.

“ म्हणजे काय– तुला—” असे काही तरी तो आवाज म्हणतो आहे तोच एंजिनाने कर्कश शिट्टी दिली आणि प्रत्येकाने ताडकन् आपल्या सीटवर उडी मारली. त्यांतच जाई पण होती.

इकडे घोड्याने खिडकीबाहेर डोके काढले होते. त्याने पटकन् ते आत घेतले आणि म्हणाला, “ काही नाही; एक ल्हानसा नाला आहे वाटेत, त्याच्यावरून कुदायचंय आपल्या गाडीला !” हे ऐकून प्रत्येकाचे समाधान झालेले दिसले. पण जाईचे मात्र झाले नाही. आगगाड्या उड्या मारतात ही कल्पनाच तिला भीतिदायक वाटली. ‘ पण– असो म्हणा !’ ती आपल्याशी म्हणाली, ‘ एवढ्यामुळं आपल्याला जर एकदम चौथ्या घरात जाता येत असेल, तर तेवढंच समाधान !’ दुसऱ्याच क्षणी गाडी आडवी होती, ती उभीच्या उभी झाली आणि तिने हवेत उड्डाण केले. जाई इतकी भ्याली, की जवळची हाताला येईल ती वस्तू तिने पकडली. ती वस्तू होती बोकडाची दाढी.

पण गंमत अशी, की जाईने त्या दाढीला स्पर्श केला मात्र, ती मुळूमुळू वितळायला लागली. आणि थोड्या वेळाने जाई पाहते, तो आपण एका झाडाखाली शांतपणे बसलो आहो, अन् आपल्या शेजारी एक घुंगुर्टे बसले आहे.

इतका वेळ जो बारीक आवाजाचा प्राणी तिच्याशी बोलत होता तो हाच– घुंगुर्टे !

जाईच्या डोक्यावर झाडाची एक फांदी खालपर्यंत आली होती; त्या फांदीवर ते एवढेसे घुंगुर्टे तोल सावरून बसले होते अन् जाईला आपल्या

चिमुकल्या पंखांनी वारा घालीत होते.

तसे म्हटले तर बरेच मोठे होते हे घुंगुर्टे बाळ. 'मोठं म्हणजे चांगलं कोंबडीच्या पिल्लाएवढं असेल!' जाई स्वतःशी म्हणाली. पण तरी तिला त्या घुंगुर्ट्यांची भीती वाटली नाही, बरं का–मुळीच! कारण किती झालं तरी इतका वेळ दोघांनी गप्पा मारल्या होत्या ना?

"म्हणजे–एकंदरीत तुला **सगळे** किडे आवडत नाहीत तर?" घुंगुर्टे तिला म्हणाले. जणू काही त्यांच्या संवादात खंडच पडला नव्हता.

"बोलता येणारे कीटक आवडतात मला," जाई म्हणाली, "पण मी जिथूनची आहे, तिथं बोलणारे कीटक आजिबात नसतात!"

"तू जिथूनची आहेस–" घुंगुर्टे बोल्ले, "तिथल्या कोणत्या किड्यात तुला आनंद वाटतो?"

"किड्यात आनंद वाटणं हा काय प्रकार आहे?" जाईने उलट प्रश्न केला. "खरं म्हणजे किड्यांपासून आनंद मला कधीच वाटत नाही; मला अमळ भीतीच वाटते त्यांची–निदान मोठ्या किड्यांची. त्यांची नावं सांगते वाटलं तर तुला!"

"त्या नावानं हाका मारल्या की ओ देतात ते?"

"नाही बाई! असला प्रयोग मी करून पाहिलेला नाही."

"अं:! नाव उच्चारल्यावर ते जर उत्तर देत नसतील, तर असल्या नावांचा उपयोग तरी काय?"

"त्यांना **स्वतःला** नसेल उपयोग!" जाई म्हणाली, "पण दुसऱ्यांना असतोच की. म्हणजे लोकांना! तसं नसेल तर मग नावं ठेवायचीच कशाला?"

"ते कोण जाणे!" घुंगुर्टे म्हणाले, "या रानात आणखी जरा पुढं गेलीस, की तुला जे प्राणी भेटतील, त्यांना नावंच नाहीत.–पण ते राहू दे. तुझी किड्यांची यादी सांग की! उगीच वेळ कशाला खातेस माझा?"

"आता काय बाई सांगू तरी–" जाई म्हणाली अन् आठवू लागली, "हं. गोचीड असते–किंवा गोमाशी! गवळ्यांच्या चांगली ओळखीची असते ती."

"गवळ्यांच्या–म्हणजे गोपाळांच्या!–मग गोपाळमाशी म्हण की! इथं

तू त्या झुडपाआड गेलीस, तर तुला झोपाळामाशी दिसेल. ती सुंभाची नि लाकडाची केलेली असते. तिचा धंदा एकच— या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारणं."

"पण ती खाते काय?" जाईने कुतूहलाने विचारले.

"भुस्सा." घुंगुर्ट्यांने ठोकून दिले. "पण तुझी यादी वाच."

जाई त्या झोपाळामाशीकडे पाहात होती. तिला वाटले, ही माशी नक्की नुकतीच रंगवलेली असावी. किती चिकणी नि चकचकीत दिसत होती. आणि मग ती म्हणाली, "चतुर— किंवा चितूर. हा पण एक कीटक आहेच."

"तो वर बघ तुझ्या डोक्यावर—" घुंगुर्टे म्हणाले, "तो जो किडा आहे ना, त्याचं नाव फितूर. त्याचं शरीर गुलाबजंबूचं केलेलं आहे, पण पंखांवर निवडुंगाचे काटे आहेत. अन् त्याचं डोकं म्हणजे तुपात घोळलेला वेदाणा आहे."

"तो खातो काय?"

"लोणचं. आणि कागदी खोक्यात घरटं करतो."

"फुलपाखरू पण असतं आमच्याकडे—" जाई एकदम आठवण झाल्यासारखी म्हणाली.

"ते बघ, तुझ्या पायाशी कोण वळवळतं आहे? त्याचं नाव फळपाखरू. त्याचे पंख म्हणजे सफरचंदाच्या फोडी आहेत. डोकं म्हणजे पेरू आहे. कातडी म्हणजे संत्र्याची साल आहे, अन् शेपूट म्हणजे कणीस आहे."

"आणि हा काय खातो?"

"सरबत. महाळुंगाचं!"

जाईला एकदम एक प्रश्न सुचला. ती म्हणाली, "महाळुंगाचं सरबत नेहमी कुठून मिळणार? मिळालं नाही म्हणजे?"

"खतम्! तो मरतो!"

"पण— पण असे प्रसंग पुष्कळदा येत असतील?"

"येतात की. नेहमीच मरतो हा."

यानंतर एकदोन मिनिटे जाई विचार करीत बसली होती. तेवढ्या वेळात घुंगुर्ट्यांने तिच्याभोवती अशा गरगर गिरक्या घातल्या म्हणता.

कुंभाराचे चाक फिरते, तसे फिरत होते. म्हणजे हे घुंगुर्टे होते, की कुंभारीण-माशी होती? आणि तिला मडकेबिडके घडवायचे होते, की जाईचे डोके म्हणजेच तिला मडके वाटत होते, कोण जाणे! पण गूं–गूं करून घुंगुर्ट्याने स्वतःची करमणूक मात्र खूप करून घेतली. शेवटी संपली त्याची ती गिरागिरमाता आणि बसली स्वारी एकदाची पूर्वीच्या जागेवर. मग म्हणते कशी—

"तुला आपलं नाव हरवलेलं आवडेल का ग?"

"मुळीच नाही!" जाई ठासून म्हणाली, "का रे विचारतोस?"

"अग, त्यात वाईट काय आहे पण?" घुंगुर्टे तिला छेडू लागले. "कल्पना कर–तुझं नाव हरवलं आणि तू तशीच शाळेत गेलीस! तुला बाई छेडणार नाहीत अभ्यास केलास का म्हणून—कारण तुझं नावच त्यांना येणार नाही."

"मग नाही आलं म्हणून काय झालं?" जाई म्हणाली, "बाई आठवल्या-सारखं करतील, चुक्–चुक् करतील—"

"त्यांनी चुक्–चुक् केलं, की तू लगेच म्हण–बाई, तुम्ही चुकलात! आहे की नाही विनोद? तू केला असतास तर बरं झालं असतं, नाही?"

"हट्!" जाई म्हणाली, "मी नाही असले भिकार विनोद करीत!"

घुंगुर्ट्याने नुसताच एक उसासा सोडला. त्याच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रू निघून खाली ओघळले.

"स्वतःलाच रडू आणणारे असले विनोद करतोस कशाला?" जाई म्हणाली. घुंगुर्ट्याने पुन्हा एक उसासा सोडला. तो मागच्या वेळेसारखा हळुवार उसासा. त्या उसाशाने जाई तर विरघळलीच, पण स्वतः घुंगुर्टे पण अक्षरशः विरघळले. कारण जाईने पुन्हा जेव्हा मान वर करून पाहिले, तेव्हा फांदीवर काही म्हणता काही नव्हते.

इकडे इतका वेळ एका जागी बसून जाईला गारठल्यासारखे झाले होते. म्हणून ती उठली अन् पुढे चालू लागली.

लवकरच ती एका मोकळ्या मैदानात आली. त्याच्या एका कडेला दाट जंगल होते. त्या मागच्या जंगलापेक्षा हे फारच काळोखी वाटत होते. त्यामुळे जाईला त्यात शिरण्याची **अमळ** भीती वाटली. पण मग तिने निश्चय केला

की ‘ जायचंच. कारण परत फिरण्याची तर माझी मुळीच तयारी नाही ’ ती आपल्याशी म्हणाली. आणि आठवे घर गाठायचा हा एकच मार्ग होता.

“हेच रान असणार ते—” जाई आपल्याशीच म्हणाली, “जिथं कुणालाही नावं नसतात, ते निनावी रान. मी जर या रानात शिरले, तर माझ्या नावाचं काय होईल कोण जाणे! मला आपलं नाव गमवायची मुळीच इच्छा नाही. कारण हे नाव हरवलं, की घरची लोकं दुसरं काही तरी ठेवतील. अन् ते जाईइतकं छान असणं शक्य नाही. काही तरी घाणेरडं असेल. पण मग दुसरी एक मजा होईल म्हणा! माझं जुनं नाव कुणाला मिळालं, ते शोधून काढणं ही एक मोठीच गंमत होईल. म्हणजे ते जाहिरातीत देतात तसं— ‘कुत्रा-बित्रा हरवला, की जाहिरात देतात पाहा— ‘टायगर’ नावानं हाक मारली, की येतो. गळ्यात पितळी पट्टा आहे—’ कल्पना करा— जो भेटेल त्याला आपलं पुकारीत सुटायचं ‘जाई— जाई!’ आणि कुणी तरी ओ देईपर्यंत वाट पाहायची. आणि त्यात पुन्हा अडचण ही की— शहाणे असतील ते मुळी ओच देणार नाहीत!”

अशीच भरकटत असताना ती जंगलाजवळ जाऊन पोचली. तिला वाटले, ‘आहा! किती थंडगार अन् दाट सावलीचं आहे हे! बरं वाटतं इथं— नाही तर मघाचा तो उकाडा! इथं या याच्यात— याच्यात म्हणजे कशात?— इथं या याच्याखाली— पण याच्याखाली म्हणजे कशाच्या खाली?—’ जाईने हात पुढे करून एका झाडाच्या खोडाला स्पर्श केला. ‘काय बरं म्हणतात याला? — हं: ! याला नावच नाही की काय तरी?’

मिनिटभर जाई स्तब्ध उभी राहिली. मग एकदम म्हणते, ‘हं! म्हणजे खरंच आहे म्हणायचं ते! ते घुंगुर्टं बाळ म्हणालं ते खोटं नाही. बिननावाचा प्रदेश दिसतोय हा! बाई— बाई— बाई! मी स्वतः तरी कोण आहे?.... काय बरं नाव माझं?.... छे! मुळीच आठवत नाही! काय करावं आता?— ते काही नाही. नाव आठवलंच पाहिजे. प्रयत्न करून आठवीन मी! कसं नाही आठवत, बघते!’ पण नुसते असे म्हणून काय उपयोग? जाईने जंग जंग पछाडले, पण तिला अजिबात नाव आठवेना. एकदा इथपर्यंत येऊन पोचली ती—

‘पहिलं अक्षर— नावाचं पहिलं अक्षर काय आहे बरं माझ्या?— काही

तरी आज्ञार्थी क्रियापद आहे.– हं, बरोबर! ये.... ये हे पहिलं अक्षर. आता दुसरं अक्षर....' पण छे! दुसरं अक्षर कुठं आठवतंय? आणि पहिलं अक्षर बरोबर असेल अशी तरी कुठं खात्री आहे? आणि दोन अक्षरीच नाव असेल असं तरी कुठं नक्की माहीत आहे? छे! साराच घोटाळा– साराच गोंधळ!



इतक्यात एक हरणाचे पाडस भटकत भटकत तिथे येऊन पोचलं. जाईकडे ते मोठाल्या मऊ मऊ डोळ्यांनी पाहू लागले. लहान बाळासारखे डोळे होते त्याचे. पण त्याला भीती वाटल्यासारखी दिसत नव्हती, बरं का?

जाईने हात पुढे केला आणि म्हटले, "ये–ये! इकडे ये!" त्याच्या पाठीवरून हात फिरवावा, त्याला गोंजारावे, असे फार फार वाटत होते तिला. पण ते नुसते बिचकून मागे झाले. थांबले अन् पुन्हा हिच्याकडे पाहू लागले.

"तुझं नाव काय ग?" त्याने एकदम प्रश्न केला. 'किती ग बाई गोड आवाज हा!' जाई आपल्याशी म्हणाली, 'पण– पण– माझं नाव विचारतो हा. मला तरी कुठं माहीत आहे?' ती मोठ्याने म्हणाली, "काही नाही. आत्ता या क्षणाला तरी काही नाही!"

"पुन्हा आठवून बघ. हे असं नाही चालायचं!" हरीणबाळ म्हणाले.

जाईने पुन्हा आठवून पाहिले. पण काही म्हणता काही उपयोग झाला नाही. ती भीत भीत म्हणाली, "आता काय करू? खरंच नाही रे मला नाव! पण तुझं नाव सांगतोस? ते ऐकल्यावर सुचेल कदाचित."

"सांगेन मी." हरीणबाळ म्हणाले, "पण इथं नाही; इथं मला काही आठवत नाही. आणखी पुढं चल जरा– येतेस? मग सांगेन."

निघाली जाई त्या हरीणबाळाबरोबर. त्याच्या मऊ मऊ गळ्याभोवती हात घालून निघाली. थोडा वेळ चालल्यानंतर रान मागे पडले आणि ती दोघे एका मोकळ्या कुरणावर आली. तिथे आल्याबरोबर हरणाने एकदम जाईची मिठी सोडवून घेतली अन् हवेत उडी मारली.

"पाडस!" ते ओरडले, "माझं नाव पाडस!– आणि तुझं पण सांगू नाव? तू आहेस मुलगी– माणसाचं पिल्लू!"

कित्ती आनंद भरला होता त्याच्या त्या शब्दांत! पण 'माणसाचं पिल्लू' हे शब्द त्याने उच्चारले मात्र, एकदम त्याची मुद्रा बदलली. त्याच्या पाणीदार सुंदर डोळ्यांत भीती दिसू लागली. क्षणार्धात त्याने मान फिरवली आणि एक उडी मारून ते जंगलात पळून गेले.

पाडस एकदम परत गेले आणि जाई चटकन् एक गाणे गुणगुणू लागली. जुन्या नाटकातले गाणे– शकुंतलेने पाडसाला उद्देशून म्हटलेले गाणे. तिची ताई पुष्कळदा ते गुणगुणत असे— जाई परतोनी, बाळा, जाई परतोनी ॥ आणि ते गाणे तोंडातून निघाल्याबरोबर....

"बरोबर!" ती म्हणाली, "आठवलं माझं नाव मला!– जाई! आता पुन्हा म्हणून विसरायची नाही!– काय की बाई तरी– म्हणे पहिलं अक्षर

ये आहे !– काही तरीच– उलटंच्या पालटं ! माझं पहिलं अक्षर आहे **जा** तर म्हणे **ये** ! हूं: !" आणि असे खदखदून हसू आले जाईला म्हणता !

"अगबाई ! हे काय?" ती एकदम म्हणाली, "आता आलं का पुन्हा त्रांगडं ?– इथं दोन पाट्या दिसताहेत ! कोणत्या दिशेला जाऊ मी?"

खरे सांगायचे तर एवढा प्रश्न पडायचे कारण नव्हते. कारण त्या नाक्यावर पाट्या जरी दोन होत्या, तरी प्रत्येक पाटीवर काढलेला हात एकाच दिशेला बोट दाखवीत होता.

तेव्हा 'आत्ताच विचार करण्याचं कारण नाही'– जाईने स्वतःला सांगितले. 'एक बोट ही वाट अन् एक बोट ती वाट दाखवील, तेव्हा कर तू विचार– इकडे जायचं की तिकडे जायचं त्याचा !'

पण असा प्रसंग पुढेदेखील आला नाही. कारण जाई जसजशी पुढे गेली, तसतशा प्रत्येक नाक्यावर दोन दोन पाट्या लागल्या खऱ्या, पण प्रत्येक वेळी दोन्ही पाट्यांवरचे हात एकाच दिशेला बोट दाखवीत होते ! नावे तेवढी वेगळी असत. एका पाटीवर असे : **अडघम शेट यांच्या घराकडे**; दुसऱ्या पाटीवर असे : **पडघम शेट यांच्या घराकडे.**

'कदाचित दोघेही एकाच घरात राहात असतील !' जाई म्हणाली, 'बरोबर ! हे माझ्या आधीच कसं लक्षात आलं नाही?–पण–पण– मला जास्त वेळ त्यांच्याकडे थांबता यायचं नाही म्हणा. नुसती जाईन, 'काय कसं काय' म्हणेन अन् परत येईन. हो– आणि जंगलातून बाहेर पडण्याची वाट विचारीन त्यांना.–बाई बाई बाई ! काळोख पडायच्या आत मला ते आठवं घर गाठलंच पाहिजे !"

आणि निघाली जाई भटकत भटकत, आपल्याशीच बोलत बोलत. शेवटी रस्त्याने एक सपाट्याचे वळण घेतले; अन् जाई पाहते तर दोन छोटे गोटोळे पुरुष आपल्या पुढ्यात उभे. इतक्या अकस्मात त्यांनी तिला दर्शन दिले होते, की पहिल्याने जाई चांगलीच चपापली अन् आल्या पावली माघारी फिरणार होती, पण तेवढ्यात तिला आठवले—

'बरोबर !' ती आपल्याशीच म्हणाली. 'हेच असणार ते— अडघम्– पडघम !'

# ४

एका झाडाखाली उभी होती ती जोडगोळी. अ चा हात प च्या गळ्यात होता अन् प चा हात अ च्या गळ्यात होता. कोणता अ नि कोणता प हे ओळखायला बृहस्पतीची जरूर नव्हती. कारण प्रत्येकाच्या कंबर-पट्ट्यावर त्याचे सबंध नाव लिहिलेले होते. ‘ अ-ड-घ-म ’ अन्. प-ड-घ-म ’ ‘ फक्त त्यांचा मोठेपणा दर्शविणारा तो शेट शब्द तेवढा नव्हता. ‘ तो कदाचित पट्ट्यावर मागच्या बाजूला असेल ! ’ जाई आपल्याशीच म्हणाली. ‘ पण लिहिल्याशिवाय राहणार नाहीत !— पाहतेच मी जाऊन— ’ आणि असे म्हणून ती त्यांना वळसा घालून मागे जाऊ लागली. तोच तिचे लक्ष त्या दोघांच्या हातांकडे गेले.

‘ इश्श ! ’ ती आपल्याशी म्हणाली, ‘ यांनी हात पण धुतलेले दिसत नाहीत. खरकटे वाटतात !— अग बाई !— ’ हा शेवटचा उद्गार जाईच्या तोंडून निघण्याचे कारण तिला ठेच लागली होती. खाली वाकून पाहते तो एक जेवणाचे ताट वाटेत पडलेले. अर्धवट खाल्लेले उष्टे जेवण त्यात होते अन् त्यावर एक उंदीर ताव मारीत होता. जाईला पाहताच तो पळाला अर्थात !

“ ई ग बाई ! ” असे म्हणून परकर झटकून जाई पुढे गेली आणि पाहते तो खरेच ! तिचा तर्क खरा ठरला होता. प्रत्येकाच्या कंबरपट्ट्यावर मागच्या बाजूस ‘ शे—ट ’ अशी अक्षरे होती. पण कुणा तरी चावट मुलाने मध्ये लोंबणाऱ्या पट्ट्याच्या टोकावर ‘ पू ’ लिहून ठेवले होते.

“ शे—पू—ट ! ” जाई म्हणाली अन् खुदकन् हसली.

“ ए ! तू काय समजतेस आम्हांला ? ” पुढून आवाज आला. तशी जाई चपापली अन् भीत भीत अमळ दुरूनच चालत तिने प्रदक्षिणा पुरी केली.

हो ! त्यांच्याचपैकी एकजण बोलत होता. तो पहिला— अडघम शेट !

“ आमी तुला मेणाचा चित्र वाटलो काय ? ” तो म्हणाला, “ तसा असेल, तर तिकिटाचा पैसा दे.— चित्रांचा प्रदर्शन मोफतमंदी नाही पगायला मिलत— अक्षी नाय ! ”

“ उलटपक्षी— ” तो दुसरा पडघमशेट म्हणाला, “ आमी लोग जिवंत खरा लोग हाय असा तुला वाटत असेल, तर तू बोलच आमच्याशी ! ”

" हो–हो, बोलते की ! " जाई म्हणाली. तिच्या मनात दुसरेच काही तरी घोळत होते, " मला माफ करा हं."



आणि मग पुन्हा तिला खुदकन् हसू आले. ती त्या दोघांच्या चेहऱ्यांकडे पाहात म्हणाली, " प्लीज– मला एक सांगता का? अडघमशेट, तुमचं पहिलं नाव **गोविंद**, खरं ना ? "

" हो ! " **अ** ने उत्तर दिले.

" आणि पडघमशेट, तुमचं पहिलं नाव **गोपाळ**, खरं ना ? "

" हो ! " **प** ने उत्तर दिले.

" कसं ओळखलं, विचारा की ! " जाई हसत म्हणाली.

पण अडघम-पडघम नुसते घुम्यासारखे पाहात राहिले. काही विचारीनात.

पण त्यांनी विचारले नाही म्हणून जाई सांगायची थोडीच राहते? ती म्हणाली, " त्या जुन्या गाण्यात दिलेलं आहे सगळं !—

गोविंद-गोपाळ असे दोघे बंधू
जेवीत होते दहिभात-लिंबू
जेवता जेवता चमत्कार झाला
ताटात उंदीर....”

इथे पुढचे बोलावे की नाही म्हणून जाई जरा घुटमळली.

तेव्हा अडघमने नाक मुरडून उजवीकडे पाहिले, आणि पडघमने नाक मुरडून डावीकडे पाहिले. मग दोघांनीही आपले खरकटे हात मागे नेऊन कुठे तरी पुसले. पण कोणी काही बोलले नाही.

आणि जाईलाही उत्तर नकोच होते. ‘ त्यांना वाईट वाटत असेल, तर न का देईनात उत्तर ? माझी मुळी खात्रीच आहे—’

शिवाय जाईच्या मनात आता आणखी काही घोळत होते. तिच्या ताईने गंमत म्हणून केलेली एक कविता तिला आठवू लागली होती—

अडघमशेट पडघमशेट
दोघे लागले भांडायला
अडघमशेटने दडपम केला
पडघमशेटचा खुळखुळा !
प्रचंड कावळा उडत आला
डांबरासारखा काळाकुट्ट
दोघे भिऊन पळाले दूर
भांडण मिटले तिथेच झट्ट !

“ आमाला माहीत आहे तुझ्या मनात काय घोळतोय ते.” अडघम म्हणाला, “ पण तसा काय इथे नाय—अक्षी नाय. ”

“ उलटपक्षी—” पडघम म्हणाला, “ तसा असता, तर बराबर झाला असता. अने बराबर असता, तरबी झाला असता तसा. पण तसा नाय तेवा नाय. हे समदा तर्काला धरून हाय. ”

“ माझ्या मनात एवढंच घोळत होतं— ” जाई नम्रपणे म्हणाली, “ की, “ या जंगलातून बाहेर पडायची वाट कोणती असेल? आता अंधार पडणार म्हणून म्हटलं. तुम्ही सांगता का—प्लीज ? ”

पण अडघम-पडघमनी नुसते एकमेकांकडे पाहून दात विचकले.

या वेळी ते दोघे गोटोळे बुवे अगदी हुबेहूब शाळेतल्या मुलांसारखे वाटले जाईला. म्हणून तिने अडघमकडे बोट केले अन् आवाज शक्य तितका कठोर करून म्हटले, " पहिला नंबर– तू उत्तर दे ! "

" अक्षी नाय ! " अडघमच्या जबड्यातून ताडकन उत्तर निघाले, आणि जबडा पुन्हा खाड्कन मिटला.

" दुसरा नंबर– " जाई पडघमकडे बोट करून म्हणाली. अर्थात त्याचे उत्तर काय येणार हे तिला अगोदरच माहीत होते. आणि त्याप्रमाणेच त्याने उत्तर दिले– " उलटपक्षी. "

जाईला खुदकन हसू आले. मग ती अमळ न्याहाळून त्या विचित्र प्राण्याकडे पाहू लागली. तिला वाटले, या चक्रमांना शोभतील अशीच चिन्हे आहेत खरी त्यांच्या कपड्यावर रंगवलेली ! ' अक्षी नाय 'वाल्या पडघमच्या छातीवर नुसती नक्षी काढलेली होती, तर ' उलटपक्षी 'वाल्या पडघमच्या छातीवर वटवाघूळ काढलेले होते !

" तू सुरुवात चुकीची केलीस. " अडघम ओरडला, " कुणालाही भेटायला गेला, की आधी ' काय– कसा काय ' म्हणून हात जोडायचा असते—"

" किंवा हालवायचा असते. " पडघम म्हणाला.

आणि दोघा भावांनी एकदम एकमेकांना गच्च मिठी मारली आणि एकेक हात मोकळा होता तो प्रत्येकाने जाईपुढे केला.

जाईला पंचाईत ही पडली, की यांच्यापैकी अगोदर हस्तांदोलन कुणाशी करावं ? **अ** शी केले तर **प** रागवेल अन् **प** शी केले तर **अ** रागवेल. शेवटी तिने आपले दोन्ही हात पुढे केले. ते दोघांनी पकडले आणि मग एकदम सर्वजण फेर धरून नाचायला लागली. यात जाईला अपूर्व असे काही वाटले नाही. जे घडले, ते जणू स्वाभाविकच होते ! ( हे सर्व आठवून तिला नंतर किती गंमत वाटली ! ) आणि त्याच वेळी एकाएकी संगीताचे सूर सुरू झाले. त्याचेही तिला मुळीच आश्चर्य वाटले नाही. कुठून येत होते ते स्वर ? ज्या झाडाखाली ही तिघे नाचत होती, त्या झाडातूनच येत असावेत. जाईला वाटले, फांदीवर फांदी घासून तर हा आवाज निघत नसेल,– तंतुवाद्यांवरून बोटे किंवा धनुकली फिरवावी तसा ?

(" पण संगीत होतं मजेदार, यात शंका नाही." जाईने पुढे या प्रकाराचे आपल्या ताईजवळ वर्णन केले ते असे : " आणि मी आपली




एकदम गाणं कसं गायला लागले, तीही गंमतच म्हणायची ! केव्हा सुरू केलं नि काय– काही म्हणता काही कळेना माझं मलाच !— गाणं कोणतं होतं, माहीत आहे ?— सहा हातांची फुगडी– मामा देतो लुगडी–")

जाईबरोबर फुगडी खेळणारे ते दुसरे दोघे गडी लठ्ठंभारती होते; त्यामुळे त्यांना लवकर दम लागला. अंगातून घाम ठिबकायला लागून दोघेही

लालबुंद झाले. मग अडघम म्हणाला, "एका फुगडीत इतक्याच फेऱ्या असतात. पुरे आता."

झाले. फुगडी संपली आणि त्याच क्षणी संगीत पण थांबले.

मग त्यांनी जाईचे हात धरले अन् दोघे दोन बाजूंनी तिच्या तोंडाकडे पाहू लागले. जाईला फारच लाजल्यासारखे वाटले. बरे, यांच्याशी बोलायचे तरी काय तेही तिला कळेना. इतका वेळ त्यांच्याबरोबर नाचून झाल्यावर आता त्यांना "काय– कसं काय? बरं आहे ना?" असे थोडेच विचारणार?

शेवटी तिला सुचले काही तरी. ती एकदम म्हणाली, "तुम्ही दमला नाहीत ना, शेटजी?"

"अक्षी नाय." अडघम म्हणाला, "आणि विचारल्याबद्दल धन्यवाद."

"उलटपक्षी," पडघम म्हणाला, "फार न बोलल्याबद्दल धन्यवाद— पण काय ग मुली, तुला कविता आवडतात का?"

"हो– काही कविता आवडतात." जाई म्हणाली. पण तिचे लक्ष दुसऱ्याच गोष्टीकडे होते. "मला या रानातून बाहेर पडायचा रस्ता सांगता का?"

तिकडे अडघम–पडघमनीही तिच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. अडघम पडघमकडे मोटमोठे गंभीर डोळे लावून म्हणाला, "कोणती कविता म्हणून दाखवू हिला?"

"ती 'सुतार आणि वॉलरस' कविता?" पडघम आपल्या भावाला प्रेमाने कवटाळून म्हणाला, "ती मोठ्ठी आहे की!"

अडघमने मिठी सोडवली. तो म्हणाला, "पण हिला वॉलरस माहीत असेल का? अक्षी नाय!"

पडघम म्हणाला, "खरंच की!– उलटपक्षी तिला ते आंबरसासारखं वाटेल काही तरी!— **वाल-रस– वालाचा रस**!"

त्यांची ही आपसांतली बडबड ऐकून जाईला राग आला. ती एकदम म्हणाली, "एवढी काही मला ही समजू नका. मला प्राणी कळतात. वॉलरस म्हणजे सीलमाशासारखा समुद्रात राहणारा पण किनाऱ्यावरही येणारा–"

"**अर्धा** इकडे **अर्धा** तिकडे—" अडघम.

"**अर्धांग** झालेला."— पडघम.

" काही तरी बोलू नका !" जाई चिडून म्हणाली, " एवढं मोठं धूड ते वैलाएवढं ! त्याला काय धाड भरली आहे ?"

" तरी पण अर्धांग असतोच तेला. पुढचे पाय कसे लोंबत अन् मागचे पाय कसे फरपटत नेतो माहीत हाये ?"

' हे मात्र खरं !' जाई आपल्याशी म्हणाली, ' वॉलरसाचे पाय लुळे वाटतात खरे !– पण **म्हणजे** काही अर्धांग नाही. देव असा कसा त्याला जन्मापासून रोगी करील ?' ती मोठ्याने म्हणाली, " आणि त्याला सुळे असतात दोन—"

" बरोबर." पडघमने मान डोलावली. " ते सुळे म्हणजे आमच्या टिपऱ्या असतात. एक अडघमची—"

" दुसरी पडघमची. " अडघम.

" ते काही मला माहीत नाही. पण मुलं वॉलरसाला आजोबा म्हणतात. कारण काय, माहीत आहे ?"

अडघम-पडघम घुम्यासारखे बसले समोर पाहात. हूं नाही की चूं नाही. जणू काही जाईचा प्रश्न त्यांनी ऐकलाच नव्हता.

" कारण–" जाईने स्वतःच उत्तर दिले, " त्याचं ते टक्कल अन् खाली लोंबणाऱ्या छापरी मिशा. त्यामुळे तो आजोबा वाटतो."

" आणि कालवं माहीत आहेत तुला ?" अडघमने विचारले.

" हो ! हात्तिच्या !" जाई म्हणाली, " ते शिंपल्यांत राहणारे लिब-लिबीत प्राणी. समुद्र किनाऱ्यावर खडकाला चिकटलेली असतात कालवं अन् कित्ती तरी लोक ती शिजवून खातातसुद्धा."

" तू खातेस का हा प्रश्न आहे." अडघम म्हणाला, " दुसऱ्याचं सांगू नको. "

" अक्षी नाय !" जाई हसून म्हणाली. तिला वाटले, ही संधी बरी आहे त्यांचेच शब्द त्यांच्या घशात कोंबायला. " उलटपक्षी मासे आवडतात मला !"

" बरं–बरं. विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दे !" अडघम म्हणाला आणि एकदम म्हणतो, " मिस्त्री माहीत आहे तुला ?"

" हो !" जाईने पटकन् मान डोलवीत म्हटले. तिला वाटले, काय पण

जिरवतोय आपण यांची ! पहिल्या नंबरची मुलगी तरी इतक्या भरभरा उत्तरं देईल का ?

पण तेवढ्यात तिला वाटले, यांची आणखी थोडी जिरवावी. म्हणून ती आपल्या छातीवर हात ठेवून अदबीने वाकली अन् म्हणाली, "मी स्त्री."

अडघम रागावून म्हणाला, "अश्शी नाय !"

"उलटपक्षी," पडघम म्हणाला, "तू जर मिस्त्री, तर मग तुझी करवत पटाशी कुठाय ?"

"मी विनोद केला हो, शेटजी !" जाई म्हणाली, "मिस्त्री म्हणजे सुतारदादा हे मला काय माहीत नाही ?"

"माहीत नाही तर सांग तसं !" अडघम म्हणाला आणि त्याने एकदम कविता म्हणायला प्रारंभ केला—

**"डॉक्टर वॉलरस मिस्टर मिस्त्री**
**समुद्रकाठी मध्यान्‌रात्री...."**

या ठिकाणी जाईने त्याला अडवले. शक्य तेवढ्या नम्र सुरात पण निर्धाराने ती म्हणाली, "कविता जर फार मोठी असेल, तर मला आधी रस्ता सांगता का बाहेर पडण्याचा ?"

पडघमने नुसतेच स्मित केले. अडघम पुन्हा गाऊ लागला—

**"डॉक्टर वॉलरस मिस्टर मिस्त्री**
**समुद्रकाठी मध्यान्‌रात्री**
**फिरती हाती घालुनि हात**
**मूर्तिमंत ती गमते मैत्री !**

**रात्रीची ती तसली वेळा**
**माथ्यावरि परि जळता गोळा**
**प्रखर लकाके सूर्य अंबरी**
**चंद्र जाहला लोळागोळा**

चांदोबाची रुसली स्वारी
चर्या त्याची पडे पांढरी
" उपटसुंभ हा कशास आला ?
आत्ता आहे माझी बारी ! "

समुद्र होता ओलाचिंब
रेती होती सुकी खराब
आकाशी नच मेघ न पक्षी
दिसे न जवळी, दिसे न लांब.

वॉलरस– मिस्त्री चाळति हळुहळु
देति हुंदके रडती मुळुमुळु
स्फुंदत स्फुंदत आक्रंदति ते
" किति ही रेती, किति ही वाळू !

केरसुण्या जरि घेउनि आले
सात झाडण्या झाडूवाले
सरेल नच ही तरिही वाळू ! "
अश्रू ढाळित दोघे वदले.

" या हो, या हो, कालवजनहो ! "
वॉलरस विनवी फोडित टाहो
" फिरायला ही जागा सुंदर
चौघे येउनि हात धरा हो ! "

खडकावरती भारी चुळचुळ
त्यात बिलगली कालववाळं
खुळी बुळी ती निजली चुप्प
हाक ऐकुनी करिती चुळबुळ

त्यांचा दादा दाद न देई
शब्द न बोले, नकार दर्शवि
डोके हलवुनि अपुले बोजड
पंगत पुन्हा झोपी जाई !

परंतु छोटी चार कालवे
नटुनी थटुनी आली गर्वे
झकास कपडे, चढवुनि बूट–
पाय नसोनी– नवल केवढे !

दुसरी आली एक चौकडी
नंतर तिसरी तशिच फाकडी
एकामागुनि एक वेंघिती
कालवबाळे लाट गडबडी !

वॉलरस-मिस्त्री बिगिबिगि चालति
मैलावरती उभे राहती
थांबुनि खडकावरी बघति तो...
कालवबाळे कतार करिती !

भाषण करिती डॉक्टर वॉलरस—
"आज बोलण्या विषय सहस्र
जहाज– जोडे– कोबी– धोबी–
डुकरांचे वा पंख अजस्र !"

"थांबा– थांबा" म्हणति कालवे
"भाषण इतुके फार नसावे
गोल गटोळे देह आमुचे
चालुनि चालुनि थकले अवघे !

वाहे घामाचा हा लोंढा !
भिजला अंग्या, भिजला गोंडा."
मिस्त्री बोले, "अच्छा, थांबा !
घ्याच विसावा हवा तेवढा."



खूष होउनी बाळे सकळ
लवंडली खडकावर अंमळ

तोच भयंकर शब्द ऐकले
उठुनी बसली, झाली हतबळ!

बोलत होते डॉक्टरअण्णा
"मीठ-मसाला-मिरपुड आणा
उचला मिस्त्री, झटपट हात
कवळ गिळाया उघडा वदना!"

पोरे झाली पुरी घाबरी
म्हणती होउनि गोरीमोरी
"जरूर जेवा! मारा ताव—
नको परंतू तो आम्हांवर!

रात्र चांदणी असता सुंदर
कृष्णकृत्य का करिता घोर?"
गहिवरुनीया डॉक्टर बोले,
"गोड किती हे बोल खरोखर!"

मिस्त्री काढी शब्द रोकडे
"सुरी उचलुनी कापा तुकडे!"
डॉक्टर नुसता कापे थरथर
उगाच करतो इकडे तिकडे

बोले मग तो, "मेरे दोस्त!
योग्य न वाटे असली गोष्ट
चिमण्या बाळा नाचवुनी मग
खुशाल त्यांना करणे फस्त!"

मिस्त्री म्हणतो, " योग्यायोग्य !
काय कुणाचे कसले भाग्य ?
डॉक्टर, घ्या हो काटे-चमचे
सुधरू या अपुले आरोग्य !"

डॉक्टर लावी रुमाल ओठी
दाटुनि येई करुणा कंठी
मिस्त्री उचली कालव लठ्ठम्
नेत्री अश्रू करिती दाटी

" कक्- कक्- कालव बालमंडळी !
सुंदर झाली सहल आपली
आता परतू या का आपण
घरी मुलांनो याच पावली ?"

वॉलरसाच्या या प्रश्नाते
उत्तर देण्या कुणी न तेथे
कधीच दोघां लुच्च्यांनी त्या
गट्ट पिलांना केले होते !

" मला वॉलरस त्यांतल्या त्यांत आवडला." जाई म्हणाली, " बिचाऱ्या कालवबाळांबद्दल त्याला थोडंसं तरी वाईट वाटलं."

" असेल. पण मिस्त्र्यापेक्षा त्यानेच जास्त कालवं खाल्ली !" पडघम म्हणाला, " त्याने ओठांवर रुमाल का धरला होता, माहीत आहे का ? आपण किती कालवं खातो, ते मिस्त्र्याला मोजता येऊ नये म्हणून !"

" खरं की काय ?" जाई रागाने म्हणाली, " हा भलताच दुष्टपणा झाला ! – मग मला त्यांतल्या त्यांत मिस्त्रीच आवडतो. कारण त्याने वॉलरसाइतकी कालवं खाल्ली नाहीत."

" पण खाता येतील तेवढी खाल्लीच की !" अडघम म्हणाला.

ही एक पंचाईत आली. जाईने थोडा वेळ विचार केला. मग ती म्हणाली, "असं असेल, तर मग ते दोघेही मोठे दुष्ट—"

पण जाईला वाक्य अर्ध्यावरच टाकावे लागले. कारण तेवढ्यात तिच्या कानांवर भप्भप् असा आवाज पडला होता.

आगगाडीच्या इंजिनासारखा. या जंगलात कुठची आगगाडी येणार! तिला प्रश्न पडला. कुणी जंगली जनावर पशू असेल असे वाटून ती परत अडघम पडघमकडे आली.

"का हो?" तिने अमळ घाबरून मोठ्याने विचारले, "या जंगलात सिंह–वाघ आहेत का?"

"नाही. तो काळा राजा घोरतो आहे!" पडघमने सांगितले.

"चल की– पाहायला येतेस?" दोघा भावांनी एकदमच विचारले; आणि प्रत्येकाने तिचा एकेक हात धरला. थोड्याच वेळात ती तिथे झोपलेल्या राजाजवळ येऊन पोचली.

"आहे की नाही सुंदर?" अडघमने विचारले.

जाईला काही 'हो' म्हणवेना. एक लोकरीची उंच काळी टोपी त्याने घातलेली होती. तिचा गोंडा वाऱ्यावर डुलत होता. आणि राजा झोपला होता, तोही अंगाचे वेडेवाकडे मुटकुळे करून. त्याचे घोरणे तर इतक्या जोराजोरात सुरू होते, की—

"घोरता घोरता याचं मुंडकं उडून जाईल, अशी भीती वाटते!" अडघम म्हणाला.

जाई तशी फार विचारी मुलगी होती. ती त्याच्याकडे पाहात म्हणाली, "ओल्या गवतावर झोपून याचं आंग नाही का धरणार? उद्या आजारी पडला म्हणजे?"

"अक्षी नाय!" अडघम.

"उलटपक्षी..." पडघम. "आत्ता त्याला स्वप्न पडतंय. कसलं स्वप्न, माहीत आहे?"

"ते कसं सांगता येईल? कुणीच सांगू शकणार नाही."

"मी सांगतो की!" पडघम एक टाळी वाजवून म्हणाला, "अग, तुझं स्वप्न पडतंय त्याला."

" माझं ? "

" होय. अन् त्याचं स्वप्न पडणं बंद झालं, की तू कुठं जाशील, खबर हाये ? "

" मी कुठं जाणार ? इथंच राहीन." जाई म्हणाली.

" मुळीच नाही ! " अडघम तुच्छता दाखवीत म्हणाला, " अक्षी नाय ! "

" उलटपक्षी–" पडघम म्हणाला.

" तू कुठेच राहणार नाहीस ! उरणारच नाहीस.तू. अग वेडे, तू खरी नाय. त्याच्या स्वप्नातली हाय."

" तो राजा जर जागा झाला, " अडघम म्हणाला, " तर तू विरून जाशील,–विझून जाशील– मेणबत्तीवाणी."

" काही विझत नाही ! " जाई रागारागाने म्हणाली, " म्हणे, तू स्वप्नातली ! तर तुम्ही कोण आहात, सांगा की ! "

" डिट्टो." अडघम म्हणाला.

" डिट्टो." पडघम म्हणाला.

" डिट्टो म्हणजे वरीलप्रमाणे, नाही का ? " जाई स्वतःशी आठवून म्हणाली. " शाळेतल्या पोरांसारखे मध्येच इंग्रजी शब्द काय बोलता ! म्हणजे हे पण स्वप्नातले आहेत ? "

" डिटो–डिट्टो ! " दोघेही दोन्हींकडून तिच्या कानांत एवढ्या जोराने किंचाळले, की शेवटी ती कान दाबून म्हणाली, " केवढ्याने ओरडता आहा ! राजा उठेल की ! "

" वार्ता ऐकून घ्या ! " अडघम म्हणाला, " तो उठेल हे तू सांगतेस ! तू तर त्याच्या स्वप्नातली पोर ! "

" नाही– मी खरी आहे." जाई कळवळून म्हणाली.

" अक्षी नाय ! " अडघम.

" उलटपक्षी ! " पडघम.

" ऊं-ऊं-ऊं–मी खरीच आहे ! " जाईला आता अक्षरशः रडू कोसळले.

" रडून खरी थोडीच होणार आहेस तू ? " पडघम म्हणाला.

" रडण्यासारखं काही झालं आहे का ? "

"मी जर खरी नसते–" जाई म्हणाली, (अन् रडता रडता हसायला लागली. कारण हा सगळाच आचरटपणा वाटला तिला) "तर मला रडता आलंच नसतं!"

अडघमने खूप तिरस्काराने तिच्याकडे पाहिले आणि तो म्हणाला,

"तुला काय वाटते, हे खरे अश्रू हायेत?– अक्षी नाय."

"उलटपक्षी."

"हे दोघेहीबे ताल बडबड करताहेत–" जाई स्वतःशी म्हणाली, "यांच्या नुसत्या बोलण्यावरून रडत सुटणं अगदीच वेडेपणाचं होईल!" आणि आपले अश्रू पुसून तिने शक्य तेवढी हसरी मुद्रा करून त्यांच्याकडे पाहिले. "काही झालं तरी मला रानाबाहेर तर पडलंच पाहिजे. आता खरोखरीच अंधार पडायला लागला की!– तुम्हांला काय वाटतं, शेटजी? पाऊस पडेल का हो?"

अडघमने एकदम उत्तर देण्याऐवजी एक भली मोठी छत्री उघडली अन् स्वतःच्या नि भावाच्या डोक्यावर धरली. मग त्याने वर मान करून तिच्या टपाच्या आत पाहिले. तो म्हणाला, "मला नाही वाटते पडेलसा. इथे आत-मंदी नाय. अक्षी नाय."

"पण बाहेर पडेल म्हणता?"

"पडेल वाटलं तर." पडघम म्हणाला, "उलटपक्षी, त्याला वाटलं तर पडावं त्याने; आमची हरकत नाय."

'आप्पलपोटे कुठचे!' जाई मनात म्हणाली. उघड ती 'नमस्कार' म्हणून त्यांचा निरोप घेणार होती. इतक्यात अडघम एकदम छत्रीखालून बाहेर आला अन् तिचे मनगट पकडून म्हणतो, "ते पाहिलंस?"

त्याचा कंठ दाटल्यासारखा झाला होता, डोळे पिवळे नि गटाणे बनले होते, अन् थरथरणाऱ्या बोटाने तो काही तरी दाखवीत होता. जाईने त्या दिशेने पाहिले, तेव्हा झाडाखाली धूळ खात पडलेली एक छोटी पांढरी वस्तू तिला दिसली.

"अं:! खुळखुळा आहे तो!" जाईने जवळ जाऊन नीट पाहिल्यावर सांगितले. आणि मग तिला वाटले, अडघमशेट उगीचच घाबरले आहेत. म्हणून तिने समजावणीच्या स्वरात म्हटले, "खु-ळ-खु-ळा हो, शेटजी!

त्यात भिण्यासारखं काही नसतं. हा तर अगदीच जुना नि मोडलेला आहे."

"मला वाटलंच !" असे म्हणून अडघमने रागारागाने पाय आपटले अन् चिडून तो आपले केस उपटू लागला. "माझा खुळखुळा– झाला खिळ-खिळा !" आणि त्याने आपल्या भावाकडे असे काही रोखून बघितले, की तो घाबरून मटकन् खाली बसला अन् छत्रीत अंग लपवू लागला.

जाईने अडघमच्या खांद्यावर हात ठेवला अन् म्हटले, "शेटजी, एक जुना खुळखुळा तो काय अन् त्याच्यासाठी एवढं आकांडतांडव करता !"

"पण जुना नाय तो !" अडघम आणखीच संतापून ओरडला, "तुला सांगतो आमी, तो नवा हाय. कालच विकत घेतला आमी. माजा **सुंदर नवा खुळखुळा** !" तो किंचाळला.

पण जाईचे लक्ष तेवढ्यात अडघमकडून पडघमकडे वळले होते. त्याची छत्री काही केल्या मिटत नव्हती. कारण तो स्वत:सकट छत्री मिटीत होता. ते कसे जमणार ? शेवटी छत्रीच्या कापडासकट तो खाली पडला अन् गादी-सारखा गुंडाळला गेला. त्याचे डोके तेवढे बाहेर राहिले. मग ही मोटली तशीच जमिनीवर पडून राहिली. बापड्याचे तोंड सारखे उघडत होते, मिटत होते, अन् डोळे सताड वासलेले होते– कवड्यांसारखे.

"अगदी मासा वाटतो !" जाई आपल्याशी म्हणाली.

"लढायला तयार आहेस ना ?" पडघमने एकदम शांत सुरात विचारले.

"झालंच पाहिजे तयार." पडघम छत्रीच्या गुंडाळीतून बाहेर पडत खिन्नपणे म्हणाला. पण लढाईचा पोशाख कसा घालणार ? हिने मदत केलीन् तर ठीक आहे."

लगेच दोघेही भाऊ हातात हात घालून जंगलात शिरले. थोड्या वेळाने ते परत बाहेर आले, तेव्हा प्रत्येकाचे दोन्ही हात तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूंनी भरलेले होते– उशा, घोंगड्या, पायपुसणी, चादरी, वस्र्यांची झाकणे, भांडीकुंडी !

"तुला पिना लावता येतात ना ?" अडघमने जाईला अदबीने विचारले, "अन् नाड्या बांधता ? – कारण हे सगळं आमच्या अंगावर चढवलं पाहिजे—"

"कुठचं कुठे पण ?" जाई कपाळाला आठ्या चढवून म्हणाली.

"कुठचं कुठेबी !"

विचारी जाई ! लागली कामाला. आणि सोपे नव्हते ते पोशाख चढवणे ! अक्षरशः पिट्टा पडला तिचा. 'बाई-बाई-बाई-बाई !' ती मनात म्हणाली, 'केवढा धिंगाणा घालताहेत. जरा म्हणून एका जागी उभे राहात नाहीत. यापेक्षा कुत्रकुत्री बाळंसुद्धा पुष्कळ बरी ! एक म्हणता एक नाडी बांधू देत नाहीत की गुंडी लावू देत नाहीत. आणि पिन बोचली नाही तरी ओरडतात. आक्रस्ताळी मेले !– आणि हा सगळा शिंगार केल्यावर दिसणार आहेत कसे ते दिसेलच ! शिमग्यातली सोंगंसुद्धा बरी यापेक्षा. ते चिंध्या पांघरलेले वेडे दिसतात ना रस्त्यात कधी कधी– तस्से !'

'बाकी आपल्याला काय करायचंय म्हणा !' पडघमच्या डोक्यावर एक कढई उपडी ठेवीत ती म्हणाली. मग अडघमच्या डोक्याभोवती तिने एक सुंभाची दोरी गुंडाळली– मुंडके तुटू नये म्हणून.

"तुम्हांला माहीत असेलच, शेटजी—" ती फार फार गंभीर स्वरात म्हणाली, "लढाईत सर्वांत वाईट गोष्ट कोणती असेल, तर ती म्हणजे मुंडकं तुटणं !"

आणि आपण कसा विनोद केला म्हणून ती मोठ्याने हसली. पण वेळीच तिने ब्रेक लावला अन् आपल्या हसण्याचे खाकरण्यात रूपांतर केले. कारण तिला एकदम अशी भीती पडली, की हसण्यामुळे शेटजींचा अपमान होईल.

"आमी फार फिका दिसते का ग?" अडघमने काळजीच्या सुरात हळूच विचारले. त्याने आणलेली पळी जाईने त्याच्या पट्ट्यात खोचली आणि ती हळुवार स्वरात म्हणाली, "फार नाही– पण **किंचित** !"

"तसं म्हटलं, तर मी नेहमी शूर असतो," अडघम आवाज चढवून म्हणाला, "पण आज माझा डोका दुखतो हाये लई."

"आणि **माझी** दाढ दुखते हाये." पडघमने त्याचे बोलणे ऐकले होते म्हणून तो म्हणाला, "तुझ्याकरता माझी स्थिती वधारे वाईट हाये."

"अक्षी नाय." अडघम.

"उलटपक्षी....." पडघम.

"हे बघा–" जाई म्हणाली, "एवढं जर तुम्हांला वाटतं आहे, तर लढता कशाला? आज लढलं नाही, तर चालणार नाही का?" तिला वाटले यांच्यांत समेट घडवून आणायला ही संधी बरी आहे.

“ लढाई तर झालीच पाहिजे.” अडघम म्हणाला, “ पण फार नाही, थोडीशी– आत्ता किती वाजलेत, सांग.”

पडघमने चहाच्या गाळण्यात पाहिले. तो म्हणाला, “ साडेचार.”

“ मग आपण सहापर्यंत लढू. नंतर जेवण.”

“ बरं तर.” पडघम रडक्या तोंडाने म्हणाला, “ आणि ही मुलगी पंच होईल.– ए, पण जास्ती जवळ येऊ नकोस, बरं का ? लढायला लागलो, की माझ्यावाणी वाईट कुणी नाय.”

‘ नाही लढलास तरी तुझ्यासारखा वाईट कोण आहे जगात ?’ जाई म्हणाली; पण मनात.

“ वाटेल तसा रट्टे हाणतो– जे जे दिसेल त्याला !” पडघम म्हणत होता.

“ मी तर समद्यांना रट्टे हाणतो.” अडघम म्हणाला, “ दिसेल तेला अन् न दिसेल तेलाबी !”

“ मग तुम्ही झाडांझुडपांना झोडपून काढीत असाल.” जाई स्मित करून म्हणाली.

अडघमने एकदा आपल्या अवतीभवती पाहिले. तो म्हणाला, “ मला नाय वाटत– आमची लढाई संपल्यावर इथं एकबी झाड शिल्लक राहीलसं अक्षी नाय !”

“ उलटपक्षी.”

“ दिवे ओवाळा !” जाई खरोखरीच त्यांच्यापुढे हात नाचवीत म्हणाली. “ आणि हे सगळं कशासाठी ?— तर एका खुळखुळ्यासाठी !”

“ एरवी मला काही वाटलं नसतं.” अडघम म्हणाला, “ पण खुळखुळा नवा होता.”

“ तो प्रचंड कावळा आला, तर बरं होईल बाई !”

“ तलवार एकच हाये.” अडघम आपल्या भावाला म्हणाला, “ तू वाटलं तर छत्री घे.– चांगली टोकदार हाये. पण झटपट सुरुवात केली पाहिजे रे. अंधार पडायला लागला.”

“ किट्ट अंधार.” पडघम म्हणाला.

आणि खरोखरीच एकाएकी इतके अंधारून येत होते, की जाईला वाटले,

ही वादळाची तर चिन्हे नाहीत ?

"पाहा ना केवढा मोठा ढग आहे तो!" ती म्हणाली, "काळा कुळकुळीत ढग– अन् केवढ्या झपाट्यानं येतोय. बाई-बाई-बाई! मला तर वाटतं, या ढगाला पंख असले पाहिजेत!"

"आहेतच मुळी!" अडघम म्हणाला. म्हणाला म्हणजे काय, कर्कश सुरात किंचाळला. आणि लगेच दोघांही भावांनी ढुंगणाला टाचा लावून तिथून पळ काढला!

जाई पण पळाली. जंगलात थोडीशी आत गेल्यावर ती थांबली. एका मोठ्या झाडाखाली उभी राहिली आणि आपल्याशी म्हणाली, 'इथे तो कावळा येणं शक्य नाही. झाडी फार दाट आहे. पण काय ग बाई तरी! आपले ते फताडे पंख एवढ्या जोरात कशाला हालवतो मेला! त्यामुळे केवढं वादळ होतं या रानात!

"— ओ हो! ही कुणाची तरी शाल दिसतेय उडून आलेली! अन् बाई-बाई– किती छानदार आहे तरी! लोकरीची असून वर भरजरी!"

## ५

जाईने बोलता बोलता ती शाल पकडली आणि तिचा मालक कुठे दिसतो का म्हणून ती पाहू लागली. क्षणार्धात एक गोरी गोरी बाई रानातून धावत येताना तिला दिसली. तिला पिसे भरले होते की काय तरी! दोन्ही हात पसरून लांब लांब ढेंगा टाकीत वेड्यासारखी पळत होती. जशी काही उडते आहे हवेतून!

"बरं झालं बाई– मी तुमच्या वाटेत होते म्हणून!" असे पुटपुटत जाईने तिला धरले अन् शाल तिच्या अंगाभोवती गुंडाळली. ती बाई नुसती

तिच्याकडे घाबऱ्या घाबऱ्या पाहात होती अन् आपल्याशी पुटपुटत होती– “ पुरणपोळी–पुरणपोळी ! ” जाईला वाटले– हा मामला अजब दिसतो. ही स्वारी आपण होऊन काही धड बोलेल असे वाटत नाही; आपणच काही तरी सुरुवात केली पाहिजे.

म्हणून ती अमळ भीत भीत म्हणाली, “ मी गोऱ्या बाईसाहेबांना उद्देशून बोलते आहे हे खरं का ? ”

“ हो – खरं. ” खट्टू होऊन बाईसाहेब म्हणाल्या. “ मलाच उद्देशून तू म्हणत असशील तर खरं. ”

ती खट्टू का झाली, हे जाईच्या एकदम ध्यानात आले नाही. मग तिला आठवले– हं बरोबर ! असंच असणार ! त्या झोपलेल्या राजाची ही राणीच असणार अन् तिला मान हवा असणार.

“ श्रीमंत सरकार राजराजेश्वरी महाराज्ञी साहेब ! ” ती आठवून आठवून म्हणाली, “ आता ठीक आहे ना आपली भरजरी शाल ? ”

“ काय शिचं झालंय, कुणास ठाऊक. ” राणीसाहेब म्हणाल्या, “ दोन तास मी नट्टापट्टा करीत होते आणि तरी जमलं नाही मेलं ! ”

‘ खरोखरीच हिनं दोन तास फुकट घालवलेत ’ जाई आपल्याशी म्हणाली, ‘ अगदीच गबाळग्रंथी अवतार दिसतोय ! कुठचीच गोष्ट ठिकाणावर नाही.– आणि सेफ्टी पिना किती टोचल्या आहेत ! ’– “ थांबा, तुमची ती पुन्हा घसरलेली शाल सारखी करते मी ! ” हे शेवटचे वाक्य ती मोठ्याने म्हणाली.

“ काय झालंय त्या शालीला देव जाणे ! ” राणीसाहेब रडव्या आवाजात म्हणाल्या. “ तिचं चित्त ठिकाणावर नसावं बहुतेक. सतरा ठिकाणी टाचलं मी, तरी तिचं समाधान होत नाही ! ”

“ कशी राहील ती सरळ ? ” जाई म्हणाली, “ एकूण एक पिना तुम्ही एकाच ठिकाणी खोवल्या आहेत; त्या सात असोत, नाही तर सतरा असोत– उपयोग काय? ” आणि म्हणून हळुवारपणे तिने स्वतः पिना काढून वेगवेगळ्या जागी त्या हळुवारपणे लावल्या, तेव्हा एकदाची शाल घसरायची थांबली.

“ आणि तुमच्या केसांचा तरी काय विचका झालाय हो राणीसाहेब ? ”

“ काय करणार ? माझा केसांचा ब्रश केसात अडकला तो निघत नाही

अन् फणी काल हरवली, ती सापडतच नाही."

"वरं- वरं-" असे म्हणून जाईने हलक्या हाताने त्यांच्या केसांचा गुंतवळा सोडवला अन् आत अडकलेला ब्रश काढला. मग तिने राणीसाहेबांचे केस चांगले विंचरले आणि त्यांचा भांग काढून ती म्हणाली, "हं! आता पुष्कळच वरं दिसतंय रूप तुमचं! - छे छे छे! राणीसाहेब, तुम्ही एवढ्या मोठ्या राज्याच्या कर्तुमकर्तुम् अधिकारी, मग या कामासाठी एखादी दासी का नाही ठेवीत हाताशी?"



"तू राहतेस का? आठवड्याला दोन आणे देईन. शिवाय एक दिवसाआड मुरांबा." गोरी राणी प्रसन्नपणे म्हणाली.

जाईला हसू आवरेना. ती म्हणाली, "मला नाही बाई राहायचं नोकरीला. अन् मुरांबा तर फारसा आवडतच नाही मला."

"आमचा मुरांबा चांगला असतो!"

"असू दे. आज तरी मला मुळीच नको आहे मुरांबा!"

"आज हवा असता, तरी मिळाला नसता." राणीसाहेब म्हणाल्या. "नियम काय आहे, माहीत आहे का? काल मुरांबा– उद्या मुरांबा; आज थेंब नच, थोडे थांबा!"

"पण कधी ना कधी 'आज मुरांबा' मिळत असणारच." जाई म्हणाली.

"छट्! कधीच नाही. प्रत्येक आडवारी मुरांबा असतो आणि आज हा कधीच आडवार होत नाही."

"कसलं घोटाळ्याचं बोलता तुम्ही!" जाई म्हणाली. "मला काही म्हणता काही कळत नाही!"

"त्याचं कारण तू उलटं जीवन जगतेस– मागे मागे. आमच्यासारखं जगताना पहिल्याने गरगरल्यासारखं होतं खरं. पण—"

"मागे मागे जगणं?" जाई आश्चर्याने म्हणाली, "हा काय प्रकार आहे? आणखीच बुचकळ्यात टाकलं तुम्ही मला."

"अर्थात या जगण्यात एक फायदा हा आहे, की माणसाची स्मरणशक्ती दोन्ही टोकांना चालू शकते."

"काही तरी बोलू नका! माझी एकाच टोकाला चालते. एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडायच्या आधी मला ती कधीच आठवत नाही."

"नुसती मागं मागं चालणारी स्मरणशक्ती." राणीसाहेब तुच्छतेने म्हणाल्या. "म्हणजे अगदीच टुकार म्हटली पाहिजे."

"महाराणी सरकार," जाई त्यांच्यापुढे हात नाचवीत म्हणाली, "आपली स्मरणशक्ती काय दिवे लावते सांगा की! काय काय आठवतं आपल्याला?"

"पुष्कळ आठवतं." राणी बेफिकीरपणे म्हणाली, "पुढल्याच्या पुढल्या आठवड्यात घडलेले प्रसंग आठवतात. उदाहरणार्थ–" राणीसाहेब आपल्या एका बोटावर मेण थापीत बोलल्या, "राजेसाहेबांचा जासूद. मला आठवतं,

की तो आत्ता तुरुंगात आहे, शिक्षा भोगतो आहे. खरं म्हणजे त्याला अजून शिक्षाच झालेली नाही; त्याच्यावरचा खटला पुढच्या बुधवारी सुरू व्हायचा. खटला झाल्यानंतर मग तो गुन्हा करील!"

"आणि समजा, त्यानं गुन्हाच केला नाही तर?" जाईने शंका काढली.

"मग फारच चांगलं!– नाही का?" राणीसाहेब बोटावर थापलेल्या मेणाभोवती पट्टी गुंडाळीत म्हणाल्या.

जाईला वाटले, 'तेही खरंच म्हणा. त्याने गुन्हा केला नाही, तर ते केव्हाही चांगलेच! मुद्दाम त्याने गुन्हा करावा, अशी कोण इच्छा करील? पण—पण – पण—'

"पण मग त्याला जी उगाचच शिक्षा झाली, त्याचं काय?"

"च्–च्! तुझी काही तरी चूक होते आहे, बाळ!" राणीसाहेब म्हणाल्या, "तुझंच बघ, तुला कधी शिक्षा झाली होती का?"

"झाली होती. पण मी केलेल्या चुकांबद्दल." जाई म्हणाली.

"आणि शिक्षेचा तुझ्यावर चांगला परिणाम झाला, हे खरं ना?" हे बोलताना राणीसाहेबांची मुद्रा विलक्षण विजयी दिसत होती.

"हो; पण मी खरोखरीच अपराध केला होता, हे तर खरं ना?" जाई म्हणाली, "दोहोंत फरक असतो पुष्कळ."

"पण असं बघ– तू जर अपराध केलाचनसतास, तर तुझं जास्तीच भलं झालं असतं, खरं की नाही? खूप **खूप खूप खूप** चांगलं झालं असतं!"

राणीसाहेबांनी प्रत्येक 'खूप'च्या वेळी आवाज वर वर चढवीत नेला अन् वाक्य संपवायच्या वेळी तर त्या ओरडायला लागल्या.

"यात कुठे तरी काही तरी चूक होते आहे." असे जाईच्या अगदी ओठांवर आले होते. पण तेवढ्यात राणीसाहेब अशा किंचाळू लागल्या, की तिचे ते बोलणे कुठच्या कुठे विरून गेले. इकडे राणीसाहेब "आः! आः! आः!" म्हणून ओरडत जोरजोराने हातवारे करू लागल्या. जणू काही

त्यांना सबंध हात झटकून टाकायचा होता. "रक्त– रक्त ! माझ्या बोटातून रक्त !"

राणीसाहेबांच्या किंकाळ्या इतक्या हुबेहूब एंजिनाच्या शिट्टीसारख्या वाटत होत्या, की– जाईचे कान किटले. तिने दोन्ही कानांत बोटे घातली.

"काय, झालं काय आपल्याला, राणीसाहेब ?" मध्ये जरा उसंत सापडताच तिने विचारले, "आपलं बोट तर कापलं नाही ?"

"अजून कापलेलं नाही." राणीसाहेब म्हणाल्या, "पण लवकरच कापेल– आः– आः– आः !"

"कधी कापेल असा अंदाज आहे ?" जाई म्हणाली. खरे विचाराल, तर तिला हसू अगदी आवरेनासे झाले होते.

"कसं नशीब आहे बघ माझं–" राणीसाहेब म्हणाल्या, "आता ही शाल चांगली टाचून दिली आहेस ना तू– पण मी ती जरा सावरायला लागले, की लगेच पुन्हा निघून येईल."

आणि खरोखरच तसे झाले. राणीसाहेब जरा पदर ओढून घेतात तोच ती शाल निसटून हातात आली.

"किती भोंगळ आहात हो–" जाई म्हणाली. "पदर कसा सावरावा, तेही कळत नाही. मी लहान मुलगी असून मला जास्त माहीत आहे !" आणि ती आपण होऊन त्यांचा पदर सावरायला गेली. पण उपयोग काय ? त्याच्या आधीच त्याची सेफ्टी पिन निघून राणीसाहेबांच्या बोटाला टोचली होती.

"पाहिलंस ?" त्या जाईला स्मितपूर्वक म्हणाल्या, "मघाशी जे रक्त आलं ना, ते यामुळं !"

"पण मग–" जाई म्हणाली, "तुम्ही किंचाळत का नाही मघासारखं ?" आणि तिने कानांत बोटे घालण्यासाठी हात वर केलेसुद्धा.

"मघाशी किंचाळले की !" राणी म्हणाली, "सारखं सारखं कशाला तेच करायला हवं ?"

एव्हाना सभोवती पुन्हा प्रकाश पडला होता.

"कावळा उडून गेला असणार." जाई म्हणाली, "बरं झालं बाई– मला आपली भीती वाटत होती, की रात्रच झाली की काय !"

"मला पण असंच बरं वाटलं असतं, तर बरं झालं असतं!" राणी म्हणाली, "पण मला बाई बरं वाटण्याचे नियम काय आहेत, तेच माहीत नाहीत. तुझं आपलं बरं आहे बाई— या असल्या जंगलात राहूनच्या राहून तुला हवं तेव्हा बरं वाटू शकतं!"

"एकच वाईट आहे—" जाई उदासवाण्या स्वरात म्हणाली, "इथं फार एकटं एकटं वाटतं." आणि आपल्या या एकांडेपणाचे दुःख तिला इतके जाणवले, की तिच्या दोन्ही गालांवर आसवे ओघळली.

गोरी राणी तर त्यामुळे अगदीच गोंधळून गेली!

"ए! असं काय करतेस ग?" ती हात चोळीत म्हणाली, "विचार कर— आपण किती थोर मुलगी आहो, किती दूर चालून आलो आहो. विचार कर— आता किती वाजले आहेत. विचार कर— कसला वाट्टेल त्याचा! पण रडू नकोस बाई!"

हे तिचे बोलणे ऐकून जाईला रडता रडताही हसू आल्याशिवाय राहिले नाही. ती म्हणाली, "वर्ज्यजोडेमंडित राणीसाहेब, असं नुसतं विचार करण्यानं तुमचं तरी रडं थांबतं का कधी!"

"निश्चितच." राणीसाहेब म्हणाल्या, "त्याबद्दल दुमत असणंच शक्य नाही. कुणालाही दोन गोष्टी एकदम करता येत नाहीत. पहिल्याने आपण विचार करू तुझ्या वयाचा. केवढी आहेस ग तू?"

"साडेदहा वर्षांची." जाई म्हणाली, "बरोबर साडेदहा!"

"हं:!" राणीसाहेब म्हणाल्या, "बरोब्बर म्हणण्याची काही जरूर नव्हती. नसती म्हणालीस तरी खरं वाटलं असतं मला. आता मी काय सांगते ते ऐक. पाहू तुला खरं वाटतं का ते! माझं वय सांगू?— एकशे एक वर्षं, पाच महिने अन् एक दिवस."

"हे नाही बाई मला खरं वाटत!" जाई म्हणाली.

"नाही वाटत?" राणीसाहेब तिची कीव करीत म्हणाली, "फिरून यत्न करून बघ. एक मोठा श्वास ओढून घे, अन् मग डोळे मीट."

जाई हसली. "त्यात काही अर्थ नाही!" ती म्हणाली, "कित्ती केलं, तरी अशक्य गोष्टी खऱ्या वाटत नसतात कुणाला!"

"त्याचं कारण तुला प्रॅक्टिस नाही!" राणीसाहेब म्हणाल्या. "मी

तुझ्या वयाची होते, तेव्हा रोज अर्धा तास प्रॅक्टिस करीत असे. त्यामुळं माझी एवढी तयारी झाली होती, की सकाळचं दूध पिऊन व्हायच्या आधीच मला सहा सहा गोष्टी खऱ्या वाटत असत.– एकाच वेळी!– हत् शिंची! पुन्हा उडाली ती शाल!"

पुन्हा पिन निघाली होती, अन् शाल अशी वेगाने उडाली होती, की या खेपेस तिने एक नाला ओलांडला होता. राणीसाहेबांनीही लगेच हात पसरले आणि शालीच्या मागोमाग त्याही इतक्या वेगाने उडाल्या, की या खेपेस तिचे टोक त्यांना पकडता आले. ते गच्च धरून ठेवून राणीसाहेब विजयी स्वरात ओरडल्या, "सापडलं! आत्ता मात्र सापडलं! आता बघ मी ते कसं पक्कं टाचून ठेवते! काय बिशाद आहे पुन्हा उडून जाईल!"

यावर जाईने नम्रपणे प्रश्न केला, "म्हणजे आपलं बोट आता बरं आहे ना, राणीसाहेब?"

जाई पण तोवर ओढा ओलांडून आली होती.

"पुष्कळच बरं आहे." राणीसाहेब ओरडल्या. आणि जाईला वाटले, या अशा ओरडतात का? आणि त्यांचा आवाज सारखा वर वर का चढतो आहे? – किंचाळल्यासारखा?

"बरं– बेरं– ब्यारं– ब्या– ब्या– ब्यां—"

राणीसाहेब 'ब'वरून 'ब्यां'वर आल्या होत्या. एखादी बकरी ओरडते, तशा ओरडत होत्या त्या. जाईला हा प्रकार फारच चमत्कारिक वाटला. तिने डोळ्यांची उघडमीट केली; पुन्हा त्यांच्याकडे रोखून पाहिले. तिला एकदम असा भास झाला, की राणीसाहेबांच्या अंगावर लोकर चढते आहे.... लोकर!

म्हणता म्हणता राणीसाहेब लोकरीने चांगल्याच मढून गेल्या की! त्यांचा सारा अवतारच बदलला.

राणीची आता मेंढी बनली होती. जाईने डोळ्यांची मिचमीच करून पाहिले, तो तिला असे दिसले, की आपण एका दुकानात उभ्या आहोत. दुकानाची मालकीण एक मेंढी आहे, आणि ती आडव्या फळीमागे खुर्ची टाकून बसली आहे. दुकान लहानसेच. भकास, उजेड फार नाही. आपण फळीवर कोपरे टेकून उभ्या आहो. काही तरी विकत घ्यायला आलो

असणार.

ती दुकानवाली मेंढी एका गुबगुबीत खुर्चीत बसली आहे. तिच्या डोळ्यांवर लठ्ठ भिंगाचा चष्मा आहे, अन् हातांत विणकाम आहे. काय विणते आहे ती,– कुणास ठाऊक! मध्येच वर मान करून ती चष्म्यातून आपल्याकडे पाहते आहे आणि—

"काय हवंय तुला?" मेंढीने विचारले.

"ते ते मलाही अजून समजलेलं नाही." जाई किंचित गोंधळून म्हणाली. "असं करते– आधी सबंध दुकान हिंडून मागच्या–पुढच्या सर्व जिनसा बघते; काही घेण्यासारखं वाटलं, तर जरूर घेईन."

"पुढल्या जिनसा बघशील तू," मेंढी म्हणाली, "पण मागल्या कशा बघणार? तुझ्या पाठीला थोडेच डोळे आहेत?"

"नाहीत खरे माझ्या पाठीला डोळे!" जाई हात जोडून म्हणाली. "पण मला मागे वळता येतं." आणि मग दुकानातून हिंडता हिंडता मागे वळून तिने फळीवर मांडलेल्या सर्व वस्तू पाहण्याचा प्रयत्न केला.

दुकानात तऱ्हेतऱ्हेच्या विचित्र वस्तू होत्या. पण सर्वांत विचित्र गोष्ट ही, की जाई जेव्हा जेव्हा एखाद्या फळीकडे रोखून पाही, तेव्हा ती फळी तिला रिकामी दिसे. बाकीच्या फळ्यांवरून मात्र चिकार वस्तू असत.

"बाई– बाई– बाई!" जाई म्हणाली, "काय इथल्या या वस्तू तरी! क्षणात दिसतात, क्षणात नाहीशा होतात! वर उडून जातात की काय तरी!" अशीच एक मोठ्ठी चकचकीत वस्तू जाईला दिसली होती. नक्की काय होती, ते तिलाही कळले नाही. एकदा वाटे, बाहुली असावी. एकदा वाटे, कशिद्याची पेटी. पण गंमत अशी, की जाई त्या वस्तूकडे पाहायला लागली, की पटकन् ती नाहीशी व्हायची अन् वरच्या फळीवर दिसायची.

"भारीच सतावतेय!" जाई म्हणाली. "पण थांब हं! एक युक्ती सुचली आहे मला. तुझा चांगला नक्षा उतरवते, थांब! या फळीवरून त्या फळीवर असं करीत वर वर चालली आहेस काय? पण कार्टे, मी तुझ्याकडे पाहायचं सोडणार नाही. पाहू किती वर जातेस ती! फार तर वरच्या फळी-पर्यंत जाशील. मग पुढे? आढ्यातून तर काही जाता येणार नाही तुला?"

पण जाईचा तोही डाव फसला. कारण ती 'वस्तू' खरोखरच आढ्यात

शिरली. गुपचूप. जसा काही हा प्रकार तिला नित्याचाच होता!

"तू मुलगी आहेस, की भिंगरी आहेस?" मेंढीने दुसऱ्या सुया घेत म्हटले, "इतकी भिरीभिरी फिरते आहेस, की ते पाहून मलाच चक्कर आली!"



आता मेंढाबाई एकाच वेळी चौदा दुणे अठ्ठावीस सुया घेऊन विणकाम करीत होती. भयंकरच आश्चर्य वाटून जाई तिच्याकडे पाहू लागली.

" एकदम कशा बाई इतक्या सुया चालवते ही ! " ती पुटपुटली, " जिकडे तिकडे सुयाच सुया दिसताहेत. हे असंच चाललं, तर लवकरच हिची साळू बनेल."

ते चपळाईचे विणकाम चालू असता मध्येच तिने जाईच्याही हातांत एक सुयांचा जोड दिला, आणि विचारले, " तुला वल्हवता येतं ? "

" हो, येतं—" जाई म्हणणार होती, " पण जमिनीवर नाही येत—अन् सुयांनी नाही येत—" पण तेवढ्यात बघते, तो हातांतल्या सुयांची वल्ही बनलेली. आणि ते दुकानविकान आहे कुठे ? उलट मेंढी नि आपण खरो-खरच एका होडीत बसलो असून होडी चालली आहे एका नदीच्या पात्रा-तून सर— सर— सर— सर—

आता काय करणार ? जाईला वल्ही मारणे भागच होते.

" पीस ! " मेंढी एकदम ओरडली. तिने तेवढ्यात सुयांचा आणखी एक जोड घेतला होता.

पण ' पीस ' काय ? असला वेडपट उद्गार कुणी काढला, तर त्यावर आपण बोलणार काय ? काहीच नाही. आणि म्हणून जाई काहीच बोलली नाही. ती आपली वल्ही मारीत राहिली. तिला वाटले, या पाण्यात काही तरी विचित्र गुण आहे. वल्ही त्यात रुतून बसतात. पुन्हा वर काढायची म्हणजे केवढे कष्ट पडतात !

" पीस ! पीस ! " मेंढी सुयांचे नवे जोड घेत ओरडली, " लवकरच तुला खेकडा सापडेल बघ ! "

" खेकडा !— अहाहा, मला आवडतो खेकडा ! " जाई म्हणाली.

" मी ' पीस ' म्हणाले, ते ऐकलं नाहीस तू ? " मेंढी एकदम रागारागाने ओरडली. रागाच्या भरात तिने नव्या सुयांचा एक गठ्ठाच उचलला होता.

" ऐकलं की ! " जाई म्हणाली. " किती वेळा तरी म्हणालात तुम्ही. आणि मोठ्यांदा.— पण प्लीज, ते खेकडे कुठं आहेत हो ? "

" पाण्यात— अर्थात ! " मेंढी म्हणाली. तिचे हात सुयांनी इतके भरलेले होते की नव्या सुयांतल्या काही तिला आता डोक्यात खोचाव्या लागल्या. " पीस ! " ती ओरडली. " पीस म्हणते ना ? "

जाई आता जरा चिडलीच ! ती म्हणाली, " पीस पीस करतेस सारखी—

मी पक्षी आहे होय?"

"आहेसच." मेंढी म्हणाली. "कोंबडी आहेस तू!"

जाईला हे ऐकून असा राग आला म्हणता! मग एकदोन मिनिटे कोणीच काही बोलले नाही. होडी आपली सुळूसुळू चालली होती. कधी कधी ती शेवाळातून जायची; अन् मग वल्ही आत जास्तच गुंतून बसायची.

"अय्या!" जाई एकदम आनंदाने टाळी पिटून ओरडली, "दवणा! दवण्याचा किती सुगंध सुटला आहे! पण इथे कसा उगवला दवणा?– अहाहा प्लीज–"

"मला कशाला प्लीज करतेस?" मेंढी विणता विणता म्हणाली, "मी थोडाच लावलाय तो दवणा की खवणा! मी लावलाही नाही नि मी उपटलाही नाही."

"तसं नाही हो–" जाई म्हणाली, "पण मला असं म्हणायचं होतं की, होडी जरा थांबवता का? मी दवणा तोडून घेईन म्हणते!"

"मी कशी होडी थांबवणार?" मेंढी म्हणाली, "होडी वल्हवणारी तू." तू वल्हवायची थांबलीस, तर होडी थांबेल आपसूक."

तेव्हा जाई वल्हवायची थांबली आणि होडी पण पाण्यावरून सरकत जात त्या दवण्याच्या गर्दीत थांबली. आणि मग जाईबाईचा हर्ष काय विचारता! तिने पटकन् आपल्या बाह्या गुंडाळून घेतल्या अन् होडीच्या काठावरून पाण्यात हात बुडवले. ती होडी, ती मेंढी नि तिचे ते अचाट विणकाम– साऱ्या-साऱ्याचा विसर पडला जाईला. इतकी ती दवणा उपटण्यात रंगून गेली. दवण्याचे गुच्छामागून गुच्छ उपटले तिने.

"कित्ती बाई गोड आहे– लाडूक कांदा!" ती मऊ मऊ वनस्पती गालांना लावीत जाई म्हणाली.

"कांदा नाही ग बाई!– कसा गोड दवणा. दवासारखा विरणार तो!"

जाईला त्याचे एवढे नवल वाटले नाही. कारण त्याहून नवल वाटण्यासारखा प्रकार घडला होता. हातातले विणकाम बाजूला ठेवून मेंढी काही तरी जिनसा मांडून ठेवीत होती.

जाईला वाटले, या जिनसा आपण कुठे तरी पाहिल्या आहेत. कुठे बरं? हं, आता आठवलं! दुकानांत. मेंढीच्या दुकानात!

अरेच्या ! हे दुकानच आहे की. ती होडी विडी कुठे पार दिसेनाशी झाली आणि आपण आलो पुन्हा मेंढीच्या दुकानात ! ती पहा दुकानवाली मेंढी-फळीच्या मागे बसून विणकाम करते आहे !

"वाई- वाई- वाई !" असे म्हणून जाई दुकानातल्या जिनसांकडे टकामका पाहू लागली !

## ६

"मला एक अंडं हवं आहे." जाई अमळ भीत भीत म्हणाली, "कोंबडीची अंडी काय भावाने दिली ?"

"चुलतभावाने दिली." मेंढी म्हणाली, "म्हणजे चुलतभाऊ असला इथं, की तो देतो. आत्ता मी देते."

"तसं नाही. मी किंमत विचारली." जाई म्हणाली.

"किंमत होय ? तेरा पैशाला एक. आठ पैशाला दोन."

"म्हणजे दोन अंडी एक अंड्यापेक्षा स्वस्त !" जाई आश्चर्याने म्हणाली. पण पर्समधून काढलेली नाणी तिने आधीच फळकुटावर ठेवली होती.

"अट एवढीच आहे," मेंढीबाई म्हणाल्या, "की दोन अंडी विकत घेतली, तर दोन्ही खाल्ली पाहिजेत."

"मग मला आपलं एकच द्या." जाई म्हणाली; आणि आपल्याशी पुटपुटली,

"हो- नासकंविसकं निघालं, तर काय घ्या !"

मेंढीने पैसे घेऊन आपल्या पेटीत टाकले. ती म्हणाली, "मी कधी गिऱ्हाइकाच्या हातात वस्तू देत नाही. ज्याचा माल त्याने घ्यावा." आणि ती दुकानाच्या पार दुसऱ्या टोकाला गेली अन् तिथे तिने एक अंडे फळीवर उभे करून ठेवले- उभे, बरं का ? आडवे नाही. दुकानात अडगळ खूप होती

आणि अंधारही भयंकर होता. बिचारी जाई कशी तरी धडपडत चाचपडत त्या टोकाला गेली. पण—

'हा काय चावटपणा आहे!' जाई आपल्याशी म्हणाली, 'मी जसजशी जवळजवळ जाते, तसतसं ते अंडं आपलं दूर दूर चाललंय. बघू बरं– आँ? हे काय वाटेत? खुर्ची? खुर्ची म्हणावी, तर तिला फांद्या आहेत. छी ग बाई! इथे दुकानात झाडं उगवावीत– म्हणजे सारंच विलक्षण! आणि अरेच्या! नुसती झाडं नाहीत– इथे तर एक ओढा पण वाहतो आहे झुळूझुळू. बाई ग बाई! असलं चमत्कारिक दुकान मी पृथ्वीच्या पाठीवर कुठंही पाहिलेलं नाही!'

*　　　*　　　*

आणि– चालली होती जाई आपली भटकत भरकटत. प्रत्येक पावला-गणिक तिला नवल वाटत होते. कारण कुठल्याही वस्तूपाशी ती येऊन ठेपली, की तिचे झाड बनत होते. आता तिला भीती ही पडली, की अंड्याचं पण झाड बनतं की काय?

पण नाही. अंड्याचे काही झाड बनले नाही. पण अंडे मोठे मोठे होत चालले खरे. आणि नुसते मोठे नाही, माणसासारखे बनत चालले. जाई त्याच्यापासून दहाबारा फुटांच्या आत येते न येते, तो एकदम तिच्या लक्षात आले –याला नाक आहे, डोळे आहेत, तोंड आहे. आणि अगदी जवळ आल्यावर तिला कळले, हा कोण आहे ते. त्याच्या गळ्यातल्या कॉलरीवर त्याचे नावच लिहिलेले होते मुळी– **अंडोजी गुंडोजी**. कॉलरच होती ना ती? पण कॉलर म्हणावी, तर गळा होताच कुठे गृहस्थाला? नुसतंच भलं मोठं, गोल, गरगरीत आंग! पण काही असो, त्याचं नाव तर कळलं!

अंडोजी गुंडोजी एका उंच नि पातळ भिंतीवर आरामात बसला होता. दोन्ही पाय खाली सोडून.

'बाई– बाई– बाई!' जाई आपल्याशी म्हणाली, 'तोल तरी कसा सावरतो हा? पडत कसा नाही त्या भिंतीवरनं? आणि डोळे पाहा– टका-टका बघताहेत समोर कुठं तरी! माझ्याकडे याचं लक्षच नाही.– हा खरा तरी आहे का? की पेंढा भरलेला बुवा आहे?'

कित्ती तरी वेळ जाई त्याच्याकडे डोळे फाडून नि हात पसरून पाहात होती. हात पसरून अशासाठी, की तिला वाटे– केव्हा डुप्‌दिशी खाली पडेल त्याचा नेम नाही. आपण आपलं तयारीत राहिलेलं वरं.

" हुबेहूब अंड्यासारखा दिसतो ! " जाई पुटपुटली; आणि लगेच अंडोजीच्या तोंडून काही तरी शब्द निघालेले ऐकून ती दचकली.

" चर्र होतं कुणी असं बोललं की ! " दूर पाहात तो बोलत होता, " मी अंडं काय ? "

' आई ग ! याच्या भावना दुखावल्या वाटतं ! ' जाई स्वतःशी म्हणाली; आणि मोठ्याने म्हणते, " मी म्हटलं, तुम्ही अंड्यासारखे दिसता. आणि सगळीच अंडी काही वाईट नसतात. काही फार फार छान असतात वरं ! "

जाईला वाटले, आपण याच्या जखमेवर फुंकर घातली. पण छे ! कसचं काय? तो उलट जास्तीच तडतडायला लागला. अजूनही पाहात होता दुसरीकडेच; पण जीभ मात्र वळवळत होती– " काही लोकांना अंड्यातल्या पिल्लाची पण अक्कल नसते ! "

यावर काय बोलावे, ते जाईला समजेना. ' तसं म्हटलं, तर हे संभाषण थोडंच आहे ? हा माझ्याशी तरी बोलतोय की नाही, देव जाणे ! असं वाटतं, की त्या झाडाशी बोलतोय ! '

काही वेळ जाई गप्प होती. तेवढ्यात तिला एक जुने गाणे आठवले. ते ती गुणगुणायला लागली—

**" अंडोजी गुंडोजी भिंतीवर बसले**
**अंडोजी गुंडोजी धाडदिशी पडले**

**राजाचे स्वार आले**
**राजाचे दास आले**
**त्यांनी केली धावाधाव**
**अंडोजीला उठवण्याची**

**पण काही केल्या जुळेनात**
**डो–डो–डो–डो–**
**डोक्याची शकले !**

" ती शेवटची ओळ बरोबर आहे का पण ? ' डोक्याची शकले ' आहे की ' टकुऱ्याची टर्फले ' आहे– देव जाणे ! "

आपल्याच नादात जाईने गाण्याचे शब्द मोठ्याने उच्चारले होते. अंडोजी गुंडोजी आता तिच्याकडे पाहात होता. तो गुरगुरला, " काय वडवडते आहेस ग ?– आधी नाव सांग पाहू तुझं ? अन् काम ? "

" माझं नाव जाई ! मी—"

" बॉवळट नाव आहे ! " अंडोजीने तिला मध्येच तोडले. " अर्थ काय त्याचा ? "

" अर्थ ? प्रत्येक नावाला अर्थ हवाच का ! "

" अर्थात ! " अंडोजी फुत्कन हसून म्हणतो, " माझं नाव बघ,–आकार कळतो की नाही– त्यावरून ? कसा छान सुंदर आकार आहे ! नाही तर तुझं नाव ! कळतं का त्यावरून तू लांवट आहेस, की आखूड आहेस, की आडवी आहेस, की तिडवी आहेस– की गाढवी आहेस—"

जाई संतापली. पण याच्याशी वाद घालणे नको, असे वाटून तिने त्याला दुसराच प्रश्न विचारला, " तुम्ही भिंतीवर एकटेसे बसलात ? "

" दुकटं कुणी नाही म्हणून ! " अंडोजी ताडकन् म्हणाला, " मला उत्तर यायचं नाही, असं वाटलं होय तुला ? – दुसरं विचार. "

" तिथून आपण खाली उतरलो, तर बरं होईल, असं नाही का वाटत तुम्हांला ? " जाई नम्रपणे म्हणाली. ती काही कोडीत्रिडी घालीत नव्हती. हा गोल गट्टू खाली पडून त्याच्या ठिकऱ्या उडू नयेत, अशी मनापासून इच्छा होती तिची. " भिंत फार चिंचोळी आहे म्हणून म्हटलं. धोका आहे त्यात ! "

" कित्ती भयंकर सोपी कोडी घालतेस ग ? धोका कसला नि बोका कसला ? " अंडोजी गुंडोजी गुरगुरला, " मला मुळीच वाटत नाही तसं. मी पडणारच नाही. आणि समजा, पडलो– तरी– तरी—"

बोलता बोलता त्याने ओठ दाबून धरले होते आणि त्याचे एकूण ध्यान इतके गंभीर दिसत होते, की जाईला हसू आवरेना.

" जरी मी पडलो– " तो म्हणाला, " तरी राजाने मला वचन दिलं आह– का ग ? आता का पांढरी पडलीस ? असं उत्तर येईलसं वाटलं नव्हतं

तुला, खरं की नाही ?— पण राजाने खरोखरीच मला वचन दिलंय की—की—"

" की मी आपले स्वार पाठवीन, दास पाठवीन, हेच की नाही ?" जाई वेड्यासारखी मध्येच बोलली.

केवढी चूक केलीन् तिने ! त्यामुळे स्वारी आणखीच भडकली आणि म्हणते, " दाराशी कान देऊन ऐकत होतीस, काय ग ? दाराआड, झाडाआड, धुराड्यात— कुठं लावलास कान ?"

" नाही हो. मी चोरून ऐकणारी मुलगी नाही." जाई म्हणाली. " मी पुस्तकात वाचलं."

" **पुस्तकात** !" अंडोजी एकदम थंड होऊन म्हणाला, " अस्सं अस्सं ! मग ठीक आहे. कसलं पुस्तक होतं ते ? इतिहासाचं असेल, हो ना ? भारत-महिन्याचा—"


" भारतवर्षाचा—"

" तेच. भारतवर्षाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, हो ना ?— ठीक. पोरी, आता नीट माझ्याकडे बघ. प्रत्यक्ष राजाशी ज्याने भाषण केलं, असा प्राणी आहे मी. तुला कदाचित पुन्हा असा प्राणी भेटणार नाही. पण एवढं असूनही मला गर्व कसा तो माहीत नाही. तुला याचा पुरावा हवा असेल, तर हा बघ हात पुढे केला !— शेक हँड—" (असे म्हणून त्याने हसत हसत जेव्हा हात पुढं केला, तेव्हा जाई फारच घाबरली. कारण एक तर हसताना त्याची जिवणी इतकी फाकली होती, की पार या कानापासून त्या कानापर्यंत ! ' याचं हसू आणखी लांबलं, तर त्याची दोन टोकं मागच्या बाजूस मिळतील, असं भय वाटतं !' जाई आपल्याशी म्हणाली. ' कारण मग याची दोन शकलं व्हायला वेळ किती लागणार ? मुंडकं हवेत, धड भिंतीवर ! बरं, वाकलाय किती, पाहा ना ? पडलाबिडला, तर मग विचारूच नका. एक उडी नि शंभर शकलं !' फार फार जपून तिने तो हात धरला.

" हो ना—" अंडोजी हात हालवीत म्हणाला, " राजाचे तम्माम स्वार नि तम्माम दास येतील मला उचलायला. एका मिनिटात उचलून ठेवतील. पण जाऊ द्या ! आपलं हे संभाषण फारच ' फास्ट ' चाललेलं आहे. आपण असं करू— तो शेवटून दुसरा मुद्दा कोणता होता— तो घेऊ परत."

"मला नाही बाई आठवत तो मुद्दा!" जाई नम्रपणे म्हणाली.

"बरं, मग आपण नव्याने सुरुवात करू." अंडोजी म्हणाला, "आणि



आता विषय निवडण्याची पाळी माझी आहे. तेव्हा— ('बोलतोय कसा पाहा ना!' जाई आपल्याशी म्हणाली, 'जसा काही एखादा खेळच

शिकवतो आहे !') मी तुला एक प्रश्न विचारतो. तुझं वय किती म्हणालीस ?"

जाईने चटकन् गणित केले अन् ती म्हणाली, "दहा वर्षं नि सहा महिने."

"चूक !" अंडोजी गर्वभराने ओरडला, "असं तू मुळीसुद्धा म्हणाली नव्हतीस !"

जाई जरा गोंधळून म्हणाली, "म्हणजे काय ? तू किती वर्षांची आहेस, असंच ना विचारायचं होतं तुम्हांला ?"

"तसं विचारायचं असतं, तर विचारलं असतं !" अंडोजी गुंडोजी म्हणाला, "तेवढी अक्कल आहे मला."

आली पुन्हा वादाची वेळ ? जाईला तर वाद मुळीच घालायचा नव्हता. तेव्हा ती काहीच बोलली नाही.

"साडेदहा कुठची, माझ्या मते तू साडेसात वर्षांची असायला पाहिजे !" तो डोळे वटारून म्हणाला; अन् मग एकदम विचारात पडला. "साडे-सात म्हणजे फार वाईट. अडनाडी. माझं मत विचारशील, तर साताच्या तिथंच तू थांबायला हवं होतंस. पण आता काय म्हणा ? होऊ नये ती गोष्ट झाली ! तू वाढलीस. अन् म्हणे साडेदहा झालीस !"

"मी वाढावं की नाही याबद्दल तुमचा सल्ला नकोय मला !" जाई रागावून म्हणाली.

"का ग ? अभिमान डिवचला की काय तुझा ?"

या असल्या बोलण्याने जाई आणखीच चिडली. पण मन आवरून म्हणते, "मला एवढंच म्हणायचं होतं, की माणूस नेहमीच वाढत असतं."

"माणूस कबूल." अंडोजी डुलत म्हणाला, "पण तुला काय हरकत होती ? तू वाढायची का नाही थांबलीस सातव्या वर्षी ?"

याच्यावर रागवावे की याला हसावे, हेच जाईला कळेना. तिने पुन्हा विषय बदलला.

"तुमचा पट्टा किती छान आहे हो !" ती म्हणाली, "फारच सुंदर गळपट्टा आहे– आपलं– गळपट्टा नाही, कंबरपट्टा ! की पोटपट्टा आहे हो हा ? –अं, माफ करा हं !" तिने 'माफ करा' म्हटले. कारण अंडोजी गुंडोजी एकदम उदास बनलेला दिसला. आपण पुन्हा याला दुखवले की काय,

असे वाटून तिने सारवासारव केली.

"नाही– म्हणजे त्याचं काय आहे– मला नीट कळेना, तुमचा गळा कुठचा नि कंबर कुठची ते! मग वाटलं, नुसतं पोटच पोट आहे—"

अंडोजी गुंडोजी आता भलताच भडकला होता. तरी पण एक-दोन मिनिटे तो काही बोलला नाही. मग त्याने 'गुर्रर्र' केले.

जाईला वाटले, केवढा हा आवाज? याच्या पोटात चांगलंच ढवळत असलं पाहिजे.

"अशी माणसं पाहिली, की माझं पित्त भडकतं!" अंडोजी म्हणाला, "पट्ट्यापट्ट्यातला फरक कळत नाही!"

"माझ्या घोर अज्ञानाबद्दल मला क्षमा करा!" जाई मान खाली घालून इतक्या लीन सुरात बोलली, की अंडोजीचा राग त्यामुळे ओसरला.

"गळपट्टा आहे, हा समजलीस मुली? राजाने भेट दिलेली सुंदर कॉलर. गोऱ्या राजाने. कळलं?"

"खरं की काय?" जाई म्हणाली. बोलायला योग्य विषय सापडला एकदाचा म्हणून तिला बरे वाटले.

अंडोजी गुंडोजी आता चांगलाच खुषीत आला होता. एक पाय वर घेऊन त्याने दुसऱ्या पायावर आडवा टाकला अन् प्रसन्न स्वरात म्हटले, "राजेसाहेबांनी मला ही कॉलर अबाढदिवसाची भेट म्हणून दिली."

जाईने ओठांवर बोट ठेवले आणि ती म्हणाली, "अबाढ– तुम्हांला वाढ-दिवसाची भेट म्हणायचं असेल?"

"मुळीच नाही! मला ही भेट माझ्या अबाढदिवसाला मिळाली."

जाई विचारात पडली. मग म्हणते, "मला आपल्या वाढदिवसाच्या भेटी आवडतात."

"त्याचं कारण तुला अक्कल नाही!" अंडोजी म्हणाला, "असं बघ– वर्षातले दिवस किती?"

"तीनशे पासष्ट."

"ठीक. त्यात तुझे वाढदिवस किती?"

"एक. वर्षाकाठी एक."

"ठीक. आणि तीनशे पासष्टातून हा एक काढला, की उरले किती?"

"तीनशे चौसष्ट."

अंडोजी गुंडोजीने कपाळावर आठ्या चढवल्या. तो जरा साशंक दिसला. मग म्हणतो, "कागदावर मांडतेस?"

जाईला हसू येत होते; पण ते आवरून तिने आपली छोटी वही काढली आणि पेन्सिलीने त्याला वजाबाकी करून दाखवली—

$$\begin{array}{r} ३६५ \\ -\ १ \\ \hline ३६४ \end{array}$$

अंडोजीने वही घेऊन पाहिली.

"बरोबर असावंसं वाटतंय." तो म्हणाला.

"तुम्ही वही उलटी धरली आहे!" जाई उद्गारली.

"समजलं!" तो ती आपल्या पाठीमागे धरीत म्हणाला, "बरोबर वाटतंय मला. अर्थात फार बारकाईनं तपासायला मला वेळ नाही म्हणा. पण चालेल. म्हणजे तीनशे पासष्टांतले तीनशे चौसष्ट दिवस उरले. हे सगळे वाढदिवस नाहीत. म्हणजे **अवाढदिवस**. इतके दिवस भेट मिळालेली चांगली, की एकच भेट मिळालेली चांगली?"

"अर्थात जितक्या जास्त भेटी मिळतील, तितकं जास्त चांगलं!" बिचाऱ्या जाईनं कबूल केलं.

"आहे की नाही?" अंडोजी विजयानंदाने म्हणाला, "झाला की नाही तुझा गोटा?"

"शब्द अमळ नीट वापरीत जा!" जाई जरा रागावून आपल्या सुंदर वेण्या चाचपीत म्हणाली, "बोलण्यापूर्वी मागचा-पुढचा विचार करावा माणसानं."

"मी जेव्हा एखादा शब्द वापरतो," अंडोजी मागे-पुढे डुलत म्हणाला, "तेव्हा मागचा पुढचा विचार करीत नाही. मला हवा तोच अर्थ त्यातून निघतो. जास्त नाही, कमी नाही."

"प्रश्न असा आहे," जाई म्हणाली, "की एकाच शब्दातून वेगवेगळे अर्थ काढता येतात की नाही—"

" प्रश्न असा आहे—" अंडोजी म्हणाला, " की प्रश्न कुणी विचारायचे—तू का मी?"

जाई अगदीच गडबडून गेली. ती काही बोलत नाही, असे पाहून अंडोजीच पुढे म्हणाला, " शब्दांना एकेक स्वभाव असतात. उदाहरणार्थ : क्रियापदं ही फार गर्विष्ठ असतात. विशेषणांना विशेष काही वाटत नाही; त्यांचं आपण काहीही करावं. पण क्रियापदांचं तसं नाही. आणि तरी मी मात्र त्यांना वाटेल तसं वळवू शकतो. उदाहरणार्थ : अपरिहार्यता."

" म्हणजे काय बुवा?"

" म्हणजे काहीही असेल. पण मी तो शब्द अशा अर्थाने वापरला आहे, की या विषयावर झाली एवढी चर्चा पुरे झाली. आता यापुढे तुझा काय बेत आहे, ते सांगितलंस तर बरं होईल. इथे जन्मभर राहण्यासाठी तर तू आलेली नाहीस ना?"

" हा सगळा त्या एका शब्दाचा अर्थ की काय?" जाई कपाळावर आठ्या चढवीत म्हणाली.

" अर्थात ! मी एकाच शब्दाकडून किती कामं करून घेतो बघ. अंडोजी म्हणाला, " अर्थात जास्त कामाबद्दल मी ज्यादा पगार देतो त्याला."

" अस्सं !" जाई म्हणाली. आणखी काय म्हणणार बिचारी !

" महिन्याच्या सात तारखेला येऊन बघ वाटलं तर—" अंडोजी डुलत डुलत म्हणतो, " कसे माझ्या भोवती शब्द जमलेले असतात ते ! पगाराचा दिवस ना?"

(" पगार म्हणून काय देता?" ते नाही विचारले जाईने. त्यामुळे मी पण तुम्हांला ते सांगू शकत नाही.)

" शब्दांचा अर्थ सांगण्यात तुम्ही पटाईत आहा खरे !" जाई म्हणाली. " मग मला एका कवितेचा अर्थ सांगाल का? त्या कवितेतले बहुतेक शब्द मला कळले नाहीत."

" मग मी सांगतो की." अंडोजी म्हणाला, " आजपर्यंत जगात जेवढ्या कविता रचून झाल्या अन् जेवढ्या अजून रचायच्या शिल्लक आहेत, त्या सर्वांचा अर्थ मी सांगू शकतो."

" मग फारच चांगलं." जाई म्हणाली आणि तिने पोलक्याच्या खिशातला

तो चुरगळलेला कागद काढला; मग जाईने ती कविता वाचली—

“**डपेटले ती डडून तेथे**
**ढईत उळती लवे सुरेख**
**आतिचळवळती अतिचडमडती**
**ळंडुर वाजवि ळगोड लंदर !**

“पुरे–पुरे!” अंडोजी म्हणाला, “यात कठीण शब्द बरेच आहेत खरे, पण मी सांगतो तुला त्यांचा अर्थ. पहिला शब्द–**डपेटले** म्हणजे ‘कोंबडा’– तो दोन पायांचा तुरेवाला नि पिसंवाला असतो ना! तो.”

“कळलं.” जाई म्हणाली, “पुढे सांगा. **डडून** म्हणजे काय?”

“**डडून** म्हणजे ‘पहाटेच्या अन् सुमाराला.’ याच्या अर्थामध्ये दोन शब्द आहेत, म्हणून या शब्दाला डबलबार म्हणतात. बाकीचे सिंगलबार.”

“ठीक.” जाई म्हणाली, “आता–**ढईत**! कसला ग बाई शब्द हा!”

“छान आहे.” अंडोजी म्हणाला, “**ढईत** म्हणजे ‘आरवू’ आणि **उळती** म्हणजे ‘लागला.”

“कोंबडा तेथे पहाटेच्या वेळी आरवू लागला–” जाई एकेक शब्द उच्चारीत म्हणाली, “अय्या! बराच अर्थ लागला की! ती पहिल्या ओळीतली **ती** मात्र उगाच दिसते.”

“उगाच असली तर काढून टाक. पुढे ऐक. **अतिचळवळती** म्हणजे माहीत आहे?”

“नाही.”

“झुंदीर.”

“काय?”

“झुरळरूपी उंदीर. हा एक काटेरी प्राणी असतो. तो **अतिचडमडती** म्हणजे ‘बिळात पळतो’. इथे पुन्हा डबलबार आला!”

“फार चांगलं!” जाई कपाळाला हात लावून म्हणाली, “आता शेवटची ओळ सांगून टाका, म्हणजे सगळे बार उडाले!”

“शेवटची ओळ तशी सोपी आहे!” अंडोजी म्हणाला, “**ळंडुर वाजवि ळगोड लंदर** म्हणजे ‘उंदराची बायको शंख करते.’ म्हणजे

एकूण अर्थ असा झाला की, पहाटे कोंबडा आरवायला लागला, की उंदीर बिळाकडे पळतात अन् उंदऱ्या बोंबलत सुटतात."

"का? नवऱ्यांना जेवण वाढायचं असतं म्हणून?" जाईने हसत विचारले.

"चेष्टा करू नकोस;" अंडोजी गुरकावला. "हा मी लावलेला अर्थ आहे. काही विद्वानांचा या बाबतीत मतभेद आहे. ते म्हणतात, की या कवितेतून कच्या बाराखडीतलं प्रत्येक अक्षर गाळलेलं आहे. म्हणून तर शेवटी **कान्त** म्हटलं आहे!"

"म्हणजे? मला वाटलं, **कान्त** हे कवीचं नाव आहे!" जाई म्हणाली.

"छे छे ग!" अंडोजी म्हणाला, "**कान्त** म्हणजे **क** चा अन्त. या कवितेतून कवीने सर्व **क** गाळलेले आहेत."

"हं! आलं लक्षात!" जाई म्हणाली, "म्हणजे आपल्या मोरोपंतां-सारखं! त्यांनी कसे प फ ब भ म गाळून निरोष्ठ रामायण रचलं तसं!"

"पाच-पाच अक्षरं गाळलीन् त्याने! वेडाच म्हणायचा! त्यापेक्षा पाच कप चहा गाळला असतान् तर?"

"'क' गाळलेन् म्हणता?" जाईने आश्चर्याने विचारले, "मग ते गाळलेले **क** घालून कशी दिसेल ही कविता?"

"दाखवतो तुला वाटलं तर. अंडोजी आपल्या खिशात हात घालीत तुच्छतेने म्हणाला. "पण लक्षात ठेव, हे त्याचं मत आहे. मला मान्य नाही."

त्याने खिशातून काढलेला कागद जाईला दिला. तो उलगडून जाईने वाचला. त्यात असे लिहिलेले होते—

**कुं**ड पेटले **कि**ती **क**ड**क**डून तेथे
**क**ढईत उ**क**ळती **का**लवे सुरेख
अतिच **क**ळवळती अतिच **क**डमडती
**का**ळं डु**क्क**र वाजवि **शी**ळ गोड **क**लंदर!

जाई आपल्याशी म्हणाली, 'हाच अर्थ मला जास्ती बरोबर वाटतो;—

म्हणजे त्यातल्या त्यात. पण या ढेरपोट्याला तसं सांगून उपयोग नाही., ती उघड म्हणाली, "पण काय हो? यातलं 'शी' अक्षरदेखील गाळलेलं होतं. ते का?"

"कोणता कवी—" अंडोजीने पोक्तपणे विचारले, "आपल्या कवितेत **शी** ठेवील?"

"तेही खरंच म्हणा!" जाईने कबूल केले. आणि ती हात जोडून म्हणाली, "एवढं ज्ञान मला दिलंत, याबद्दल धन्यवाद."

"प्राधान्येकरून...." अंडोजी म्हणाला. "म्हणजे चालायला लाग इथून! –अच्छा, बाय बाय, टाटा!"

इतक्या भर्रकन् त्याने निरोप दिलेला पाहून जाईला जरा कसेसेच वाटले. पण एवढी वोळखण झाल्यानंतर मुदाम तिथे थांबणेही बरे दिसले नसते. म्हणून ती म्हणाली, "अच्छा! पुन्हा भेटूच आपण."

"भेटलो तरी मी काही तुला ओळखणार नाही." अंडोजी हस्तांदोलनासाठी एकच बोट पुढे करीत म्हणाला, "चारजणींसारखी आहेस तू. तुझ्यात अन् इतरांच्यांत फरकच नाही मुळी."

"**चेहऱ्यावरून** ओळखायची असतात माणसं!" जाई म्हणाली.

"तीच तर तक्रार आहे माझी." अंडोजी म्हणाला, "तुझा चेहरा चारजणींसारखाच आहे. दोन डोळे– इथं–(या ठिकाणी त्याने आंगठा हवेतून फिरवीत डोळ्यांच्या जागा दाखवल्या)– मध्यभागी नाक. त्याच्या खाली तोंड. सगळं तेच! याच्याऐवजी तुझे दोन्ही डोळे जर नाकाच्या एकाच बाजूला असते– किंवा तोंड नाकाच्या खाली नसून वर असतं, तर काही तरी ओळखता आलं असतं!"

"इश्श!" जाई नाक मुरडून म्हणाली, "ते मुळीच चांगलं दिसलं नसतं!"

"दिसलं असतं!" अंडोजी एकदम डोळे मिटून म्हणाला, "जरा थांबून बघ."

जाई थोडा वेळ थांबली. पण तो पुन्हा काहीच बोलेना किंवा डोळेसुद्धा उघडीना; तेव्हा कंटाळून तिने "अच्छा" केले आणि ती मुकाट्याने चालायला

लागली. मात्र जाता जाता तिला स्वतःशी काही तरी पुटपूट केल्याशिवाय राहवेना.

"काय ग बाई तरी!" ती म्हणाली, "आजची ही मुलखत सर्वांत असमाधानकारक—"

आणि मग तो एवढा मोठा शब्द आपण वापरू शकलो, याचा जाईला इतका आनंद झाला, की तिने तो मुद्दाम पुन्हा मोठ्याने उच्चारला— "असमाधानका–र–क—"

पण तिचे ते बोलणे तेवढ्यावरच अडले. कारण तेवढ्यात एक मोठा कडकडाट होऊन ते सबंध रान गदगदा हालले.

## ७

दुसऱ्याच क्षणी झाडीतून सैनिक धावत येताना दिसले— दुडू दुडू, दुडू दुडू. पहिल्याने दोघे दोघे आले. मग तिघे तिघे आले, अन् मग तर दहा दहा किंवा वीस वीस जणांची पथके आली. शेवटी सैनिकांची संख्या इतकी वाढली, की जंगलात त्यांची नुसती दाटी झाली. सबंध रान लष्कराने भरून गेले. जाईला भीती पडली, की हे आपल्याला तुडवून जातात की काय? म्हणून ती पटकन् एका झाडाआड उभी राहिली अन् तिथून सैनिकांची पळापळ पाहू लागली.

तिला वाटले, इतके मध्थड शिपाई आपण उभ्या जन्मात पाहिले नसतील. इकडे धावावे की तिकडे धावावे, हेही त्यांना कळत नाही. वाटेल तसे पळताहेत, कशाला तरी अडताहेत, एकमेकांच्या पायांत अडखळताहेत; पडताहेत, उठताहेत, पुन्हा पळताहेत. कधी कधी तर एक पडला, की त्याच्या अंगावर सतरा सैनिक कोसळताहेत; जिकडे पाहावे, तिकडे सैनिकांचे ढीग.

आणि मग घोडेस्वार आले दौडत दौडत. घोड्यांना चार चार पाय असल्यामुळे की काय, त्यांना तोल बरा सावरत होता. पण अधूनमधून तेही पडत. आणि एकंदरीत रिवाज असा दिसला की, घोडा अडखळला म्हणजे लगेच स्वाराने पडायचे. मिनिटामिनिटाला हा गोंधळ वाढत होता. सैनिकांची एकच मिसळ झाली. शेवटी जाईला ते दृश्य पाहवेना. रानातून बाहेर पडून ती मोकळ्या जागेत आली, तेव्हा कुठे तिच्या जिवात जीव आला. तिथे तिला एक निराळेच दृश्य दिसले. पांढरे ऊर्फ गोरे राजेसाहेब जमिनीवर बसले होते, आणि एका टिप्पणवहीत मोठ्या त्वरेने काही तरी लिहीत होते.

जाई आलेली दिसताच राजेसाहेब एकदम उत्फुल्लपणे ओरडले, " झाडून सगळ्यांना धाडून दिलं! – तू आत्ता रानातून आलीस, तेव्हा तुला वाटेत दिसले का ग शिपाई?"

" चिकार!" जाई म्हणाली, " हजारो दिसले!"

राजेसाहेबांनी वहीत पाहून सांगितले, " नक्की आकडा आहे चार हजार दोनशे सात! – तरी सगळ्याच स्वारांना काही धाडता आलं नाही मला. कारण खेळात भाग घेण्यासाठी दोन घोडे हवे होते. दोघां जासुदांना पण धाडलं नाही. कारण त्यांना शहरात कामगिरीवर पाठवायचं होतं. जरा रस्त्यावर जाऊन बघ बरं– त्यांतला एखादा दिसतो का ते."

" मला तर बाई रस्त्यावर सामसूम वाटतं आहे!" जाई म्हणाली " इकडे पार शून्य आहे, शून्य!"

" तुझ्यासारखी दृष्टी मला असती तर!" राजेसाहेब एक उसासा सोडून म्हणाले, " तुला शून्य दिसलं आणि तेही इतक्या अंतरावरून! या असल्या पुसट उजेडात खरी माणसंदेखील मला नीट दिसत नाहीत."

जाईला याचा नीट बोध झाला नाही. ती आपली अजून डोळ्यांवर आडवा पंजा धरून रस्त्याच्या पलीकडच्या टोकाकडे पाहात होती.

" दिसतंय कुणी तरी येताना!" शेवटी एकदाचे तिच्या तोंडून उद्गार निघाले. पण **किती** सावकाश येतोय! आणि किती ग बाई मुरके मारतोय– तऱ्हातऱ्हा करतोय!" ( कारण जासुदाची चाल खरोखरीच मोठी गमतीची होती. वर खूप उंच उडी काय मारायचा; मध्येच गांडुळासारखा वळवळा-

यचा काय ! हात काय पसरायचा— दोन बाजूंना जोडलेले दोन पंख जसे काही !)

"तऱ्हातऱ्हा काही नाही," राजेसाहेब म्हणाले. "तो सह्याद्रीतला मावळा आहे. आणि हे सारे त्याचे गनिमी चाळे आहेत. तो खुषीत असला, की असे चाळे करीत येतो."

"करू दे चाळे !" जाई म्हणाली, "मला बाई बरा वाटतो !"

"हो ना ?" राजेसाहेब म्हणाले, "आणि असले दोन जासूद आहेत हो आमचे ! एक मोठा, एक छोटा; एक संदेश नेतो, दुसरा संदेश आणतो."

इतक्यात जासूद तिथे येऊन ठेपला. त्या वेळी तो इतका दमून धापा टाकीत होता, की काही वेळ त्याच्या तोंडून शब्दही निघेना. नुसतेच हातवारे करीत अन् राजाला वाकुल्या दाखवीत उभा राहिला !

"या मुलीला तू फार आवडलास रे बाबा !" राजेसाहेब जाईकडे बोट करून म्हणाले. त्यांना वाटले, यामुळे तरी त्याचे चाळे थांबतील. पण छे ! त्याने जाईकडे पाहिलेसुद्धा नाही. आणि त्याचे चाळे क्षणोक्षणी जास्त भयंकर बनत चालले. डोळ्यांतली बुबुळे तर माशांसारखी सुरकांड्या मारू लागली.

"हे काय चालवलं आहेस तू ! मी तर बुवा बावरून गेलो अगदी !" राजेसाहेब म्हणाले, "मला लवकर पाव-लोणी द्या, नाही तर मी बेशुद्ध पडेन !"

हे ऐकून जासुदाने लगेच आपल्या गळ्याभोवती अडकवलेली एक पिशवी खोलली आणि तीतून लोणी लावलेली एक पावाची फाक काढून ती राजाला दिली. राजेसाहेबांनी क्षणात तिचा फन्ना उडवला.

"पाव-लोणी !—" ते पुन्हा हात पुढे करीत म्हणाले.

"आता संपलं पावलोणी." जासूद पिशवी उघडून आत डोकावत म्हणाला. "नुसता कडबा उरलाय !"

"मग कडबा दे— नाही तर तू खा !" राजेसाहेब हळूच पुटपुटले. जासुदाने पिशवीतून कडबा काढून खाल्ला. त्याने त्याला बरीच हुशारी वाटली आणि ते पाहून राजेसाहेब खूष झाले.

"भोवळ यायला लागली, की कडबा चावावा. त्यासारखा दुसरा उतारा

नाही!" राजेसाहेब खंथ करीत म्हणाले.

"मला तर वाटतं—" जाई म्हणाली, "की अशा वेळी डोक्यावर पाणी मारणं हे जास्त चांगलं. किंवा कांदा हुंगायला द्यावा."



"जास्ती चांगलं काय ते नाही मी सांगितलं." राजेसाहेब म्हणाले, "फक्त यासारखा दुसरा उतारा नाही एवढंच म्हणालो."

हे अर्थात खरे होते. आणि जाई तरी कुठे ते नाकारीत होती?

"रस्त्यावरून येताना तुला कुणी दिसलं का?" राजेसाहेबांनी जासुदा-जवळचा थोडा कडबा ओढून चावीत म्हटले.

"शून्य!" तो म्हणाला.

"हो ना?" राजेसाहेब म्हणाले, "हिला पण शून्य दिसलं. म्हणजे शून्य तुझ्यापेक्षा सावकाश चालतं म्हणायचं!"

"कसचं? कसचं?" जासूद म्हणाला, "मी आपल्याकडून करायचं तेवढं करतो पण माझ्यापेक्षा जोरात चालणारं जगात कुणी असेल म्हणाल तर— शून्य!"

"छे छे!" राजेसाहेब म्हणाले, "शून्याला कुठचं ते जमणार? तसं असतं, तर तुझ्याआधी तोच नसता का पोचला इथे?—पण असो; तुझं कम खाणं झालं ना? दडवाही खाल्लास ना? मग आता सांग पाहू आम्हांला —शहराची खबर?"

"सांगतो— कानात सांगतो." जासूद म्हणाला. त्याने आपल्या हातांचा कर्णा करून तोंडाला लावला अन् तो राजाच्या कानावर टेकण्या-साठी तो खाली वाकला. जाईला ते पाहून वाईट वाटले. कारण तिलाही खबर ऐकायची होती. पण गंमत अशी, की जासूद कानात पुटपुटण्याऐवजी खर्ज्या सुरात ओरडला, "पुन्हा ये रे माझ्या मागल्या! पुन्हा दोघांची जुंपली आहे!"

"हे कानात बोलणं झालं?" राजा ताडकन् उडी मारून गदगदा अंग हालवीत म्हणाला, "पुन्हा असला प्रकार केलास, तर तुझ्या सर्वांगाला लोणी फासीन. काय ओरडणं! भूकंप झाल्यासारखं वाटलं मला."

"अं: ! याला फार तर छोटा भूकंप म्हणता येईल." जाई आपल्याशी म्हणाली आणि मग तिने धीर करून विचारले, "पुन्हा कुणाची जुंपली म्हणता?"

"सिंहाची नि शिंगवाल्या घोड्याची." राजेसाहेब म्हणाले.

"राज्यासाठी लढतात ते!" जासुदाने सांगितले.

जाईच्या मते हा खुलासा तितका स्पष्ट नव्हता. कारण राज्यासाठी म्हणजे काय? राज्यावरील निष्ठेमुळे की राज्याच्या लोभामुळे? पण जाईने काही विचारले नाही.

इकडे राजा म्हणाला, "आणि राज्य कुणाचं म्हणशील— तर माझं! पण चल, आपण जाऊन पाहू या. येतेस?"

आणि निघाली दोघे तुरुतुरु धावत. या वेळी जाईच्या मनात एक कविता

घोळत होती (कुठून तिला ती सुचली कोण जाणे)—

**शिंगवाला घोडा पाहून**
**सिंह भ्याला थोडा फार**

**दोघे लढती राज्यासाठी**
**एकांमेकां देती मार!**

**कुणी म्हणाले, "यह लो पाव**
**खाव खाव, छोडो गाँव!"**

**कुणी म्हणाले, "हा घ्या मस्का**
**लढा थांबवा असला फुस्का!"**

"याच्यात नियम काय आहे?" जाईने विचारले, "जो जिंकेल, त्याला राज्य मिळणार?" अर्थात हे ती इतक्या पटकन् बोलली नाही. कारण धावून तिला धाप लागली होती.

"छी छी! असं मुळीच नाही." राजा म्हणाला, "काय तुझ्या कल्पना आहेत!"

"अ–अ–आपण–" जाई थोडीशी चालल्यावर धापा टाकीत म्हणाली, "ह–ह–हळू चालता का जरा? मेहेरबानी करून एक मिनिट थांबा!"

"मेहेरबानी करीन मी–" राजा म्हणाला, "पण मिनिटभर थांबणार नाही. मिनिट किती भर्रकन निघून जातं, माहीत आहे का तुला? एक वेळ पंजाब मेल्ला थांबवणं सोपं आहे ('ते खरं' जाई मनात म्हणाली. साखळी खेचली की झालं!) पण मिनिटाला थांबवणं मुळीच शक्य नाही. अर्थात मिनिटभर थांबणंही शक्य नाही."

जाईला आता बोलण्यापुरताही श्वास उरला नव्हता. तेव्हा दोघेही न बोलता चालत राहिली. थोडे चालून गेल्यावर त्यांना लोकांचा एक मोठा जमाव दिसला. त्या जमावाच्या मध्यभागी शिंगवाला घोडा नि सिंह लढत होते. दोघांनी मिळून इतका धुरळा उडवला होता, की जाईला पहिल्याने त्यांच्यातला कोणता कोण, हेच मुळी ओळखेना. शेवटी एकदाचे तिला ते कपाळावरचे शिंग दिसले आणि हा प्राणी शिंगवाला घोडा आहे, हे तिने ओळखले.

तो दुसरा छोटा जासूद जिथे उभा होता, तिथून जवळच ही दोघे उभी राहिली अन् लढाई पाहू लागली. जासुदाच्या एका हातात चहाचा पेला होता अन् दुसऱ्या हातात लोणी लावलेला पाव.

"नुकताच तुरुंगाबाहेर पडला आहे हा." पहिल्या जासुदाने जाईच्या कानात सांगितले. "आणि याला अटक झाली, तेव्हा याचं चहापान पुरं झालेलं नव्हतं, ते आता संपवतोय तो! तुरुंगात त्याला नुसती कालवं देत. त्यामुळं साहजिकच त्याला भूक न् तहान चिकार लागली.– काय बाळ, कसं आहे तुझं?" असे म्हणत त्याने छोट्या जासुदाच्या गळ्याभोवती हात टाकला.

छोट्या जासुदाने वळून पाहिले, मान डोलावली आणि तो पुन्हा पाव-लोणी खाऊ लागला.

"तुरुंगात बरी होती ना तब्येत?"

छोट्या जासुदाने पुन्हा वळून पाहिले. त्याच्या डोळ्यातून एक अश्रू गालावर ओघळला. पण तो एकही शब्द बोलला नाही.

"बोल की लेका! बोलता येत नाही?" मोठ्या जासुदाने उतावीळपणे विचारले. पण छोटा जासूद नुसता पाव चघळीत राहिला. तर चहाचे आणखी दोन घोट त्याने घेतले.

"बोल की रे पोट्ट्या!" राजेसाहेब ओरडले. "आणि लढाई कशी काय चालली आहे ते सांग की!"

छोट्या जासुदाने बोलण्याचा खूप प्रयत्न केला, तेव्हा पावाचा एक तुकडा त्याच्या घशात अडकला. डोळ्यांतून पाणी येत असता त्याच्या घुसमटलेल्या कंठांतून शब्द आले, "बरी चालली आहे लढाई. प्रत्येकजण सत्याऐंशी वेळा पडला."

"त्यांना पावबीव देत नाहीत वाटतं मधून मधून?" जाईने विचारले.

"देतात की." छोटा जासूद म्हणाला, "मी खातोय तो पाव खरा त्यांचाच आहे."

इतक्यात मधली सुट्टी झाली आणि दोघेही लढवय्ये लढायचे थांबले. सिंह नि शिंगाचा घोडा आपापल्या जागी धापा टाकीत बसले असता राजे-साहेबांनी घोषणा केली, "दहा मिनिटं उपाहाराची सुट्टी!"

मोठा जासूद नि छोटा जासूद लगेच कामाला लागले. तबके भरभरून पाव नि बनपाव त्यांनी मंडळीत फिरवायला सुरुवात केली. जाईने पावाची एक फाक घेतली; पण ती भारीच कोरडी होती.

"मला नाही वाटत आज ते आणखी लढतीलसं...." राजेसाहेब छोट्या जासुदाला म्हणाले. "जा– नगारे वाजवायला सांग." आणि लगेच छोटा जासूद उड्या मारीत गेला–एखाद्या नाकतोड्यासारखा.

एकदोन मिनिटे जाई निमूट बसली होती. मग एकदम तिचा चेहरा उजळला. ती बोट दाखवीत ओरडली, "बघा–बघा ! त्या जंगलातून कोण सपाट्यानं येतंय ते– गोरी राणी ! या राण्या काय तुफान वेगाने धावतात ग बाई !"

"तिच्या मागे शत्रू लागला असेल, दुसरं काय ?" राजेसाहेब तिकडे न पाहताच म्हणाले.

"पण म्हणजे काय ?–" राजाचा तो थंडपणा पाहून जाईला नवल वाटले. "तिच्यावर जर संकट आलं असेल, तर तुम्ही असे गप्प का बसलात ? तुमची पट्टराणी ना ती ? धावा ना तिच्या मागे !"

"काही अर्थ नाही त्यात !" राजा म्हणाला. "ती लेकाची धावते किती सुसाट्याने !– पण नोंद करून ठेवतो वाटलं तर–" असे म्हणून राजेसाहेबांनी आपली टिप्पणवही काढली. "तशी इमानी आहे ती– 'इ' ऱ्हस्व की दीर्घ ग ?"

पण तेवढ्यात शिंगवाला घोडा तिथे आला. त्याचे हात आंगरख्याच्या खिशांत होते. तो तिथून वळता वळता राजेसाहेबांना म्हणाला, "या खेपेस जमलं मला !"

"ते ठीक आहे–" राजेसाहेब अमळ कापऱ्या आवाजात म्हणाले. "पण तू शिंगाने त्याच्यावर हल्ला केलास, हे बरं नाही केलंस."

"लागलं नाही त्याला." शिंगवाला घोडा म्हणाला; अन् वळायचा थांबला. कारण त्याची दृष्टी जाईकडे वळली होती. तो थबकला आणि तिच्याकडे बराच वेळ रोखून पाहात म्हणाला, "हे काय आहे ?"

लगेच मोठा जासूद लगबगीने पुढे झाला अन् त्याने जाईशी त्याची ओळख करून दिली. याही वेळी त्याने दोन्ही हात माकड्यासारखे पसरले होते.

“मुलगी आहे ही.” तो म्हणाला, “आजच कळलं आम्हांला. जीवना-इतकी मोठी आहे आणि तितकीच स्वाभाविक.”

“असं?” शिंगवाला घोडा आश्चर्याने म्हणाला, “मला वाटलं मुलगी हा प्राणी काल्पनिक असतो!– हा जिवंत आहे?”

“चालतो–बोलतो.” मोठा जासूद गंभीरपणे म्हणाला.

शिंगवाल्या घोड्याने स्वप्नात पाहावे, तसे जाईकडे पाहिले. तो म्हणाला, “मुलगी! जरा बोलून दाखव.”

जाईच्या ओठांवर हसू फुटत होते. पण ते कसेबसे दाबून ती म्हणाली, “तुम्हांला खरं सांगू? उलट मी असं समजत होते, की शिंगवाले घोडेच खरे नसतात. फक्त कल्पनेत असतात ते– गोष्टीविष्टीत. जिवंत खराखुरा शिंगवाला घोडा मी कधी पाहिलेला नव्हता!”

“असो.” घोडा म्हणाला, “आता ज्या अर्थी आपण दोघांनी एक-मेकांना पाहिलं आहे, त्या अर्थी आपला खरेपणाही एकमेकांना पटायला हरकत नाही. तू जर मला खरा मानणार असशील. तर मी पण तुला खरी मानीन!– कसा काय वाटतो हा सौदा?”

“उत्तम आहे. मला कबूल.” जाई म्हणाली.

“मग चला!– ए म्हाताऱ्या,” हे तो राजाकडे वळून म्हणत होता, “मला बेदाण्याची केक आण! असले पावाचे तुकडे नाही खाणार मी.”

“बरं–बरं.” राजेसाहेब पुटपुटले आणि त्यांनी मोठ्या जासुदाला खूण केली. “उघड– पिशवी उघड! ते कुजबुजले. “लवकर!– ती नाही. तिच्यात कडबा आहे. ही!”

मोठ्या जासुदाने पिशवीत हात घालून एक मोठी केक काढली अन् जाईजवळ धरायला दिली. मग त्याने त्याच बशीतून एक मोठी बशी अन् सुरी काढली. हे सर्व पदार्थ त्या एका लहानशा पिशवीतून कसे निघाले, हे जाईला कोडेच होते. तिला वाटले, हा एखादा जादूचा खेळ असावा.

हे सर्व चालू असता सिंह त्यांच्यांत येऊन बसला होता. बिचारा फारच थकला भागला अन् झोपेला आलेला दिसत होता. डोळे अर्धवट मिटलेलेच होते.

जाईला पाहून त्याने पापण्यांची मिचमीच केली अन् तो सुस्तपणे म्हणाला,

"हे काय आहे?" त्याचा आवाज खणखणीत होता; पण खोल पोकळीतून घंटानाद व्हावा तसे काही तरी वाटले जाईला तो आवाज ऐकून.

"काय असेल?–तू ओळख पाहू!–मी पैजेवर सांगतो, तुला ओळखणं शक्य नाही!"

"काय ग?" सिंह पेंगल्यासारखा जाईकडे पाहात म्हणाला, "तू कशांपैकी आहेस? प्राणी, वनस्पती की खनिज द्रव्य?"

"काल्पनिक प्राणी आहे तो!" शिंगवाला घोडा आधीच ओरडला. त्यामुळे जाई काही तरी उत्तर देणार होती, ते तसेच राहिले.

"ठीक आहे." सिंह जमिनीवर आरामात वसला अन् पुढल्या पंजावर हनुवटी टेकीत म्हणतो, "काल्पनिक प्राण्या! केक वाट सगळ्यांना!— तुम्ही बसा की–" त्याने राजाला नि शिंगवाल्या घोड्याला सांगितले. "वाटणी नीट केली पाहिजे, वरं का?"

राजेसाहेबांना त्या दोन चतुष्पाद पशूंच्यामध्ये बसावे लागले होते, त्यामुळे त्यांना रग लागली होती. पण करतात काय! दुसरी जागाच नव्हती.

"ते **राज्यावरून** लढणं राहू दे जरा वेळ." शिंगवाला घोडा जिभल्या चाटीत राजाकडे पाहात म्हणाला, "तूर्त **राजावरून** लढायला बरी वेळ आहे, नाही?"

बिचारा राजा घाबरून गेला अन् कापऱ्या हातांनी आपला मुगूट सावरू लागला.

"मी सहज तुझ्यावर मात करीन." सिंह म्हणाला.

"मला नाही खरं वाटत." शिंगवाला घोडा म्हणाला.

"कोंबडीच्या पिल्ला! कशाला बकबक करतोस?" सिंह जागचा उठत रागाने गुरगुरला, "अर्धा गाव घुमवला की तुला?"

या ठिकाणी राजेसाहेब मध्ये पडले. कारण नाही तर पुन्हा लढाई सुरू झाली असती. पण ते जेव्हा बोलले तेव्हा त्यांचा आवाज घावरट नि कापरा येत होता. "अर्धा गाव?" ते म्हणाले. "म्हणजे वरंच अंतर झालं की. कुठून गेलात तुम्ही– जुन्या पुलावरून की नव्या पेठेतून? जुन्या पुलावरून शोभा वरी दिसते!"

"ते काही मला माहीत नाही!" सिंह पुन्हा खाली बसत गुरगुरला.

जवळ येऊन टेपताच तोही स्वार खोगिरावरून खाली घसरला. मग परत वर चढला; आणि दोन्ही स्वार एकमेकांकडे क्रुद्ध नजरेने पाहू लागले. एक शब्द न उच्चारता, निमूटपणे. जाई अगदीच गोंधळून गेली आणि याच्याकडून त्याच्याकडे नि त्याच्याकडून याच्याकडे पाहू लागली.

"**माझी**– या दामाडूची– कैदी आहे ती, समजलास?"– काळा स्वार म्हणाला.

"असेल!" गोरा स्वार म्हणाला. "पण मी पंचाडूने येऊन तिला सोडवलं आहे."

"मग–" काळ्या स्वाराने गंभीरपणे उत्तर केले, "आपल्याला लढूनच हा प्रश्न सोडवला पाहिजे." बोलता बोलता आपल्या खोगिरात अडकवलेले आपले शिरस्त्राण त्याने काढून डोईस चढवले होते. शिरस्त्राणाचा आकार घोड्याच्या तोंडाचा होता.

"युद्धाचे नियम पाळशील ना तू?" गोऱ्या घोडेस्वाराने–पंचाडूने स्वतःचे शिरस्त्राण चढवीत विचारले.

"अर्थात! मी नेहमीच नियम पाळतो." काळा स्वार–दामाडू म्हणाला आणि मग दोघांची चकमक सुरू झाली. अशा त्वेषाने ते एकमेकांवर तुटून पडले, की बिचारी जाई एका झाडाआड दडूनच ते दृश्य पाहू लागली.

'युद्धाचे नियम काय आहेत, कुणास ठाऊक!' ती आपल्याशी म्हणाली. मध्येच भीत भीत डोकावून पाहायची, पुन्हा डोके मागे घ्यायची. 'पहिला नियम तरी असा दिसतो, की एका स्वाराने दुसऱ्याला फटकारलं, की लगेच दुसरा स्वार घोड्यावरून खाली कोसळतो. जर वार चुकला, तर पहिला खाली येतो. दुसरा नियम असा दिसतो, की हातातले दंडुके काखेत धरायचे असतात– छत्रीसारखे आणि बाई ग बाई! हे खाली पडले, की केवढा गोंधळ घालतात तरी! कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही! आणि घोडे मात्र पाहावेत तर अगदी शांत! स्वार पडताहेत, चढताहेत. यांना त्याचं काही नाही. जसे काही घोडे नसून टेबलंच आहेत!'

युद्धाचा आणखी एक नियम असावा; पण तो जाईच्या अजून लक्षात आला नव्हता. स्वारांनी खाली पडताना नेहमी डोक्यावर पडायचे असे. आणि अशा रीतीने दोघेही स्वार जेव्हा जवळ जवळ पडत, तेव्हा लढाई संपे.

आत्ताही दोघे घोडेस्वार असेच पडले होते. लवकरच ते उठले, पुन्हा आपापल्या घोड्यावर चढले अन् मग काळा स्वार "अवडक–चवडक" करीत दिसेनासा झाला.

"झाली की नाही फत्ते?" गोरा स्वार पंचाड्डू कपडे झटकीत म्हणाला.

"म्हणजे तुमचा जय झाला की काय?" जाई म्हणाली. "मला वाटलं, कुणाचाच जय नाही! आणि नाही तरी मला कुणाचंच कैदी व्हायला आवडणार नाही."

"जय कसला ग डोंबलाचा!" पंचाड्डू म्हणतो, "मी ते बाळंतपणाचं म्हणत होतो."

"बाळंतपणाचं?"

"हो. अग, राजघोडी व्याली ना–म्हणून तर तो दामाड्डू पळाला."

"असं होय! ते मला काय माहीत?–पण खरंच की!" जाईने टाळी वाजवली. तिला आत्ता एकाएकी उलगडा झाला होता. ते जुने गाणे तिला आठवू लागले—

**औडक चौडक दामाड्डू**
**दामाड्डूचा पंचाड्डू**
**पंचाड खोड खाजा**
**हिरवा दाणा कुडकुडीत**
**राजघोडी व्याली—**

एवढेच. पुढले तिला आठवेना. ती पंचाड्डूला म्हणाली, "मला बघायला मिळेल का त्या घोडीचं पिल्लू?–शिंगरू म्हणतात नाही का त्याला?"

"मिळेल की! आता तू राणी झालीस, की तुला राजवाड्यात प्रवेश मिळेल. मग बघ."

"अय्या! खरंच की! मी राणी होणार आहे, नाही का?–पण साधी मुलगी राणी होऊ शकते?"

"हो–होऊ शकते!" पंचाड्डू म्हणाला, "पुढे एक लहानसा ओढा लागतो, तो ओलांडलास की झालं. चल, मी तुला हे रान संपेपर्यंत सोबत करतो. मग मात्र मला परतलं पाहिजे. माझी चाल तिथपर्यंतच असते."



म. ग्रं. ... ग्रंथालय ...
क्र. 96437
दि.

"तुमचे फार उपकार झाले!" जाई म्हणाली, "तुमचा तो जिरेटोप काढायला लागू का मी?" त्याला एकट्याला काही ते जमत नाही, हे जाईच्या मघाशीच लक्षात आले होते. शेवटी तिनेच पुढे होऊन तो टोप एकदाचा सोडवला अन् त्याचे डोके मोकळे केले.

"आता श्वास घ्यायला हरकत नाही." गोरा स्वार पंचाडू आपली केसांची झुलपे दोन्ही हातांनी मागे सारीत म्हणाला. त्याचा शांत निर्मळ चेहरा जाईकडे वळला होता; त्याची सौम्य बालिश नजर तिच्याकडे लागली होती. जाईला वाटले, असला अजब सैनिक आपण आयुष्यात कधी पाहिलेला नसेल!

त्याने अंगात पत्र्याचे चिलखत घातले होते. ते त्याच्या अंगाला मुळीच बसत नव्हते. शिवाय एक शिसवी लाकडाची छोटी पेटी त्याच्या खांद्यांवर कापडी पट्ट्याने उपडी बांधलेली होती आणि तिचे झाकण अर्धवट उघडलेले होते. जाईने फारच कुतूहलाने त्या पेटीकडे पाहिले.

"माझी पेटी तुला फार आवडलेली दिसते." पंचाडू प्रेमळ स्वरात म्हणाला, "माझा स्वतःचा शोध आहे हा! मी त्यात आपले कपडे, चंदनाचं खोड, हिरवे दाणे अन् खाजा ठेवतो."

"खाजा?" जाई उद्गारली आणि मग तिच्या एकदम लक्षात आले,— हो, खाजा नावाची मिठाई असते, नाही का?

"मुद्दामच पालथी बांधून ठेवली आहे मी पिशवी. का ते विचार की." पंचाडू म्हणाला.

"का?"

"पावसाचं पाणी आत शिरू नये म्हणून."

"मग पाणी आत शिरलं नाही तरी आतल्या वस्तू बाहेर पडतील, त्याचं काय? झाकण उघडं आहे, हे विसरता तुम्ही!" जाई म्हणाली.

"खरंच की!" गोऱ्या स्वाराचा चेहरा त्रस्त दिसू लागला. "मग साऱ्याच वस्तू पडल्या की काय बाहेर! आणि वस्तू नसतील, तर त्या पेटीचा उपयोग काय?" असे म्हणून पट्टे सोडवून तो पेटी बाजूच्या झुडपात भिरकावून देणार होता इतक्यात दुसरीच काही कल्पना त्याच्या डोक्यात आली आणि त्याने ती पेटी फार काळजीपूर्वक एका झाडाला बांधून ठेवली.

"हे मी का केलं माहीत आहे?" त्याने विचारले.

"नाही."

"मधमाश्या येऊन या पेटीला आपलं पोळं बांधतील या आशेने."

"पण– मग हे कशाला? तुमच्या खोगिरात पाठीकडे एक मोहोळ घेतलेलं दिसतंय की बांधून, मोहोळच आहे ना ते?"

"होय. उत्तम मोहोळ आहे." पंचाड्डू रडक्या सुरात म्हणाला, "पण आतापर्यंत एकही मधमाशी त्यात बसली नाही. ती दुसरी वस्तू म्हणजे उंदराचा सापळा आहे. उंदराच्या भीतीने मधमाश्या येत नसाव्यात. किंवा मधमाश्यांच्या भीतीने उंदीर येत नसावेत. काय भानगड आहे, कळत नाही!"

"पण घोड्याच्या पाठीवर उंदराचा सापळा कशाला? घोड्याच्या अंगावर उंदीर येण्याचा संभव कमी!"

"संभव कमी खरा–" पंचाड्डू म्हणाला, "पण समजा आले, तर घोड्याच्या पाठीवर त्यांनी सैरावैरा धावू तरी नये म्हणून हा बंदोबस्त आहे."

थोडासा थांबून तो पुढे म्हणाला, "कोणत्याही प्रसंगाची माणसाने तयारी ठेवावी हे चांगलं. म्हणूनच तर घोड्याच्या पायात ते तोडे घातले आहेत."

"तोडे कशासाठी?"

"शार्क माशांनी चावू नये म्हणून!" स्वारसाहेब म्हणाले, "हाही माझाच शोध आहे. हं, आता वर चढायला मदत करतेस का मला? हे रान ओलांडीपर्यंत येतो तुझ्याबरोबर. ती बशी कशाला घेतली आहेस?"

"ती– ती बेदाणाकेकची बशी आहे." जाई म्हणाली.

"असं होय? मग असू दे बरोबर. वाटेत बेदाणाकेक मिळाली, तर उपयोगी पडेल. पिशवीत घालतो— जरा मदत कर मला."

आणि खरोखर ती बशी नुसती पिशवीत घालायची, तर केवढा समारंभ झाला! जाईने पिशवी चांगली उघडून धरली होती; पण पंचाड्डूला बशी आत घालता येईल तर? माणूस असा अडनाडी, की बशीऐवजी स्वतःच आत पडला. असे दोन-तीन वेळा झाले. शेवटी एकदाची गेली बशी आत.

मग मात्र लगेच म्हणतो कसा—" जरा कोंबावीच लागली ! त्याचं असं आहे— पिशवीत मेणबत्त्या फार आहेत !"

आणि शेवटी खोगिराच्या टोकाला त्याने ती पिशवी बांधून टाकली. त्यामुळे खोगीर किती शोभिवंत दिसू लागले म्हणून सांगू ? कारण आधीच त्याला किती तरी गोष्टी लटकत होत्या— कांद्यांचे लोंगर, पळ्या, भांडी अन् सटर काय नि फटर काय !

" तू आपले केस नीट पक्के बांधले आहेस ना ?" निघण्यापूर्वी त्याने विचारले.

" नेहमीसारखेच." जाई हसून म्हणाली.

" तेवढ्याने भागणार नाही." तो सचिंतपणे म्हणाला, " वारा फार जोराचा आहे. कॉफीच्या इतका कडक !"

" मग केस उडू नयेत म्हणून एखादा शोध लावलाय का तुम्ही ?" जाईने नम्रपणे विचारले.

" नाही. अद्याप लावलेला नाही. पण–" पंचाड्डू म्हणाला, " केस झडू नयेत म्हणून लावलाय एक शोध."

" असं ? काय आहे तो ?"

" पहिल्याने एक ताठ उंच काठी घ्यावी." पंचाड्डू म्हणाला, " मग आपले केस तीवर चढू द्यावेत. वेल कशी चढते, तसे. केस गळून का पडतात ? कारण त्यांची टोकं खाली असतात म्हणून. टोकं वर केली म्हणजे ते वरवर जातील. कोणतीही वस्तू **वर** पडत नाही, हे माहीत आहेच तुला. खास माझा शोध आहे हा. तुला वाटलं तर वापर."

पण जाईला असला शोध वापरण्याची छाती झाली नाही. काही मिनिटे ती आपली मुकाट्याने चालली होती आणि पंचाड्डूही चालला होता;– म्हणजे घोड्यावर बसून. तो घोड्यावर बसण्यात पटाईत नव्हताच मुळी; त्यामुळे सारखा घसरत होता अन् जाईला त्याला सारखे सावरावे लागत होते.

घोडा मध्येच थांबला (आणि पुष्कळदा थांबायचा तो), की स्वाराची स्वारी पुढे कोसळायची. आणि घोडा एकदम चालायला लागला (तो **फारच एकदम** चालायचा), की स्वाराची स्वारी मागे कोसळायची. एरवी तसा बरा बसायचा तो. फक्त कधी डावीकडे तर कधी उजवीकडे कोसळा-

यचा. आणि बहुतांशी असे व्हायचे, की ज्या बाजूने जाई चालत असे, त्याच बाजूला हा अपघात होई. त्यामुळे जाईने आपले ठरवून टाकले, की घोड्यापासून अमळ दुरून चालणे हाच उत्तम मार्ग !

तो पाचव्यांदा खाली गडगडला, तेव्हा त्याला उठवताना जाई म्हणाली, "तुम्हांला फारशी प्रॅक्टिस दिसत नाही घोड्यावर बसण्याची."

पंचाडू फार चाकित झालेला दिसला. त्याचा अपमानही झाला असावा. कारण तो गुरगुरतच म्हणाला, "कशावरून म्हणतेस तू हे ?"

"कारण प्रॅक्टिस असली, की माणसं पडत नाहीत अशी !" जाई म्हणाली.

इकडे आपली पुन्हा पलीकडच्या बाजूला गडगडन्ती होऊ नये म्हणून पंचाडूने इकडून चाललेल्या जाईचे केस पकडले होते अन् तो कसाबसा खोगिरावर सावरून बसत होता.

"प्रॅक्टिस पुष्कळ आहे मला–" पंचाडू म्हणाला, "चिकार प्रॅक्टिस आहे !" यावर जाईला काय बोलावे ते सुचेना. ती नुसती "खरंच ?" एवढेच म्हणाली. मनातून मात्र ती टोमणा देत होती, 'चिकार आहे तर असे भिकार का बसता ?' यानंतर काही वेळ यांची मिरवणूक गप्प गप्प चालली होती. स्वाराने डोळे मिटलेले होते अन् स्वतःशी तो काही तरी पुटपुटत होता. आणि जाई त्याच्याकडे सचिंतपणे पाहात होती.– हो ! पुन्हा केव्हा घसरेल नि केव्हा नाही, कुणी सांगावं !

"अश्वविद्या ही एक महान विद्या आहे." पंचाडू आपला उजवा हात नाचवीत खर्ज्या सुरात बोलत होता, "या विद्येचं रहस्य–" पण त्याचे ते रहस्य मुखाबाहेर पडण्यापूर्वीच स्वारसाहेब स्वतः खाली पडले, आणि या खेपेस जाईच्या अगदी जायच्या वाटेवरच त्यांनी लोळण घेतली. त्यामुळे ती फारच भ्याली आणि पंचाडूला हलकेच उचलून घेत तिने विचारले, "हाडंबिडं मोडली नाहीत ना ?"

"फारशी नाहीत." पंचाडू म्हणाला. जणू काही दोनतीन हाडे मोडणे म्हणजे रोजचीच गोष्ट होती. "तर मी काय म्हणत होतो– हो ! या अश्वविद्येचं सबंध रहस्य तोल सावरण्यात आहे. म्हणजे कसं ?– तर असं–"

लगामावरचे दोन्ही हात त्याने सोडून दिले आणि ते दोन्ही बाजूंना

पसरीत तो जाईला आपला मुद्दा पटवून देऊ लागला. पण दुसऱ्याच क्षणी त्याचे पुन्हा अधःपतन झाले. आणि या वेळी तो जो पडला, तो सरळ घोड्याच्या टापांखाली उताणा !



जाई त्याला उचलायला धावली, तेव्हाही त्याची वटवट चालूच होती– "चिकार प्रॅक्टिस आहे– चिकार !"

"आचरटपणा आहे नुसता !" जाईच्या सहनशक्तीचा अंत होऊन ती ओरडली. "तुला असला घोडा उपयोगाचाच नाही. तुला पाहिजे लाकडी

घोडा– चाकं लावलेला !"

"का ग? तो जास्त चांगला जातो?" पंचाडूने आस्थापूर्वक चौकशी केली. पण ती करतानाही तो पुन्हा पडायला आला होता. कसा तरी सावरला.

"जिवंत घोड्यापेक्षा पुष्कळच सर्रकन् जातो." जाई खिदळत म्हणाली. काय करणार? तिला हसू मुळी आवरतच नव्हते. आता दोघेही पायीच चालू लागली.

"मग मी आणवीन एक." पंचाडू विचार करून म्हणाला, "एक-दोन आणवीन. किंवा चिकार आणवीन."

यानंतर दोघेही गप्प गप्प चालली होती. मग पंचाडू एकदम म्हणतो, "शोध लावण्यात माझा हातखंडा आहे. मघाशी तू मला उचललंस. तेव्हा मी बराच विचारमग्न दिसत होतो, हे तुझ्या लक्षात आलं का?"

"हो. गंभीर वाटला खरा तुमचा चेहरा!" जाई नम्र सुरात म्हणाली.

"हं. त्याचं कारण असं की, मी नवा शोध लावण्याच्या बेतात होतो. फाटकावरून पार कसं व्हावं याचा शोध! तुला ऐकायचंय?"

"जरूर."

"सांगतो. आधी शोध लागला कसा ते सांगतो– असं बघ,–मी स्वतःला म्हणालो, 'खरी अडचण आहे ती पायांच्या बाबतीत. डोकं चिकार उंचीवर असतं.' तेव्हा असं करायचं– आधी फाटकावर डोकं टेकायचं. ते उंचीवर असतंच. मग डोक्यावर उभं राहायचं म्हणजे पाय पण उंचीवर जातात. मग पलीकडे जाणं सोपं असतं! आहे की नाही?"

या 'शोधा'वर जाईने नीट विचार केला. ती आपल्याशी म्हणाली, 'याला आम्ही कोलांटी उडी म्हणतो. यात नवा शोध तो कसला?' पण उघड ती एवढेच म्हणाली,

"पलीकडे जाणं जमेल. पण यात त्रासही खूप होईल, असं नाही वाटत तुम्हांला?"

"काय की बुवा!" पंचाडू गंभीर तोंड करून म्हणाला, "झाला तर झाला. त्रास व्हायचाच! अजून मी हा प्रयोग केलेला नाही एवढं खरं!"

स्वाराला बरीच खंत वाटल्यासारखी दिसली. तेव्हा त्याचे मन आणखी

दुखवू नये म्हणून जाईने विषय बदलला. ती एकदम म्हणाली, "किती ग बाई चमत्कारिक जिरेटोप आहे तुमचा! शिरस्त्राण ऊर्फ जिरेटोप! हा पण तुम्हीच शोधून काढलात की काय?"

जिरेटोप लोंबत होता खोगिरालाच. तिकडे पंचाइने मोठ्या गर्वाने पाहिले आणि तो म्हणाला, "होय. पण याच्यापेक्षा चांगला जिरेटोप ऊर्फ शिरस्त्राण मी शोधून काढलंय. पण ते घालायला त्राण नाही माझ्या अंगात!"

"का?"

"ते शिरस्त्राण ऊर्फ जिरेटोप शिन्याचा बनवलेला असून त्याला जिरं लावलेलं आहे. तो मी जेव्हा जेव्हा घालीत असे, तेव्हा तेव्हा, घोड्यावरून पडायची कधी पाळी आली तर काय व्हायचं, माहीत आहे?"

"नाही माहीत."

"तो टोप बदूकन जमिनीला टेकायचा. त्यामुळं डोक्याला लागायचं नाही. अर्थात शिन्यातच डोकं जाण्याची भीती असे हे खरं. एकदा अगदी अक्षरशः तस्सं झालं. अन् गंमत अशी, की मी त्या शिन्यातून बाहेर पडण्यापूर्वीच दुसरा गोरा घोडेस्वार आला आणि त्यानेच तो उचलून स्वतःच्या डोक्यावर घातला. माझ्यासकट. त्याला तो त्याचाच टोप वाटला!"

हे सांगताना स्वार इतका गंभीर दिसत होता, की जाईला हसण्याचे धैर्य झाले नाही. ती कापऱ्या आवाजात एवढेच म्हणाली, "म्हणजे तुम्ही त्या दामाडूच्या डोक्यावर बसलात तर! लाथाबिथा झाडून त्याला बेजार नाही ना केलंत?"

"लाथा झाडल्याच ग!" पंचाडू म्हणाला, "आणि तेवढ्यात त्याने टोप काढून घेतला. पण टोपातून **मला** काढणं सोपं नव्हतं. कित्ती तरी तास लागले मला त्यातून बाहेर पडायला. ज्याम अडकलो होतो मी— पेरूच्या ज्यामसारखा."

"तो ज्याम निराळा जन् हे ज्याम निराळं." जाईने त्याला समजावून सांगितले.

"कसलं निराळं ग?" पंचाडू मान हालवून म्हणाला, "सगळं सारखंच." मान हालवताना त्याने हातही खूप हालवले. त्यामुळे एकच गडबड उडून तो पुन्हा खाली घसरला; आणि या खेपेस जो पडला, तो थेट

रस्त्याच्या कडेला एक खड्डा होता त्यात.

जाई धावतच त्या खड्ड्यापाशी गेली. त्याच्या या अचानक पडण्याचा तिलाही अमळ धक्काच बसला होता. कारण आताशा बराच वेळ स्वार-साहेब बऱ्यापैकी घोडा हाकीत होते. आता पुन्हा पडतील अशी तिला तरी कल्पना नव्हती.

जाईने ओणवून पाहिले, पण पंचाड्ड मातीत उलटा पडला होता. त्यामुळे त्याचे फक्त पाय दिसत होते. त्याची बडबड मात्र अजून चालूच होती—

"सगळाच ज्याम ग! पण हे त्याने बरं केलं नाही. दुसऱ्याचा टोप उचलून स्वतःच्या डोक्यावर ठेवायचा आणि त्या टोपात दुसरं माणूस आहे हेदेखील पाहायचं नाही म्हणजे काय?"

"खाली डोकं वर पाय असताना—" जाई त्याचे पाय धरून त्याला ओढीत म्हणाली, "तुम्ही असे शांतपणे बोलू कसे शकता?"

जाईने त्याला एका मातीच्या ढिगावर ठेवले होते. तो उठून बसला अन् तिच्याकडे आश्चर्याने पाहात म्हणाला, "म्हणजे? माझं शरीरं उलटं आहे की पालटं आहे, त्याच्याशी काय करायचं मला? माझा मेंदू काम करतोय ना? मग झालं!-उलट मी तर म्हणतो, माझं डोकं जितकं जास्त खाली असेल, तितका माझा मेंदू जास्त जास्त शोध लावतो."

थोडा वेळ तो आपल्याशीच विचार करीत होता. मग एकदम म्हणतो, "सर्वांत विलक्षण शोध मी लावला, तो एका नव्या चटणीचा. आणि तोही जेवता जेवता!"

"असं?" जाई हसत म्हणाली. "आणि लगेच नवी चटणी वाटून मागच्या भाताबरोबर खाता आली म्हणता?"

"**मागच्या** भाताबरोबर नाही." पंचाड्ड विचारात पडून म्हणतो, "म्हणजे मागच्या **भाता**बरोबर नाही."

"मग पुढच्या दिवसावर गेलं असेल ते चटणी खाणं?" जाई म्हणाली, "नाही तरी एकाच जेवणात दोन दोन चटण्या थोड्याच कुणी खातं?"

"**पुढच्या** दिवसावर काही नाही." पंचाड्ड म्हणाला, "म्हणजे पुढच्या **दिवसा**वर नाही. खरं सांगायचं तर—" असे म्हणत म्हणत त्याने आपली मान खाली केली होती आणि त्याचा आवाज आणखी आणखी मंद होत

होता. “ खरं खांगायचं तर ती चटणी नीट वाटलेलीच नव्हती—”

“ समजलं.” जाई स्मित करून म्हणाली, “ कुणाला कमी, कुणाला जास्त.”

“ भरड वाटली होती. आणि तरी मी असंच म्हणेन– ” तो ठासून म्हणाला, “ की तो माझा सर्वोत्तम शोध होता.”

“ कशाची केली होतीत चटणी ?” जाईने त्याला बरे वाटावे म्हणून विचारले. कारण विचाऱ्याची बरीच निराशा झाल्यासारखी दिसत होती.

“ टिपकागदाच्या चोथ्याची.” पंचाइने एक उसासा सोडीत म्हटले.

“ शी ! ” जाई म्हणाली, “ अगदीच बेचव लागेल ती ! ”

“ नुसती नाही ग.” पंचाइ म्हणाला. “ त्यात मसाला घातला होता, सुरुंगाची दारू, मेण आणि आगकाड्या.–पण थांब, आलो आपण जंगलाच्या शिवेवर.”

पण जाईचे तिकडे लक्षही नव्हते. तिच्या मनात अजून ती चटणीच घोळत होती.

“ तुझा चेहरा उदास का ?” पंचाइने काळजीच्या सुरात विचारले. “ थांब, मी तुला एक गाणं गातो.”

“ फार मोठं नाही ना ?” जाईने लगेच विचारले. कारण आतापर्यंतच तिला कवितांचे अजीर्ण झाले होते.

“ मोठंबिठं कुणास ठाऊक ! ” पंचाइ म्हणाला, “ पण सुंदर आहे एवढं निश्चित. ते गाणं मी गायला लागलो, की ऐकणाराच्या डोळ्यांतून अश्रूंची धार तरी लागते– नाही तर– नाही तर—”

“ नाही तर काय ?”

“ लागत नाही. गाण्याचं नाव आहे अटक मटक.”

जाईला आता याची सवय झाली होती. ती एकदम म्हणाली, “ मला माहीत आहे– अटक मटक, चण्णे चटक—”

“ चण्णे चटकही म्हणतात कुणी कुणी. पण गाण्याचं खरं नाव आहे ‘ रामजी पोर ’. आणि कंसात ‘ मुक्त धंद ’.”

“ मुक्त छंद असेल ! ” जाई म्हणाली.

“ आपल्याला माहीत नाही, तर मधे मधे बोलतेस कशाला ?” पंचाइ

म्हणाला, "मुक्त धंदच आहे. गाण्याचं नाव आहे 'म्हाताऱ्याची मिशी'."

"ती नावं राहू देत—" जाई कंटाळून म्हणाली, "गाणं काय आहे ते सांगा की."



"सांगा काय म्हणतेस? गा म्हण. ते गायचं असतं. या गाण्याचं नाव आहे 'फाटकावरचा बाबा'. सूर पण मीच शोधून काढलेत."

आणि असे म्हणून त्याने एकाएकी घोड्याला उभे केले. लगाम त्याच्या पाठीवर ढिला सोडला आणि एका हाताने ठेका धरून तो गाणे म्हणू लागला. या वेळी त्याच्या बालिश निर्व्याज मुखावर जे हसू खेळत होते, त्यावरून स्वारी स्वतःच्याच गायनात पूर्णपणे रंगून गेलेली दिसली.

आरसे-नगरीतून हिंडताना जाईने जे अनेक चमत्कार पाहिले, त्यांत तिला सर्वांत ठसठशीत आठवण जर कसली राहिली असेल, तर ती याच प्रसंगाची. त्यानंतर वर्षांमागून वर्षे गेली तरी जाईच्या डोळ्यांपुढून ते दृश्य कधी पुसले गेले नाही. तो गोरा गोरा पान घोडेस्वार पंचाड्, त्याचे ते रानात मोकळेपणी चरणारे पांढरेधोप तट्टू, त्या तट्टावर लादलेले ते सटर-फटर सामान, त्या सामानाच्या ढिगात कशीत्रशी घातलेली ती स्वाराची ढिसाळ मांड, त्याच्या हातातून गळलेला तो लगाम, त्याच्या अंगावरचे उन्हात चकाकणारे चिलखत, आणि सर्वांत विशेष म्हणजे त्याचा तो सौम्य निष्पाप बालिश चेहरा,– अन् निळसर छटा असलेले लहान बाळासारखे मोठाले डोळे; – ही सर्व जाईला अजून दिसत असतात. त्या वेळी काळ्या कभिन्न जंगलाच्या पार्श्वभूमीवर घोडा नि स्वार यांचा तो देखावा ठळकपणे उठून दिसत होता; आणि एका झाडाला टेकलेली जाई कपाळाशी आडवा हात धरून तिकडे पाहात आधाशीपणे ते दृश्य आपल्या मनात साठवून ठेवीत होती. तिचे कान तिच्या नकळत गाण्याचे सूर टिपीत होते. सारेच कसे स्वप्नासारखे वाटत होते तिला—

'हा सांगू दे पुष्कळ,' ती आपल्याशी म्हणाली, 'पण हे सूर काही याचे नव्हेत. जुनेच आहेत.'

फार फार लक्ष देऊन जाईने ते गाणे ऐकले, तिला ते आवडलेही. पण तिच्या डोळ्यांतून अश्रूबिश्रू मात्र आले नाहीत.

**अटक मटक**<br>
**चवणे चटक**<br>
**एक होतं छान**<br>
**बागेचं फाटक.**

चण्णे झाले गोड गोड
फाटकावर बसला रामजी पोर
'रामजी पोरा, तुझा धंदा काय?'
'पितो दूध अन् खातो साय!'

अटक मटक
मला आला राग
'रामजी पोरा, खरं खरं सांग!'
'बैठकीच्या खोलीत लावतो ऊस
डोंगर पोखरून काढतो घूस!'

अटक मटक
मी झालो गरम—
'रामजी पोरा, तुला नाही शरम!
काय तुझा धंदा, बोल पटदिशी!'
'गोठ्यात बसून पिळतो मिशी!'

"त्याला 'म्हशी' म्हणायचं असेल!" जाई मध्येच म्हणाली. पण पंचाडूचे गाणे आपले चालूच होते.

अटक मटक
'रामजी पोरा,
काय तुझा उद्योग
चावट चोरा!'

'वाळूच्या तेलात
भिजवून खडे
मेणाच्या कढईत
तळतो वडे!'

"मला ती बहिणाबाईची कविता आठवते—" जाई टाळी पिटून म्हणाली.

“ दया नाही माया नाही, डोयाले पाणी. गोगलगायीच्या दुधाचं काढावं लोणी !” तिकडे पंचाडू गात होता—

अटक मटक
‘ रामजी पोर
मारतो थापा
करतो जोर !
धरा याची शेंडी,
करा याला उलटा !
खरं सांगेस्तो
ठोका पुरता !’

अटक मटक
रामजी पोर
रडला आरबी
समुद्र भर
‘ अप्पा अक्का,
मला मारू नक्का !
कपाळावर पाहा
पांढरा शिक्का
करतो भजन
हातांत टाळ
गळ्यात घालतो
तुळशी माळ !’

अटक मटक
रामजी पोर
म्हणे, ‘ मंडळी,
मी नाही चोर !
विठूचं नाव
देवावरि भाव

गातो फिरतो
गावोगाव
मध्येच मारतो
चण्याच्या फक्क्या
कोट्या करतो
कच्च्या पक्क्या
माझा विनोद
अफलातून
रुचला नाही
तर द्या सोडून !

विठ्ठल विठ्ठल
टाळी पिटंऽल
त्याला भ्येटंऽल
विठ्ठल विठ्ठल !
विठ्ठल विठ्ठल
विठ्ठल विठ्ठल—'

आणि गाणे म्हणता म्हणता पंचाड्ू स्वतःच टाळ्या पिटीत त्यात इतका रंगला, की त्याला कशाचेच भान राहिले नाही. आणि खुद्द जाईदेखील डोळे मिटून 'विठ्ठल – विठ्ठल' म्हणत टाळ्या पिटायला लागली आणि ती पण इतकी रंगली, की तिलाही कशाचे भान राहिले नाही.

शेवटी तो गोरा घोडेस्वार पंचाड्ूच अगोदर भानावर आला. त्याने आपला लगाम खेचला आणि घोड्याची मान आल्या रस्त्याकडे वळवून तो म्हणाला, "आता आमचा रामराम घ्यावा. तुला पुढे फार जावं लागणार नाही. थोडंसंच. ती टेकडी उतरून खाली गेलीस, की लहानसा ओढा लागेल. त्याच्या पलीकडे गेलीस, की तू राणी होशील !—पण आधी मला निरोप देतेस का ? फार वेळ मोडणार नाही." तो मघाच्या रस्त्याकडे बोट दाखवीत म्हणाला, "ते जे वळण दिसतं ना, तिथपर्यंत गेलो, की मी थांबून तुझा निरोप घेईन. तू रुमाल हलव, म्हणजे तेवढाच मला धीर येईल."

" जरूर हलवीन मी रुमाल." जाई आपला रुमाल शोधीत म्हणाली.

" तू इतक्या दूरपर्यंत आलास, याबद्दल धन्यवाद. मला अतिशय आवडलं तुझं असं वागणं."

" हं. पण– पण– " पंचाड्डू जरा साशंक सुरात म्हणतो, " मला वाटलं होतं, तेवढी रडली नाहीस तू. "

झाले. दोघांनी हस्तांदोलन केले आणि गोरा स्वार 'टा–टा' करून निघाला. आस्ते आस्ते आपल्या घोड्यासकट तो दृष्टीआड होऊ लागला. जाईच्या मनात त्याच्या शेवटच्या आठवणी आहेत त्या अशा—

घोडा वळण घेत आहे, आणि त्याच वेळी खाली घसरलेला स्वार जमिनीवर लोळण घेत आहे. जाईला हसावे, की रडावे हेच कळेना. तिने रुमाल जोरजोरात हलवला. 'त्यानं पाहिलान् तरी की नाही, कुणास ठाऊक !' ती आपल्याशी म्हणाली. 'पण पाहिला असेल अशी आशा करते मी. तेवढाच बिचाऱ्याला धीर आला असेल !– लागलं बिगलं नाही ना ? नाही, लागलेलं दिसत नाही ! पाहा ना– धडपडत उठला अन् आता



घोड्यामागे धावतोय. घोडाही रेंगाळत चाललाय, तेव्हा त्याला तो गाठील यात शंका नाही. बिचारा ! भारीच पोरासारखा वागतो ग बाई ! त्याला

सँभाळायला माझ्यासारखीच हवी!' तेवढ्यात पंचाइ घोड्याला गाठून वर चढला होता– आपला आपण. आणि मग 'टा–टा' असा हात हालवून तो दिसेनासा झाला होता. जाईला फार फार बरे वाटले.

'आता—' ती आपल्या रस्त्याकडे वळून टेकडी उतरत म्हणाली, 'तो ओढा गाठायचा, पलीकडे जायचं आणि— राणी व्हायचं!'

दोन-चार उड्यांतच ती ओढ्याच्या काठावर जाऊन पोचली. आणि मग आणखी एक जबरदस्त उडी मारून तिने तो ओढा ओलांडला....

तिथल्या मऊ मऊ हिरवळीवर ती धबक्‌दिशी पडली. मटकन उठून बसली. तशी बाजूची छोटी छोटी रानरोपे एकदम तिच्या पुढे डोकी झुकवून तिला सलाम करू लागली. त्या फुलझाडांनी डोईला रंगीबेरंगी फेटे बांधले होते. जणू काही ती एक छोटेखानी सभाच होती.

'अग बाई! हे टणक काय लागतंय् माझ्या डोक्यावर? टणक अन् जड?' जाईचा हात आपोआप तिच्या कपाळाकडे गेला. तिने आपले डोके चाचपून पाहिले. 'मुगूट!' ती उद्गारली, 'आणि अग बाई! म्हणजे मी खरोखरच राणी झाले की काय तरी!'

## ९

'वा:! हे फारच छान झालं की!' जाई म्हणाली, 'मला वाटलं नव्हतं, इतक्या लवकर मी राणी होईनसं! आणि हे बघा राणीसाहेब, (जाई आता स्वत:शीच कठोर आवाजात बोलत होती. स्वत:वरच रागावण्याची विलक्षण खोड होती तिला!)– आपलं– श्रीमंत सरकार कुडमुडीत की दणदणीत कसल्याशा राणीसाहेब! तुम्ही अशा गवतावर लोळत पडता याचा अर्थ काय? तुम्हांला काही कामधाम आहे

की नाही? सबंध राज्याचा भार आता तुमच्या डोंबलावर आहे म्हटलं! शिवाय तुम्हांला असं लोळताना पाहिलं, तर लोक काय म्हणतील? प्रतिष्ठा-रुबाब काही आहे का नाही तुम्हांला?'



जाई उठली आणि कपडे झटकून हिरवळीवर फिरू लागली. पहिल्याने ती ताठ पुतळ्यासारखी चालत होती. कारण डोक्यावरचा मुगूट पडेल, अशी तिला भीती वाटत होती. पण मग तिला वाटले, हवा कशाला एवढा नखरा? इथे आपल्याला बघायला आहे कोण? आणि हळूहळू होईल सवय त्या मुगुटाची!

इतक्या विचित्र घटना घडत होत्या, की थोड्या वेळाने जेव्हा अकस्मात गोरी

राणी अन् काळी राणी यांच्यासह कुठच्या तरी घरात आपण आलो आहो, असे जाईच्या लक्षात आले, तेव्हा तिला बिलकूल नवल वाटले नाही. एकदा तिला असेही वाटले, की यांना विचारावे—"काय, कसं काय? कधी आलात?" पण मग वाटले, कुणास ठाऊक ते त्यांना आवडेल नावडेल! 'तरी पण—' ती आपल्याशी म्हणाली, 'खेळ संपला वाटतं?' एवढी चौकशी करायला हरकत नाही.'

आणि म्हणून गोऱ्या राणीकडे पाहात तिने भीत भीत सुरुवात केली, "अं...राणीसाहेब, अं— आपला—"

पण गोऱ्या राणीने तिला मध्येच तोडले— "तुझ्याशी कुणी बोललं नसताना मध्ये का बोलतेस?"

"पण हा कसला बाई नियम—" जाई कपाळाला आठ्या घालून म्हणाली. "असला नियम प्रत्येकाने पाळायचा म्हटलं, तर वाटच लागेल! कारण आपल्याशी कुणी दुसरं बोलेल, तेव्हाच आपण बोलायचं ठरवलं आणि दुसरा माणूसही असंच ठरवून गप्प बसला, तर कुणीच काही बोलायचं नाही. आणि मग—"

"मूर्खच आहेस!" गोरी राणी ओरडली. "अग पोरी, तुला एवढंसुद्धा कळत नाही— की— की—" बोलता बोलता तिच्या कपाळावर आठ्या चढल्या आणि मिनिटभर नुसते— 'की— की—' केल्यावर तिने बोलणे सोडून दिले. आणि एकदम विषय बदलून म्हणते कशी—

"मघाशी तू स्वतःला राणी समजून हाका मारीत होतीस, नाही का?" आम्ही ऐकलं! कुणी ग दिलंय तुला अजून राज्ञीपद? राणी एकदम होत नसते. परीक्षा द्यावी लागते— समजलीस? आणि जितक्या लवकर ही परीक्षा देशील, तितकं बरं — आणि काय ग? राजा कोण तुझा?"

"हो ना! दे की उत्तर!" काळी राणी गुरकावली. "कशाला काही पत्ता नाही, अन् आधीच मिरवतेय राणी म्हणून. कुठची ग राणी तू? धड काळी नाहीस, धड गोरी नाहीस."

"निमगोरी कुठची!"

"निमकाळी कुठची!"

बिचारी जाई इतकी भेदरून गेली, की अगदी काकुळतीला येऊन म्हणते,

" तसं नाही हो– माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नव्हता ! "

" तसा अर्थ नव्हता म्हणे ! " काळी राणी खेकसली. " मग कसा अर्थ होता ? भलत्याच अर्थाचं बोलतेस तरी कसं ? आणि आता कितीही हातवारे केलेस तरी नाकारता येणार आहे होय ? "

" अहो, पण मी कुठे हातवारे करतेय ? "

" आम्ही कुठे म्हणतो करतेस म्हणून ? ' केलेस तर ' असं म्हटलं ! "

" हिचं मन.... " गोरी राणी म्हणाली, " अशा अवस्थेला पोचलेलं आहे, की तिला कोणती तरी गोष्ट नाकारायची आहे एवढं नक्की ! पण ती कोणती हे तिचं तिला कळत नाही. "

" हट्टी, कुत्सित स्वभाव आहे तिचा ! " काळ्या राणीने शेरा मारला. आणि मग एक दोन मिनिटे कोणीच काही बोलले नाही. प्रत्येकाला अवघडल्यासारखे वाटू लागले.

त्या स्तब्धतेचा भंग प्रथम काळ्या राणीने केला. गोऱ्या राणीला उद्देशून ती म्हणाली, " आज दुपारी जाईकडे मेजवानी आहे. आपण अवश्य उपस्थित राहावं, अशी माझी विनंती आहे. "

गोरी राणी आजाऱ्यासारखे तोंड करून हसली अन् म्हणाली, " माझी पण आपल्याला तशीच विनंती आहे. "

" माझ्याकडे मेजवानी ! " जाई उद्गारली, " आणि माझं मला माहीत नाही ?– आणि असली समजा मेजवानी, तरी तुम्ही कोण निमंत्रणं देणारे ? मी देईन ! "

" तुला संधी दिली होती, " काळी राणी म्हणाली, " पण तू बोलली नाहीस !– एकंदरीत तू शिष्टाचाराचे फारसे धडे घेतलेले दिसत नाहीत ! "

" शिष्टाचाराचे कुणी धडे देत नाही. " जाई म्हणाली. " धडे इतिहास भूगोलाचे असतात. गणिताचे असतात. "

" बेरीज येते का तुला ? " गोऱ्या राणीने ताडकन् विचारले. " सांग पाहू– एक अन् एक अन् एक अन् एक अन् एक अन् एक अन् एक अन् एक अन् एक म्हणजे किती ? "

" मला नाही बाई माहीत ! " जाई म्हणाली. " माझं मोजायचं चुकलं ! "

" पाहिलं ? " काळी राणी गोऱ्या राणीला म्हणाली. " हिला बेरीज

येत नाही ! बरं, वजाबाकी तरी येते ? आठातून नऊ गेले, किती उरले ? "

" ते नाही मला सांगता येणार– " जाई गोंधळून म्हणाली, " पण– "

" हिला वजाबाकी येत नाही ! " गोरी राणी म्हणाली. " भागाकार तरी ?– एका सुरीने एका पावाचे भाग केले– उत्तर किती ? "

" हे काय बाई– उत्तर– " जाई काही तरी बोलते आहे, तोच काळ्या राणीने तिच्याऐवजी उत्तर दिले, " उत्तर पावलोणी ! वजाबाकीचं दुसरं एक उदाहरण घे– कुत्र्याच्या तोंडातून हड्डक काढून घे– राहिलं काय ? "

जाई विचार करू लागली, " अर्थात हड्डक राहायचं नाहीच म्हणा मी काढून घेतल्यावर. पण कुत्र्याचं तोंड तरी राहील का ? म्हणजे कुत्रा तरी राहील का ? मला वाटतं कुत्रा राहणार नाही. तो जागा सोडून पळेल– माझ्यामागे– मला चावायला, म्हणजे मी पण राहाणार नाही– "

" म्हणजे काहीच राहणार नाही, म्हण की ! "

" हो– मला वाटतं, हेच या प्रश्नाचं उत्तर ! "

" चूक ! तुझं डोकं राहणार नाही. पण तू राहशील ! "

" ते कसं काय ? "

" कुत्रा भुंकून भुंकून तुझं डोकं खाईल ! " काळी राणी म्हणाली, " पण जाऊ द्या ! असल्या अनिष्ट गोष्टीबद्दल न बोललेलं बरं. "

" धन्यवाद ! " जाई म्हणाली.

" आणखी एक गोष्ट राहील.... " गोरी राणी म्हणाली. " कुत्र्याचं भान. "

जाईने कपाळाला आठ्या घातल्या. ती म्हणाली, " ही 'भान'ची काय भानगड आहे ? "

" त्याचं असं आहे– " गोरी राणी म्हणाली. " कुत्र्याचं भान हरपलेलं असेल. तो पळून जाईल, तेव्हा त्याला ते सापडलेलं नसणारच. म्हणजे भान तिथेच राहील. "

जाई आपल्याशी म्हणाली, 'कसली ग बाई डोकी आहेत यांची !' आणि मोठ्याने म्हणते, " तुम्हांला तरी येतं का गणित ? "

गोऱ्या राणीने आ केला अन् डोळे मिटले. ती म्हणाली, " बेरीज येते मला– थोडी मुदत दिली तर ! पण वजाबाकी मात्र मी काही केल्या करू शकत नाही ! "

“ तेराखड्या येतात तुला ?” काळ्या राणीने जाईला विचारले.

“ अर्थात.” जाई एकदम बोलली. आणि मग गोंधळून म्हणते, “ काय म्हणालात? तेराखड्या ?– नाही बाई ! आमच्याकडे बाराखड्या असतात ?”

“ असणारच !” काळी राणी म्हणाली. “ तुमच्या लिपीतला एक स्क्रू ढिला आहे.”

“ बाळ, तुला एक गुपित सांगू का ?” गोरी राणी तिच्या कानाला लागून म्हणाली. “ मला एकाक्षरी शब्द वाचता येतात !– आहे की नाही मज्जा ?– पण तू हताश होऊ नकोस. तुला पण येतील काही दिवसांनी !”

आणि मग पुन्हा काळ्या राणीने हल्ला चढवला.

“ गृहशास्त्रातं तरी कळतं का तुला काही ?– सांग पाहू– कायरस कसा करतात ?”

जाईला वाटले, हे सोपे आहे. ती म्हणाली, “ काकडी घ्यायची—”

“ काय घ्यायचं ?”

“ काकडी.”

“ काय ?”

“ काकडी सांगते ना–” जाई उसळली.

“ झालं ?” काळी राणी गोऱ्या राणीला म्हणाली. “ हिला हे पण येत नाही. कायरस करायला काय घ्यायचं, ते पण तिला माहीत नाही. अग वेडे, कायरस काकडीचा नाही करत. काकडीचा असता, तर त्याला काकडरस म्हटलं असतं. तो कायचा करतात.”

“ काय ?” जाई गोंधळून म्हणाली. तिला वाटले, हा सगळाच चक्रम-पणा आहे झालं. पण काळी राणी एकदम खूष होऊन म्हणाते, “ आता कसं बरोबर बोललीस ! काय घेतल्यावर पुढे काय करायचं ?”

जाईला वाटले, आता पकडावं का यांना शब्दांत? पण मग ती आपल्या-शीच म्हणाली, ‘ जाऊ द्या ! मूर्खांच्या नादी काय लागायचं ?’ तिने मुकाट्याने उत्तर दिले, “ पुढे त्यात खार मिसळून—”

“ खार आणणार कुठून पण ?” गोरी राणी मध्येच म्हणाली. “ झाडा-वरून की नदीवरून ? ती तर सापडत नाही. सुरसूर पळते !”

“ अहो, ती झाडावरची खार नाही. लोणच्याचा खार !”

“ लोणच्याचा खार ? ” काळी राणी म्हणाली. “ स्पष्ट उत्तर देत जा. असं मोघम नको ! ”

“ तिचं डोकं फिरलं असेल....” गोरी राणी म्हणाली. “ आपण भयंकर विचार करायला लावलं तिला. ”

“ वारा घाला तिला ! ” काळी राणी म्हणाली. “ म्हणजे डोकं ताळ्यावर येईल ! ”

लगेच दोघीही राण्या भलीजंगी केळीची पाने घेऊन तिला वारा घालू लागल्या. बिचाऱ्या जाईला त्यामुळे फारच त्रास झाला. तिच्या झिपऱ्या तर उडू लागल्याच, पण केळीचे पानही तिच्या तोंडावर आपटू लागले.

“ आलं ताळ्यावर. ” काळी राणी म्हणाली आणि दोघीही वारा घालायच्या थांबल्या. “ तुला भाषा किती येतात ग ? ‘ शुक् शुक् ’ चं हिंदी काय, सांग पाहू. ”

जाईने गंभीर चेहरा करून म्हटले, “ शुक्-शुक् हा मराठी शब्द आहे, असं म्हणता येणार नाही. ”

“ कुणी म्हटलं, तो मराठी आहे म्हणून ? ” गोरी राणी.

“ आणि कुणी म्हटलं, तो शब्द आहे म्हणून ? ” काळी राणी.

“ शब्दाशिवाय भाषाच होऊ शकत नाही ! ” जाई विजयानंदाने म्हणाली. “ त्यातून शुक्-शुक् कोणत्या भाषेतलं आहे, हे तुम्ही मला सांगितलंत, तर त्याचं हिंदी सांगेन मी तुम्हांला ! ”

काळी राणी ताठ झाली आणि म्हणाली, “ श्रीमंतसरकार महाराज्ञीसाहेब असले सौदे करीत नसतात. ”

“ श्रीमंत सरकारांनी भलभलते प्रश्नही विचारू नयेत. ” जाई म्हणाली; पण मनात.

“ पण आपण वादाचे मुद्दे सोडून देऊ- ” गोरी राणी काळजीच्या सुरात म्हणाली. “ सांग— आकाशात वीज चमकते, त्याचं कारण काय ? ”

“ आकाशात वीज चमकते, त्याचं कारण— ” जाई निश्चितपणे म्हणाली, “ मेघांचा गडगडाट— नाही, नाही. हे उलटं-पालटं झालं— ” ती गडबडीने स्वतःला सावरीत म्हणाली.

“ होऊ दे ! ” काळी राणी म्हणाली. “ आता त्याचा उपयोग नाही.

तोंडून शब्द गेला, त्याचे परिणाम तुला भोगले पाहिजेत."

"बोलण्यावरून आठवण झाली—" गोरी राणी मध्येच म्हणाली. तिच्या हातांची उघडझाप होत होती त्यावरून ती अस्वस्थ झाली असावी. "गेल्या मंगळवारी केवढं वादळ झालं ते! गेल्या आठवड्यातल्या कितव्या मंगळवारी हो?" तिने काळ्या राणीकडे वळून विचारले.

"तिसऱ्या—शेवटून तिसऱ्या!" काळी राणी वोटे मोडीत म्हणाली.

"आमच्याकडे—" जाई म्हणाली, "एका आठवड्यात एकच मंगळवार असतो."

"तुम्ही अगदीच पातळ लेकाचे!" काळी राणी म्हणाली. "आमच्याकडे प्रत्येक दिवसाचे नि रात्रीचे दोन वार तीन वार असतात. हिवाळ्याच्या दिवसांत तर आम्ही एकाच वेळी पाच पाच रात्री घेतो—तेवढीच ऊब जास्त."

"म्हणजे एका रात्रीपेक्षा पाच रात्रींची ऊब जास्त." जाई म्हणाली.

"अर्थात. **पाचपट जास्त!**"

"नवल आहे. एका रात्रीपेक्षा पाच रात्री **पाचपट थंड** हव्यात."

"असतातच. **पाचपट गरम अन् पाचपट थंड.** मी कशी तुझ्यापेक्षा पाचपट श्रीमंत आहे अन् पाचपट गरीब?"

'हिला स्वभावाने गरीब म्हणायचंय की काय तरी!' जाई आपल्याशी म्हणाली. 'तसं असेल, तर वाट लागली! या कैदाशिणीला कोण गरीब म्हणेल?'

"अंडोजी गुंडोजीच्या सुद्धा ही गोष्ट लक्षात आली होती." गोरी राणी स्वर खालावून म्हणाली, इतका खालावून, की जणू काही ती आपल्याशीच पुटपुटत होती.

"तो दाराशी आला हातात एक गिरमीट घेऊन—"

"काय हवं होतं त्याला?" काळ्या राणीने विचारले.

"त्याला आत यायला हवं होतं. पाणघोड्याला शोधीत होता म्हणे तो. पण दुर्दैव असं, की त्या दिवशी घरात पाणघोडा नव्हता."

"रोज असतो वाटतं?" जाईने थक्क होऊन विचारले.

"फक्त गुरुवारी असतो." काळी राणी म्हणाली.

इतक्यात गोऱ्या राणीने परत आपले तुणतुणे सुरू केले— "असं वादळ

झालं—असं वादळ झालं—छपराचा एक भाग **अजिबात** उडाला. आणि इतकं वादळ आत घुसलं म्हणता !—खोलीच्या कोपऱ्यातून त्याचे ढीगच्या ढीग साचले. टेबलं खुर्च्या उलटल्या. मी इतकी भ्याले—मला माझं नावदेखील आठवेना."

जाई स्वतःशी म्हणाली, 'असला उत्पात होत असताना स्वतःचं नाव आठवीत बसावंच का पण? त्याचा उपयोग तरी आहे?' पण राणीला वाईट वाटेल म्हणून ती उघड काही बोलली नाही.

"श्रीमंत राणीसरकारांनी या बापडीला क्षमा करावी...." गोऱ्या राणीचा एक हात धरून तो थोपटीत काळी राणी जाईला अदबीने म्हणाली, "ही मनाने चांगली आहे. पण बोलते पुष्कळदा मूर्खासारखी."

गोऱ्या राणीने भीत भीत जाईकडे पाहिले. जाईला तिची कीव आली आणि तिचे समाधान करण्यासाठी **काहीतरी** बोलावे असे तिला वाटले. पण काय बोलावे ते समजेना.

"हिला घरचं वळण चांगलं नाही—" काळी राणी गोऱ्या राणीला थोपटीत म्हणाली. "पण स्वभावाने इतकी चांगली आहे की— की—"

"सोलायची बोय नाही." गोरी राणी स्वतःच म्हणाली. पण तिचे डोळे मिटत चालले होते.

"जरा डोक्यावर थापट, लगेच खुषीत येईल !"

पण जाईला ते धाडस करवेना.

"जरा तिच्याशी प्रेमाने वाग— एखादा खुळखुळा घेऊन दे— लगेच—"

"माझ्या जोतड्याचे काडे करून तुझ्या धायांत पार्लीन मी !" गोरी राणी पुटपुटली, आणि एक सुस्कारा सोडून तिने चक्क जाईच्या डांद्यावर खोके टेकले. आता जाईच्या लक्षात आले, की ती झोपेला आली होती त्यामुळेच तिचे बोलणे नीट येत नव्हते.

"बिच्चारी !" काळी राणी म्हणाली. "तिला गोंजार जरा, आणि अंगाई गीत म्हण एखादं—"

जाईने अमळ भीतभीतच गोऱ्या राणीला गोंजारण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली, "अंगाई गीत नाही बाई आठवत मला."

"मग मी म्हणते—" काळी राणी म्हणाली. "माझा आई लहानपणी

मला व्यंगाई गीत म्हणायची, तेच म्हणते झाले !" आणि तिने गोऱ्या राणीला थापट्या मारीत गायला सुरवात केली.

नीज नीज तू नीज
मेघावर गगनीच !
कडक ऊन जरि पडे मधेच
धो धो पाउस कडकड वीज
त्यात भीज तू किंवा शीज
नीज परंतू तशीच फ्रीज !
उठल्यावरती तिघी आपण
जाईच्या घरि जेवू जेवण
जमतिल बहुजन, करतिल भोजन
खातिल खा खा, हसतिल खो खो
पितील कॉफी, चहा नि कोको—

"को– को– कोणते शब्द आहेत गाण्यात ते कळलं ना तुला आता ?"

काळ्या राणीने गाणे मध्येच थांबवले अन् जाईच्या दुसऱ्या खांद्यावर डोके ठेवीत ती म्हणाली. "मग आता मला गाणं म्हण. मला पण झोप येते आहे."

जाईने ते गाणे आठवून म्हणायचा कसातरी प्रयत्न केला, आणि मग आणखी दोन मिनिटांत दोन्ही राण्या गाढ झोपी गेल्या. इतकेच नाही तर त्यांनी घोरायला सुरुवात केली.

"आता मी काय करू ?" जाई उद्‌गारली, त्या दोघींची गरगरीत डोकी तिच्या खांद्यांवरून घसरून मांडीवर पडली होती. त्या गोळ्यांकडे गटाण्या डोळ्यांनी पाहात जाई आपल्याशी म्हणाली, 'असं जगात कुठे घडलं नसेल. दोन बड्या राण्या डाराडूर झोपल्या आहेत अन् एकच जाई– की दाई– त्यांना संभाळते आहे !–' "उठा रे ए अकलेच्या गड्ड्यांनो ! उठा ! तुम्हांला कामं नाहीत का ?" पण तिच्या त्या हाकांना उत्तर मिळाले नाही. उलट घोरण्याचा सूर मात्र चढत चालला.

मिनिटामिनिटाला ते घोरणे अधिकाधिक स्पष्ट ऐकू येऊ लागले. आणि मग तर त्याचे वेगवेगळे स्वर बनले. आणखी काही वेळाने त्यातून शब्द उमटू



लागले. मोठ्या आतुरतेने ती ते शब्द ऐकू लागली. शेवटी तिच्या मांडीवरची दोन्ही डोकी विरली– विरघळली– अदृश्य झाली. पण तिचे सारे लक्ष आपले त्या शब्दांकडे होते.

आणि मग तिच्या एकदम ध्यानात आले, की आपण एका मोठ्या कमानीपुढे उभ्या आहो. कमानीच्या दरवाज्यावर टोलेजंगी अक्षरांत नाव लिहिले आहे– **श्रीमंत सरकार राजराजेश्वरी महाराणी जाई**, आणि दरवाज्याच्या प्रत्येक बाजूला एकेक रेशमी गोंड्याची दोरी लोंबते आहे. त्या घंटेच्या दोऱ्या असणार, एका गोंड्याखाली लिहिले होते, ‘ पाहुण्यांसाठी. ’ दुसऱ्या गोंड्याखाली: नोकरांसाठी. ’

‘ हे गाणं संपेस्तो वाट पाहते मी. ’ जाई स्वतःशी म्हणाली. ‘ आणि मग

वाजवीन घंटा. पण– पण–' तिला प्रश्नच पडला, 'यांतली कोणती बरं घंटा वाजवायची मी?– ही की– ही? तसं म्हटलं तर मी नोकर नाही! खरं म्हणजे तिसरी एक घंटा हवी होती इथे– जाई राणीच्या खास नावाची—'

असे ती आपल्याशी बोलते आहे, तोच दरवाजा किंचित उघडला आणि एका लांब चोचीच्या प्राण्याने क्षणभर डोकावून पाहिले. लगेच पुन्हा डोके आत घेत तो म्हणाला, "पुढच्याच्या पुढल्या आठवड्यात ये. तोपर्यंत कुणाला प्रवेश नाही." आणि त्याने खाडकन् दरवाजा बंद केला.

जाईने दरवाज्यावर धडाधड बुक्क्या मारल्या, पण काही उपयोग झाला नाही. पण शेवटी तिला बाहेरूनच मदत मिळाली. पिवळे धमक कपडे घातलेला एक बेडूक एका झाडाखाली बसला होता. प्रचंड बूट त्याच्या पायांत होते. तो आता उठून तिच्याजवळ आला अन् घोगऱ्या आवाजात कुजबुजला, "काय म्हणणं आहे आपलं?"

कोणाला तरी फैलावर घ्यायला जाईची जीभ शिवशिवतच होती. ती रागारागाने म्हणाली, "दार उघडण्याच्या कामावर कोण आहे?"

"कुठचं दार?" बेडकाने विचारले.

त्याच्या त्या सुस्त रेंगाळत बोलण्याचा जाईला असा संताप आला. ती पाय आपटून म्हणाली, "हे दार अर्थात!"

बेडकाने आपल्या वटवटीत डोळ्यांनी त्या दाराकडे जवळ जवळ मिनिट-भर पाहिले. मग तो जवळ गेला आणि दारावर त्याने आपला आंगठा फिरवून पाहिला. जणू काही 'रंग ओला आहे' असे त्याला वाटत होते. मग त्याने जाईकडे पाहिले.

तो म्हणाला, "हे दार?"

जाई भडकली आणि म्हणाली, "होय. तेच दार! किती वेळा सांगायचं?"

"च्–च्–च्!" बेडूक मान हलवीत म्हणाला. किती वेळ लागत होता त्याला नुसती मान हलवायला? मान तरी कसली म्हणा? त्याला मान होती कुठे? डोके म्हणा फार तर!

"छी–छी–छी! का बरं मारलंस इतका वेळ या दाराला? त्याला किती लागलंय पाहिलंस?"

“काही लागलेलं नाही!” जाई ओरडली आणि मग तेवढ्यात तिला विनोद सुचला, “दार स्वतःच लागलंय!”

“च्–च्–च्!” बेडूक अजूनही दाराकडे पाहून डोके हलवीत होता. “फार वाईट केलंस! पुन्हा त्याच्या वाटेला जाऊ नकोस.”

असे तो बोलतो आहे, तोच दरवाजा एकदम उघडला आणि कर्कश आवाजात कुणी तरी गात असलेले त्यांना ऐकू आले—

**“आरसेनगरीत आली जाई<br>म्हणते, “मी तर राणी बाई!”<br>सर्वजनांनो! या, इकडे या<br>जाईसंगे जेवाया!”**

आणि मग शेकडो आवाज एकाच वेळी गाऊ लागले—

**“पदार्थ खाण्या बघा किती ते<br>बुंदकळ्या अन् शिरा, चिरोटे,<br>आपडी थापडी, गुळाची पापडी!<br>धम्मकलाडू, तेल काढू...”**

आणि मग मध्येच—“बोला—श्रीमंत सरकार महाराणी जाईसाहेब की तीस त्रिक वेळा जय!—”

आणि मग—“जय—जय—जय—”

साराच गोंधळ, साराच गोंगाट. साराच नुसता आरडाओरडा!

जाईला वाटले, ‘तीस त्रिक म्हणजे नव्वद. खरोखर नव्वद वेळा जय-जयकार करणार आहेत का? कुणी मोजतो तरी आहे का?’

आणखी मिनिटभरात सर्व शांत झाले. सामसूम, पुन्हा तोच किरटा कर्कश आवाज गाऊ लागला—

**“अयनापुरिच्या पशुपक्ष्यांनो<br>जंतुकीटकांनो!<br>जाई देई बहुमानाचे जेवण,<br>म्हणा न ‘नो नो’**

पंगत वसली, संगत तुम्हां
काळ्या गोऱ्या राण्यांची
दिगंतकीर्ती श्रीमद्राज्ञी
जाईवाईची !"

आणि मग सर्वांनी कोरस करून उत्तर दिले—

"इरिंग मिरिंग
लवंगा तिरिंग !
ओता रेती, टाका लाख
मिसळुन शाई घुसळा ताक
टाका भुस्सा, टाका लोकर
भरभरूनी द्या प्याले लवकर !"

आणि मग मध्येच— "बोला—श्रीमंत सरकार महाराणी जाईसाहेब की नव्वद् नव्वे जय !"

पुन्हा गोंधळ, गोंगाट, आरडाओरडा !

जाई निराश होऊन पुटपुटली, "आता हे नव्वद नव्वे—म्हणजे किती वेळा बाई !—इतके वेळा जर हे 'जय' करणार असतील, तर वाट लागली माझी ! मी नाही आता थांबत !" आणि ती तशीच पुढे झाली आणि पंगतीतून चालू लागली.

तत्क्षणी तिथे शांतता पसरली.

जाई आपल्या दोन्ही बाजूंना दृष्टी टाकीत अमळ भीत भीतच चालली होती. जेवणघर खूप प्रशस्त होते. पन्नास पाहुणे जमले होते. प्रत्येकाला पाट अन् चौरंग. मध्ये उदबत्त्यांचे गुच्छ दरवळत होते.

पाहुण्यात पशू होते; पक्षी होते, इतकेच नाही तर काही फुले पण होती.

"बरं झालं बाई हे सगळे न बोलवता आले म्हणून." जाई पुटपुटली. "नाही तर माझी पंचाईतच झाली असती. निमंत्रणे कुणाकुणाला द्यायची, हे तरी कुठे मला माहीत होतं?"

मध्यभागी टोकाला तीन चंदनी चौरंग मांडले होते. त्यांतल्या कडेच्या

दोन पाटांवर काळी राणी नि गोरी राणी आधीच स्थानापन्न झाल्या होत्या. मधली जागा मोकळी होती. जाई मुकाट्याने त्या पाटावर जाऊन बसली. पण तिच्या काळजात अमळ धाक-धूक होत होते.

आता बोलायचे कुणी? जाई अंग चोरून वसली आणि डोळ्यांच्या कोपऱ्यांतून आजूबाजूला पाहू लागली.

"वरणभात चुकला तुझा!" काळी राणी बोलली. "चला रे-लाडू आणा!"

लगेच वाढप्यांनी बुंदीचा एक प्रचंड लाडू ढकलीत ढकलीत जाईपुढे आणून ठेवला. जाई आ वासून त्याच्याकडे पाहू लागली.

"घे की ग!" काळी राणी तिच्या पाठीत एक बुक्का मारून म्हणाली. "अग, याला धम्मक लाडू म्हणतात. लाजतेस काय एवढी?—थांब, तुझी ओळख करून देते.— या श्रीमंत महाराणी जाईसाहेब. हे धम्मकलाल लड्डूशेट ऑफ बुंदी."

लाडू जाईच्या दिशेने किंचित कलल्यासारखा दिसला. बिचाऱ्याचा तो नमस्कार असावा. कारण हात जोडील म्हणावे, तर त्याला हातच नव्हते.

पण जाईला होते. म्हणून तिने ते जोडले आणि तो प्रचंड गोळा अंगावर पडण्यापूर्वीच ती म्हणाली, "नमस्कार!"

लाडू पुन्हा स्थिर झाला. जाईला वाटले, हा एवढा मोठा लाडू थोडाच आपल्याला खपणार आहे! म्हणून ती त्याचा तुकडा फोडू लागली.

"ए!" काळी राणी किंचाळली. "आत्ताच तुझी त्याची ओळख झाली अन् लगेच त्याला चिमटे घेतेस?"

जाई काकुळतीला येऊन म्हणाली, "अहो, मी फोडीत होते—"

"आत्ताच तुझी त्याची ओळख झाली," काळी राणी म्हणाली, "अन् लगेच त्याला तू फोडतेस?"

"राहिलं!" जाई म्हणाली.

"उचला तो लाडू! घेऊन जा!" काळी राणी ओरडली. लगेच वाढपी पुढे झाले आणि त्यांनी लाडू ढकलीत ढकलीत नेला.

आता आली एक भली मोठी—काय बरे होते ते? पोळी का? असेल! पण केवढी? जवळ जवळ बैलगाडीच्या चाकाएवढी.

जाईला भूक कडकडून लागली होती. पण म्हणून एवढी पोळी थोडीच तिला खपणार होती. तिला वाटले, आता परिचयविधीसाठी थांबून उपयोगाचे नाही. नाहीतर आपल्याला काहीच मिळणार नाही. म्हणून ती पोळीला हात लावून म्हणाली, "तुम्हांला देऊ का थोडी थोडी ?"

पण काळ्या राणीला तिचा हा उतावळेपणा आवडला नाही. तिने तिरसट मुद्रेने ओळख करून दिलीच : "या श्रीमंत जाईसाहेब. या गुळाची पापडी !—चला, पापडी घेऊन जा !" लगेच वाढपी आले आणि पापडीची परात घेऊन गेले. जाईला पापडीचा नमस्कार स्वीकारायलाही वेळ झाला नाही.

पण तिला हे मुळीच आवडले नाही. ती चिडून म्हणाली, "इकडे माझ्या पोटात कावळे ओरडताहेत—"

गोरी राणी म्हणाली, "कावळे ?"

आणि काळी राणी म्हणाली, "कावळे !—अरे, सुरी आणा, सुरी आणा ! फाडा हिचं पोट !"

जाई घाबरून पाटावर उभी राहिली आणि पळ काढणार होती; पण तेवढ्यात काळ्या राणीला पंगतीत जेवायला बसलेले दोन कावळे दिसले आणि ती शांत होऊन तिला खाली बसवीत म्हणाली, "बैस खाली ! ते पडले केव्हाच बाहेर."

जाई खाली बसली. पण तिला एकंदरीत रागच आला होता. तिला वाटले, 'ही काळी राणी कोण एकसारखी हुकूम सोडणारी ? खरं म्हणजे ही मेजवानी माझी आहे—ते काही नाही—' आणि ती ओरडली, "वाढप्यांनो, गुळाची पापडी आणा पुन्हा !"

जादूची कांडी फिरावी तसा तिच्या हुकुमाचा परिणाम झाला. तिचे शब्द पुरे होतात न होतात तो पापडीची परात पुनश्च पंगतीत येऊन ठेपली.

पापडी एवढी मोठी होती, की जाईला तिची अमळ लाजच वाटली. पण तरी तिने धीर करून पापडीचा एक तुकडा मोडला आणि काळ्या राणीपुढे केला.

"उद्धट कुठली !" पापडी ओरडली. "तुला आवडेल का मी असा तुझा तुकडा मोडला तर ?"

बिचारी जाई ! पापडीचा आवाज इतका घोगरा नि दाट येत होता, की त्यावर काय बोलावे, ते जाईला सुचेना. तुकडा मोडणाऱ्या आपल्या हाताकडे ती आ वासून पाहू लागली. तिचे डोळे भरून आले.

"काही तरी बोल की ! नुसताच आ काय वासतेस ?" काळी राणी म्हणाली. "सगळं संभाषण त्या पापडीनंच करायचं वाटतं ?"

"त्याचं असं आहे–" जाई भीत भीत म्हणाली. आणि तिच्या तोंडून शब्द निघू लागताच पंगतीतले सर्व लोक गप्प बसून तिच्याकडे असे टकमक पाहू लागले, की जाईची भीती आणखीच वाढली. "मी कनी खूप खूप हिंडले आज. खूप खूप दमले आहे. खूप खूप भूक लागली आहे मला !– म्हणून मी पापडी खायला लागले. दुसरं काही असतं तरी मी अशीच झडप घातली असती. मासे तर मला आवडतातच. पण खेकडे जरी असते–"

"मासे–मासे–" काळी राणी काही तरी आठवू लागली आणि मग जाईच्या कानात म्हणते, "गोऱ्या राणीला एक माशांची कविता येते. सांगू म्हणायला ?"

जाई कंटाळून 'नको' म्हणणार इतक्यात तिच्या दुसऱ्या कानात गोरी राणी गुणगुणली, "काळ्या राणीसाहेबांनी माझा भलताच गौरव केला. खरंच म्हणू का ?"

"म्हणा !" जाई कपाळाला हात लावून म्हणाली.

तिच्या त्या परवानगीने गोरी राणी खुदकन् हसली. तिला इतका आनंद झाला होता, की तिचे गाल गुलाबी बनले होते. जाईच्या गालावर एक टिचकी मारून ती म्हणाली, "एक—

**आधी मासे पकडावे**
**पकडावे हो पकडावे !**

**अं ! त्यात काय मोठंसं**
**कठीण आहे ?**

**नंतर मासे उकडावे !**
**उकडावे हो उकडावे !**

अंः ! त्यात काय मोठंसं
कठीण आहे ?

नंतर थाळीत मांडावे
मांडावे हो मांडावे !

अंः ! त्यात काय मोठंसं
कठीण आहे ?

झाकण घालून कोंडावे
कोंडावे हो कोंडावे !

अंः ! त्यात काय मोठंसं
कठीण आहे ?

वाढायला आणून उघडावे
उघडावे हो उघडावे !

ओः ! तेच तर मोठं कठीण आहे
कठीण आहे—कठीण आहे...''

"का ?" जाईने न राहवून विचारले.

"कारण–" गोरी राणी म्हणाली,

"झाकण बसतं थाळीला चिकटून. मासा आतून ओढतो चोखून—"

"यात कोडं आहे, ते पद्यात सांगता येत नाही; म्हणून गद्यात सांगते." गोरी राणी म्हणाली. "बोल ! सोपं काय आहे ? ते झाकण सोडवणं, की कोडं सोडवणं ? विचार करून उत्तर दे."

जाईने थोडा वेळ विचार केला. मग ती हसत म्हणाली, "सोडं कोडवणं !"

दरम्यान 'लवंगा तिरिंग' सरबताचे प्याले भरून आले होते. काळ्या राणीने आपला प्याला उचलून उंच धरला आणि ती ओरडली,

"श्रीमंत सरकार महाराणी जाईसाहेब यांच्या नावाने सर्वजण आता सरबत प्या—

अरबत गरबत
एक आलं गलबत
त्यात लादलं
लवंगी सरबत "

काळी राणी किंचाळत होती.

लगेच सर्वांनी आपापले सरबत प्यायला सुरुवात केली. पण कशी? (" तुम्हांला सांगितलं तर शहारे येतील तुमच्या अंगावर!" जाई नंतर आपल्या ताईला म्हणाली. " तऱ्हातऱ्हा केल्या त्या वेड्यांनी! कुणी आपले पेले डोक्यावर उपडे घातले आणि मग सरबत सांडून त्याचे ओघळ गालांवर निथळले, तेव्हा तेच चाटायला सुरुवात केली. कुणी कुणी प्याले उपडे केले अन् चौरंगावर पाट वाहू लागले— म्हणजे बसायचे पाट खालीच होते!— तेव्हा तेच त्यांनी चाटून काढले. तिघांनी तर मोरावळ्यात उड्या मारल्या आणि त्यातला पाक चाटता चाटता ते त्यात बुडून गेले!— बुकरं डुडाली— आपलं, डुकरं बुडाली! खरे ते कांगारू होते असं वाटतं! आणि तशीच लोळत एकमेकांच्या अंगावर काय पडली! मेजवानी म्हणजे एक धुळवडच बनली म्हणा ना!")

" आता तू एक छोटंसं भाषण करून आभार मान सर्वांचे!" काळी राणी कपाळावर आठ्या चढवून जाईला म्हणाली.

" आम्ही तुला टेकू देऊ!" गोरी राणी तिच्या कानात म्हणाली. आणि खरोखरीच तिने तिला त्या बाजूने ढोसले.

इकडे या बाजूने काळी राणीही तेच करू लागली. तेव्हा जाई उभी राहात म्हणाली, " मी राहीन उभी. तुमच्या टेकूची जरूर नाही."


" छे छे! असं कधी झालंय?" असे म्हणून काळ्या राणीने आणखी थोडा टेकू दिला.

बिचाऱ्या जाईला ते सहन करावे लागले. (" पण अशा मेल्या रेटीत होत्या दोन्हींकडून!" तिने नंतर सांगितले. " मला चपटी करणार होत्या की काय, देव जाणे!")

खरोखरीच तिला एका जागी उभी राहणेसुद्धा अशक्य झाले. राण्यांनी

तिला इतकी रेटली, की त्यामुळे ती पाटापासून फुटभर उंचीवर आली आणि हात जोडून कशीबशी म्हणाली, "मंडळी! मी तुमची आभारी आहे." इतक्यात गोऱ्या राणीने तिचे केस पकडले आणि ती किंचाळली, "काही तरी घडतंय– सावध राहा, सावध राहा!"

आणि मग (हे सर्व वर्णन जाईने आपल्या ताईजवळ केले) नाना तऱ्हेच्या गोष्टी एकदम घडल्या. उदबत्त्या उंच उंच होत छतापर्यंत गेल्या आणि त्यांच्यांतून ठिणग्यांची फुले पडू लागली. सरबताच्या प्रत्येक प्याल्याने एकेक बशी निवडली आणि ती पंखासारखी फिट्ट बसवली; खाली चमच्यांचे पाय जोडले आणि पक्षी बनून ते हवेत उडू लागले. त्यांनी असा धुमाकूळ घातला की नाही!



इतक्यात जाईच्या अगदी जवळून एक घोगरे हास्य तिच्या कानांवर पडले. गोऱ्या राणीला काही झाले की काय म्हणून ती पाहते, तो गोरी राणी तिथे नव्हतीच. तिच्या ऐवजी रश्शातले वांगे आपल्या पोटावरून हात फिरवीत बसले होते. त्याची देठाची टोपी काय छान दिसत होती! पण

बेटे अगदीच बरबटले होते वांगोबा. आणि गोरी राणी?— ती वांग्याच्या रश्शात पडली होती. आपले अंग निपटीत नुकतेच तिने डोके वर काढले होते. जाईकडे पाहून ती जरा हसते आहे, तोच पुन्हा घसरून रश्शात पडली. मग पुन्हा काही ती वर आली नाही.

जाईला वाटले, आता कोण्या क्षणी काय होईल त्याचा नेम नाही. कित्येक पाहुणे थाळ्यांतून नि वशांतून पालथे पडले होते. एक ओगराळे चालत चालत जाईकडे येत होते आणि तिला "वाटेतून दूर हो" म्हणून खुणावीत होते.

'बाई—बाई—बाई!' जाई डोळे मिटून म्हणाली. 'आता अगदी हद्द झाली! हे नाही मला सहन होत!'

तिने दोन्ही हातांनी चौरंग उधळून दिला. मग जेवणघरात हिंडून तिने सारेच चौरंग उधळून दिले. वर गेलेली उदवत्तीघरे खाली येऊन आपटली. जिकडे तिकडे ठिणग्या उडाल्या. भांडी-कुंडी, ताटे-वाट्या, खाद्य-पेये नि पई-पाहुणे साऱ्यांची वाट लागली. जेवणघराला रणांगणाचे स्वरूप आले.

या सगळ्या गोंधळाच्या मुळाशी ती काळी राणी आहे, अशी जाईची पक्की समजूत होती. म्हणून ती तिला शोधू लागली. पण ती जागेवर होतीच कुठे? तिची एक चिमुकली बाहुली बनली होती. आणि ती आपल्या सुटलेल्या शालीमागे धावत होती. काही केल्या ती सुटलेली शाल तिला सापडत नव्हती.

एरवी जाईला या प्रकाराचे आश्चर्य वाटले असते. पण आज ती आश्चर्याच्या पलीकडे गेली होती. ती बाहुली एका बाटलीवरून उडी मारण्याच्या बेतात होती, तेवढ्यात जाईने तिला पकडले आणि ती दातओठ चावून म्हणाली, "थांब! तुला गदगदा हलवून तुझं मांजर करून टाकते! तू काय समजलीस?"

## १०

जाईने चौरंगावरून बाहुली उचलली आणि खूप हलवली मागेपुढे, इकडे तिकडे, खाली वर. गदगदा गदगदा. त्या बाहुलीने म्हणजे काळ्या राणीने काही म्हणता काही विरोध केला नाही. ती आपली गप्प होती. तिचे तोंड लहान लहान होत चालले होते. डोळे मात्र मोठे मोठे नि हिरवे दिसत होते. आणि तरी जाई तिला हलवतच होती. गदगदा– गदगदा–




ती आणखी लहान लहान होत गेली– छोटी छोटी– ठेंगणी लठ्ठ– लठ्ठ– आणखी लठ्ठ– मऊ– मऊ– आणखी मऊ– गोल– गोटोळी. आणि—

## ११

आणि– छॅः ! खरोखरच मांजर होते की ते ! मांजराचे पिल्लू !

"का हो मार्जारीबाई....अहो माजोरीबाई ! माजी श्रीमंत राणीसाहेब ! का हो...." जाई म्हणाली, "जरा फुर-फुरणं कमी करा की ! लोकांनी झोप कशी घ्यायची ?"

जाई काळ्या मांजराशी आदराने बोलत होती खरी, पण तिच्या आवाजात थोडा कठोरपणाही होता. "काय रे काळ्या ! कशी



छान स्वप्नं पडत होती मला– कशाला उठवलंस तू ?–आणि लेका, तूही आला होतास की माझ्या बरोबर ? आपण सारी आरसेनगरी पाहून आलो, नाही का ? पण तुला आठवतंय की नाही, कुणास ठाऊक !"

# १२

मांजरांना एक मोठी वाईट खोड असते. (जाईच एकदा असे म्हणाली होती.) त्यांच्याशी काही बोला, ती नुसती 'फुर्र' करतात. त्यापेक्षा 'हो' म्हणायचं असेल तेव्हा 'फुर्र' करावं अन् 'नाही' म्हणायचं तेव्हा 'म्यांव' करावं, असा काही तरी नियम त्यांनी केला तर? केवढी तरी सोय होईल, अन् मांजरांशी खूप वेळ संभाषण करता येईल मग. ज्यांच्याकडून एकच ठराविक उत्तर यायचं, अशा लोकांशी कसं संभाषण करणार बुवा?

या वेळी मांजराने नुसते 'फुर्र' केले. त्याला 'हो' म्हणायचे होते की 'नाही?' देव जाणे!

जाईने चौरंगावरची सगळी मोहरी उलथीपालथी करून पाहिली. शेवटी सापडली तिला काळी राणी. जाईने गालिच्यावर गुडघे टेकले आणि काळ्या पिल्लाला नि राणीला समोरासमोर ठेवले.

"हं, आता काळ्या!—" जाई टाळ्या पिटून म्हणाली. "बघ त्या राणीकडे नीट; अन् सांग तू राणी झाला होतास की नाही?"

(पुढे ताईला ही हकीगत सांगताना जाई म्हणाली, "पण आमचं मांजरू कसलं मेलं हट्टी! त्या काळ्या राणीकडे पाहीनासुद्धा. दुसरीकडेच मान फिरवून बघायला लागला. जसे काही आपण त्या गावचेच नाही—पण— पण त्याला लाज वाटल्यासारखी दिसत होती, बरं का? तेव्हा मला खात्रीने असंच वाटतं, की काळ्याची काळी राणी झाली असणार!")

"जरा ताठ बैस बरं—" जाई मजेने हसून त्याला म्हणाली. "आणि आपल्याला काय बोलायचं आहे— नव्हे, काय फुरफुरायचं आहे याचा विचार करतो आहेस, तोवर एकीकडे सलाम करून टाक! अरे, तेवढाच वेळ वाचतो!" आणि मग एकदम त्याला उचलून जाईने त्याचा पापा घेतला. "तुला राणीपद मिळालं ना, त्याबद्दल हे बक्षीस!" ती म्हणाली.

"आणि पिल्या—सोन्या, तू कुठे गेलास रे?" जाई मध्येच म्हणाली. आणि तिने मान वळवून पाहिले, तो अजून त्याची सफाईच चाललेली होती. "काय ग ठिकरे, या गोऱ्या राणीसाहेबांना कधी मोकळे करणार तू? इतका वेळ आंघोळ?—तरीच बरं का ती गोरी राणी मला स्वप्नात इतकी गबाळ

वाटली ! पण ठिकरे ! तुला कल्पना तरी आहे का, की आपण ज्याला चोळून चोळून धुतो आहो, तो प्राणी म्हणजे श्रीमंत सरकार राजराजेश्वरी महाराणीसाहेब आहे? जरा हळू चोळ की– तुला लाज कशी वाटत नाही?"

'आणि ठिकरी कोण झाली होती स्वप्नात?' ती आपल्याशी म्हणाली. गालिच्यावर कोपर ठेवून तिने हनुवटी हातावर टेकली होती अन् आरामात ठिकरीकडे पाहात होती ती. "ठिकरे ! तू कोण झाली होतीस ग? अंडोजी गुंडोजी की काय? होय. मला बाई, तशीच शंका येते आहे. पण कुणाला सांगू नकोस, बरं का? कारण मला अजून खात्री नाही.

"आणि–बरं का रे पिलांनो–तुम्ही खरोखरीच जर स्वप्नात माझ्याबरोबर आला असलात, तर एका गोष्टीची तुम्हांला खात्रीने गंमत वाटली असेल. त्या गाण्यांची ! किती मजेमजेची गाणी ऐकायला मिळाली !– ते वॉलरस – मिळी गाणं तर मी कधीच विसरणार नाही !–बरं का रे? उद्या सकाळी तुम्ही तुमचा नास्ता खाल ना, तेव्हा मी ते गाणं म्हणेन तुम्हांला. मग बशीत काही जरी वाढलेलं असलं, तरी तुम्ही आपले कल्पना करा, की बशीत कालवं आहेत. तुम्हांला कालवं फार आवडतात, खरं की नाही?

"आणि हे बघ, काळ्या–सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अजून पुढेच आहे. पंजा काय चाटतोस? लक्ष दे. महत्त्वाचा आहे, म्हटलं ना? तुला ठिकरीने सकाळी आंघोळ घातली आहे ना? मग आता ही चाटाचाटी कशाला?– तेव्हा काळ्या, सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो हा, की **हे स्वप्न कुणाला पडलं**? एक तर मला असणार किंवा काळ्या राजाला असणार. काळ्या राजाला की काय? तू त्याची राणी होतास, तेव्हा तुला माहीत पाहिजे– ए काळ्या ! ठेव पाहू तो पंजा बाजूला. उत्तर दे आधी. या प्रश्नाचं उत्तर मला मिळालंच पाहिजे !"

जाईला उत्तर मिळाले. पण ते त्या द्वाड मांजराकडून नाही. कारण त्याचा एक पंजा साफ करून होतो न होतो. तो लगेच त्याने दुसरा पंजा उचलला आणि पुन्हा जीभ बाहेर काढली.

जाईने त्याचा नाद सोडला आणि ती चौरंगावर पडलेल्या बुद्धिबळाच्या मोहऱ्यांकडे पाहू लागली. आणि एकाएकी तिचे डोळे आश्चर्याने फाकले.

कशाचा तरी धक्का लागून असेल, पण काळा राजा डुग्गू डुग्गू हलत

होता खरा—

"लवंगातीरचा डुगडुग राजा !"



जाईला पुन्हा पुन्हा ती आरसेनगरीतली मजेदार मंडळी आठवू लागली. ते राजे, त्या राण्या, ते ढामाड्ढ-पंचाड्ढ, तो अंडोजी गुंडोजी, ते वॉलरस-मिस्त्री, तो शिंगवाला घोडा नि तो रड्या सिंह....

री परेडच तिच्या डोळ्यांपुढून गेली की. आणि जाईला फार फार
ार नवल वाटले.

म. ने. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ९६८३९
दि. ७१·०१ ·
IRBK-0116431
IRBK-0116431